रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक १३४ । पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in



शुभ दीपावली

अंधारावर मात करुनी
उजळले प्रकाशदिवे दारी,
दिवाळीच्या मुहूर्ती आली
भाग्यलक्ष्मीची स्वारी
सुख-समाधान,
आरोग्य आणि धनसंपदा
गुंफून हात हाती,
येवो तुमच्या दारी

रायगड, मंगळवार, दि. २१ ऑक्टोबर २०२५

# कृषीवल

किंमत ४ ₹

## दिवाळीनिमित्त आज मुहूर्त ट्रेंडिंग

**मुंबई :** दिवाळीच्या निमित्ताने हिंदू आर्थिक नववर्षाची सुरुवात मानली जाते. या दिवशी करण्यात येत असलेली गुंतवणूक चांगली मानली जाते. काही गुंतवणूकदार या दिवशी दीर्घकालीन गुंतवणुकीचा विचार करुन शेअर खरेदी करतात. त्यामुळे दिवाळीनिमित्त आयोजित केले जाणारे मुहूर्त ट्रेडिंग २१ ऑक्टोबरला दुपारी पावणेदोन ते पावणेतीन वाजता यादरम्यान होणार आहे. तर, त्यापूर्वी दीड ते पावणेदोन वाजेपर्यंत प्री-ओपन सत्र सुरु असणार •➤पान २ वर

**वे|ध|क**

## एअर चायनाच्या विमानात आग

**हांगओउ :** सध्या सोशल मीडियावर एक व्हिडिओ चांगलाच व्हायरल होत आहे. त्यात, एका उडत्या विमानात आग भडकलेली दिसत आहे. हा व्हिडिओ चीनमधील असल्याचे समोर आले आहे. चीनच्या हांगओउ येथून सियोल येथे प्रवाशांना घेऊन जाणाऱ्या एअर चायनाच्या फ्लाइट सीए१३९मध्ये एक प्रवाशाच्या कॅरीऑन बॅगेत ठेवलेल्या लिथियमची बॅटरीने अचानक पेट घेतला. या घटनेमुळे विमानातील सर्वच प्रवासी प्रचंड घाबरले आणि मग विमानाचे शांघाय येथे आपत्कालीन लँडिंग करावे लागले. ही घटना शनिवारी (दि.१८) सकाळी घडली. या घटनेत कुणालाही दुखापत झालेली नसल्याचे अधिकृत निवेदन एअर चायनाकडून जारी करण्यात आले.

## पश्चिम रेल्वेचा नवा प्रयोग

**मुंबई :** दिवाळी आणि छट पूजेसाठी गावी जाणाऱ्या प्रवाशांची संख्या अधिक असून अनेक प्रवाशांना लांब पल्ल्याच्या रेल्वे गाड्यांसाठी आरक्षण न मळिाल्याने अनेक प्रवासी अनारक्षित तिकिटांवर प्रवास करतात. त्यामुळे स्थानकांवरील तिकीट काउंटरवर मोठ्या रांगा लागताता. या पार्श्वभूमीवर पश्चिम रेल्वेने यंदा नवा प्रयोग हाती घेतला आहे. बस कंडक्टरप्रमाणेच रेल्वे बुकिंग कार्यालयातील कर्मचारी आता प्रवाशांच्या जवळ जाऊन तिकीट देणार आहेत. या उपक्रमांतर्गत बुकिंग कर्मचारी वेटिंग एरिया किंवा प्रवासी थांबण्याच्या ठिकाणी जाऊन हँडहेल्ड मशीनच्या माध्यमातून तिकीट देतील. या मशीनमध्ये रोख रक्कम तसेच ऑनलाइन पेमेंटची सुविधा उपलब्ध असणार आहे.

# हक्काच्या घराचे स्वप्न भंगले

## ६५० जणांकडून असो.च्या नावे जमीन करण्याची मागणी

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

**आपल्या स्वत:चे हक्काचे घर असणार या आशेवर एका बिल्डरला करोडो रुपये दिले. परंतु, त्याने घर बांधण्यास परवडत नसल्याचे कारण दाखवून शेकडो जणांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्यासह ठाणे येथील एकूण ६५० जणांच्या घराचे स्वप्न भंगले आहे. दरम्यान, बिल्डरच्या ताब्यात असलेली जमीन श्रीगणेश कृपा सामाजिक असो.च्या नावे करण्याची मागणी या नागरिकांनी केली आहे. त्याबाबत रायगड जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले असून लवकरात लवकर कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. त्यामुळे आता जिल्हाधिकाऱ्यांच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.**



### रायगडच्या जिल्हाधिऱ्यांना निवेदन

पनवेल हे शहर दिवसेंदिवस अधिकच विकसीत होत चालले आहे. वेगवेगळया सुविधा पनवेलमध्ये उपलब्ध होत असल्याने या ठिकाणी आपले घर असावे, अशी अनेकांची इच्छा असते. मुंबईसह अलिबाग व पुण्याकडे जाण्यासाठी अगदी मध्यवर्ती ठिकाण असल्याने पनवेलमध्येम हक्काचे घर असल्याचे अनेकांचे स्वप्न होते. परंतु, त्यांची स्वप्नपूर्ती होण्याआधीच ते भंग झाले आहे. विक्रम सांळुखे यांच्या म्हणण्यानुसार, नवीन पनवेल येथील विकासक शरद अमृत मोझर यांनी स्वप्नपूर्ती होम्स प्रा.लि. या नावाचे स्वप्न अनेकांना दाखविले. कमी किंमतीमध्ये घर मळिणार म्हणून २०१२ मध्ये अनेकांनी बुकींग केली. काहींनी ३ लाख तर काहींनी ५ लाख रुपये असे एकूण •➤पान २ वर

> “स्वप्नपुर्ती होम्स प्रा.लि.च्या नावाने कॉमन चाळीचा प्रकल्प होता. मात्र परवडत नाही, असे सांगून त्यांनी काम थांबविले. त्यामुळे विकासक शरद मोझर यांच्याविरोधात मोर्चे काढले. मोझर यांच्या मालकीची असलेली जमीन श्रीगणेश कृपा सामाजिक असोसिएशनच्या नावे करण्यात यावी, अशी आमची मागणी आहे. तसेच, या असोसिएशनच्या नावाने जमीन विकसीत केली जाईल.”
> **– विक्रम सांळुखे, अध्यक्ष, श्रीगणेश कृपा सामाजिक असोसिएशन**

> “शासनाच्या पदरी जमीन जाण्यापेक्षा ६५० लोकांचे भले व्हावे, त्यांना जमीन मळिावी, अशी धारणा आहे. गोरगरींबाचे नुकसान भरून काढणे शासनाकडून झाले नाही. ती जमीन सोसायटीच्या नावाने करण्यात यावी, अशा मागणीची न्यायालयात याचिका दाखल केली आहे. जिल्हाधिकारी यांच्याकडेदेखील निवेदन दिले आहे.”
> **– ॲड. विजय शिंदे**

# कामोठेकरांचे पाण्यासाठी ठिय्या आंदोलन

### शेकाप नेते बाळाराम पाटील यांचे नेतृत्व

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

सणा सुदीच्या दिवसांत कामोठेकरांवर पाण्यासाठी सिडकोचे पाणी पुरवठा कार्यालय गाठण्याची वेळ आली. पुरेसे पाणी मिळत नसल्याने सोमवारी (दि.२०) कामोठे वसाहतीतील सिडकोच्या पाणी पुरवठा विभागाच्या कार्यालयावर महाविकास आघाडीच्यावतीने व शेतकरी कामगार पक्षाचे नेते माजी आमदार बाळाराम पाटील यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा काढण्यात आला होता.

जिल्ह्यात दिवाळीनिमित्त अभ्यंग स्नान होत असतानाच कामोठेकरांना मात्र प्रचंड प्रमाणात पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. पाणी नसल्याने नागरिक संतापले आहेत. येथील सेक्टर ६ अ, ६, ९, १७, १८, १९, २२, २३, २४ मधील नागरिकांना पाणी पिण्यासाठी वापरायचे कि अभ्यंग स्नानासाठी, हा प्रश्न पडला आहे. गेल्या २-३ महिन्यांत सिडकोकडून याबाबत कोणतेही ठोस आश्वासन मिळत नसल्याने महाविकास आघाडी कामोठे विभागामार्फत सेक्टर ६ अ येथील सिडकोच्या पाणी पुरवठा विभागात शेकाप नेते माजी आमदार बाळाराम पाटील यांच्या नेतृत्वाखाली ठिय्या आंदोलन करण्यात आले. यावेळी महिलांनी सिडकोच्या अधिकाऱ्यांना धारेवर धरले. शेवटी सिडकोच्या अधिकाऱ्यांकडून सकारात्मक भूमिका घेत आंदोलनकर्त्यांना लेखी आश्वासन दिले. त्यात, सेक्टर १७ आणि १८ मध्ये नवीन पाईप लाईन दि.२३ आक्टोबरपर्यंत आणण्यात येईल. तर, प्रत्यक्ष काम दि.२७ ऑक्टोबरला सुरु होईल. तसेच, सेक्टर ३४, ३५ आणि ३६मध्ये नवीन पाईप लाईनचा प्रस्ताव मान्यतेकरिता पाठवला असून एक महिन्यात निविदा काढण्यात येतील. ज्या ठिकाणी कमी पाणी पुरवठा होतो तेथे तात्पुरत्या स्वरूपात काही दिवसांसाठी टँकरद्वारे पाणी पुरवण्यात येईल. त्यामुळे लवकरच कामोठेकरांना नियमित पाणी पुरवठा सुरु होईल, असे लेखीश्वाासन दिल्या नंतरच महाविकास आघाडीसह कामोठेकरांना ठिय्या आंदोलन मागे घेतले.

या मोर्चात माजी नगरसेवक शंकर म्हात्रे, माजी नगरसेवक प्रमोद भगत, सखाराम पाटील, माजी नगरसेविका लिना गरड, शेकाप कामोठे शहराध्यक्ष अमोल शितोळे, शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे प्रभाकर गोवारी, अवचित राऊत, रंजना सलोडीकर, रमेश गोरे, उषा झणझणे, संगीता राऊत, रेवती सकपाळ, •➤पान २ वर




> “पनवेल विधानसभेचे आमदार प्रशांत ठाकूर आता सांगत आहेत की नवीन बांधकामांना परवानगी देऊ नका; परंतु, ते गेल्या पंधरा वर्षांमध्ये पाण्याचे नियोजन करू शकले नाहीत, ही शोकांतिका आहे. तसेच, सिडकोने मनावर घेऊन किमान दिवाळीसाठी तरी नागरिकांना पाणीपुरवठा सुरळीत करावा.”
> **– माजी आमदार बाळाराम पाटील**

> “आम्ही पनवेल पालिकेचे रहिवाशी आहोत. परंतु, पनवेल महानगरपालिका मात्र सिडकोकडे बोट दाखवून आमच्याकडून कर वसुल करते. त्यामुळे पालिकेने आम्हाला फक्त पैशांसाठी पालिकेत घेतले आहे, असे वाटते.”
> **– अमोल शितोळे, कामोठे शहराध्यक्ष, शेकाप**

# बिहारमध्ये राजदची ‘तेजस्वी’ रणनीती

**। पटणा । वृतसंस्था ।**

बिहारमधील विधानसभा निवडणुकांकडे देशाचे लक्ष लागले असून सर्वच प्रमुख राजकीय पक्षांकडून उमेदवारांची घोषणा होत आहे. त्यामध्ये, काही विद्यमान आमदारांचेही तिकीट कापले जात असून नवे चेहरे मैदानात उतरवले जात आहेत. लालू प्रसाद यादव यांच्या राष्ट्रीय जनता दलाने यंदा तिकीट वाटपात अनेक फेरबदल केले आहेत. गत २०२० च्या निवडणुकीत जिंकलेल्या ३६ जागांवरील उमेदवार बदलून नवी रणनीती आखली आहे. त्यामध्ये, माजी मंत्री तेजप्रताप यादव यांच्या मतदारसंघात देखील दुसराच उमेदवार देण्यात आला आहे. तर, ३६ विद्यमान आमदारांचे तिकीटही कापले आहे.

तेजस्वी यादव यांच्या नेतृत्वात राजदने बिहार विधानसभा निवडणुकासाठी १४३ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. गतनिवडणुकीत १४४ जागांवर निवडणूक लढवणाऱ्या राजदने यंदा बहुतांश विद्यमान आमदारांचे तिकीट कापले आहे. तब्बल ३६ विद्यमान आमदारांचे तिकीट पक्षाने कापले, त्यामुळे पक्षात खळबळ उडाली असून मोठ्या प्रमाणात बंडखोरी होण्याची शक्यता दिसून येते. दरम्यान, पक्षाने ४१ उमेदवारांना पुन्हा संधी दिली असून त्यामध्ये अलोक मेहता, चंद्रशेखर, युसूफ सलाउद्दीन आणि चंद्रहास चौपाल यांच्या नावाचा समावेश आहे.

## गुजरात सरकारमध्ये राजकीय भूकंप

**अहमदाबाद :** दिवाळीच्या अगदी तोंडावर गुजरात मंत्रिमंडळात फेरबदल होणार आहेत. मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल सोडून सर्वच मंत्र्यांनी राजीनामा दिल्याने खळबळ उडाली आहे. सर्व मंत्र्यांनी मुख्यंत्र्यांकडे राजीनामे सोपवले आहेत. भूपेंद्र पटेलांच्या निवासस्थानी अत्यंत महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीनंतर सर्व मंत्र्यांनी राजीनामे सोपवले. राजीनाम्यापूर्वी मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांच्यासोबत बैठक झाली. या बैठकीनंतर राजीनामे स्वीकारले गेले. दरम्यान, आता सर्व राजीनामे राज्यपालांकडे सोपवले जातील. महत्त्वाचे म्हणजे सर्व मंत्र्यांचे राजीनामे खिशात होते, या राजीनामापत्रांवर सह्याही होत्या. मुख्यमंत्र्यांसोबत बैठक झाल्यानंतर सर्व मंत्र्यांनी खिशातून राजीनामे बाहेर काढले. नवीन मंत्र्यांचा शपथविधी •➤पान २ वर

## बसखाली चिरडून चिमुकल्याचा मृत्यू

**मुंबई :** बेस्टच्या चाकाखाली चिरडून दीड वर्षीय चिमुकल्याचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना सोमवारी (दि.२०) सकाळी मीरा रोड येथील गोल्डन नेस्ट परिसरात घडली. येथील संथ गतीने सुरू असलेल्या मेट्रोच्या कामांमुळे रस्त्यांची अक्षरशः दुरवस्था झाली आहे. तर, ठेकेदाराकडून ठिकठिकाणी डेब्रिज टाकल्याने हे रस्ते यमदूत बनले आहेत. सोहेल पठाण हे मुस्तकिन सुजरा व दीड वर्षाचा चिमुकला अली अजगर पठाण यांच्यासोबत जात असताना गोल्डन नेस्ट परिसरात रस्त्यावर टाकलेल्या डेब्रिजमुळे त्यांची दुचाकी घसरली. या अपघातात ते तिघेही खाली कोसळले. यावेळी चिमुकला अली पठाण हा मागून येणाऱ्या बसच्या चाकाखाली चिरडला गेला.

## कलेतून लक्ष्मी अवतरली..



● लक्ष्मी पूजनानिमित्त पनवेलमध्ये लक्ष्मी मातेची रांगोळी साकारण्यात आली. (छायाचित्र: राजेश डांगळे)

## गोळीबारात निवृत्त जवानासह दोघांचा मृत्यू

**। नोएडा । वृत्तसंस्था ।**

नाल्यावरून झालेल्या क्षुल्लक वादातून गोळीबाराची धक्कादायक घटना समोर आली आहे. या गोळीबारात निवृत्त सीआयएसएफ जवानासह दोघांचा मृत्यू झाला. तर, एक जण गंभीर जखमी झाला आहे. अजयपाल (५५) आणि २२ वर्षीय दीपांशू अशी त्यांची नावे आहेत. घटनेनंतर आरोपी पळून गेले असून पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली. ग्रेटर नोएडातील सेथली गावात सोमवारी दि.२० सकाळी ही घटना घडली. दोन दिवसांपूर्वी प्रिन्स आणि दीपांशूमध्ये नाल्याच्या बांधकामावरून वाद झाला होता.

# परभणी हादरलं

## तरुणीवर सामूहिक अत्याचार

**। परभणी । प्रतिनिधी ।**

नाशिक जिल्ह्यातील जिंतूर तालुक्यात ऐन दिवाळी सणाच्या काही दिवस अगोदर तरुणीवर सामूहिक अत्याचाराची संतापजनक घटना उघडकीस आली आहे. एका झाडाखाली आपल्या मित्रासोबत गप्पा मारत बसलेल्या तरुणीवर सामूहिक अत्याचार करण्यात आल्याने तीव्र संताप व्यक्त होत आहे. याप्रकरणी, पोलिसांनी आरोपींना अटक केल्याची माहिती पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांनी दिली. तसेच, जेथे कोणी जात नाही तेथे तरुण-तरुणींनी जाऊ नये, असा सल्लादेखील पालकमंत्र्यांनी दिला आहे.

जिंतूर तालुक्यातील भोगाव देवी संस्थान इटोली परिसरात १४ ऑक्टोबर रोजी एका गंभीर आणि संतापजनक घटनेची नोंद झाली आहे. या घटनेने संपूर्ण परभणी जिल्हा सुन्न झाला असून झाडाखाली गप्पा मारत बसलेल्या तरुणीजवळ अचानक ६ जण आले आणि तिच्यासोबत असलेल्या तरुणाला पकडून ठेवले. त्यातील ३ जणांनी तरुणीवर सामूहिक अत्याचार केला व या घटनेचा व्हिडिओ देखील चित्रित केल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. या घटनेमुळे परिसरात संताप व्यक्त होत असून पोलिसांनी तातडीने कारवाई करत ६ नराधमांना अटक केली आहे. याप्रकरणी, पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांनीही दखल घेत आरोपींना कठोर शिक्षा होण्यासाठी आम्ही प्रयत्नशील असल्याचे म्हटले आहे.

### ‘आरोपींना कठोर शिक्षा होईल’

**या प्रकरणात पोलिसांनी योग्य ती कारवाई केली आहे. तसेच, ज्या ठिकाणी कुणी जात नाही, अशा ठिकाणी तरुण-तरुणींनी जाऊ नये. स्वसंरक्षणासाठी त्यांनी ही काळजी घेतली पाहिजे. कारण, समाजात विकृत मानसिकता वाढलेली आहे. या प्रकरणात पोलिसांनी स्वतः गुन्हा दाखल करून या आरोपींना अटक केलेली आहे. पुढची कारवाई देखील कडक केली जाईल, आरोपींना कठोर शिक्षा होईल याची खबरदारी आम्ही घेऊ. मात्र समाजानेही विकृत मानसिकता ओळखून त्याच्याविरोधात लढले पाहिजे, असे आवाहनही मेघना बोर्डीकर यांनी केलं आहे.**

**परवानगी पन्नासची उत्खनन हजारो ब्रासचे** | **अधिकारी भुमाफियांच्या दावणीला?**

# श्रीवर्धनमध्ये दिवाळीत महसूलच दिवाळं

**। दिघी । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन तालुक्यात बेकायदा गौण खनिज उत्खनन करणारयांचा सुळसुळाट वाढला आहे. अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात बेकायदा माती उत्खनन केले जाते. दरम्यान, बोर्लीपंचतन परिसरातील खुजारे येथून खासगी व्यावसायिकांकडून भरमसाठ उत्खनन करून वाहतूक केली जात असल्याचे निदर्शनास येत आहे. त्यावर कुणाचेही नियंत्रण नसल्याचे दिसत आहे. गंभीर बाब म्हणजे नाममात्र स्वामित्वधन म्हणजेच रॉयल्टीच्या दुप्पट-तिप्पट उत्खनन केले जात आहे. त्यामुळे सरकारचे कोट्यवधींचे महसूल बुडत आहे.



श्रीवर्धन तालुक्यात गौण खनिज उत्खननात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असल्याची चर्चा होत आहे. तालुक्यात विविध गावांत जमिनीतील माती व मुरूम काढण्याची शासनाने परवानगी दिली आहे. या माती उत्खननाचे महसूल कार्यालयातून रॉयल्टी चलन •➤पान २ वर

### अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

प्रांताधिकारी किंवा तहसीलदार यांनी उत्खनन व भराव टाकण्यास परवानगी दिली असताना त्याची अंमलबजावणी करण्यासाठी मंडलाधिकारी व तलाठी यांचीही जबाबदारी असते. मात्र, स्थनिक पातळीवर अशा बेकायदा उत्तखननाकडे त्यांच्याकडून दुर्लक्ष केले जाते. याबाबत त्यांच्याशी संपर्क साधला असता नेहमीच त्यांचा नंबर नॉट रिचेबल असतो, असे स्थानिकांचे म्हणने आहे.

### भूस्खलनाची दाट शक्यता

**श्रीवर्धन तालुक्यात कोट्यवधींची उलाढाल होत असून पुणे-मुंबईपासून जवळ असलेल्या श्रीवर्धन तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणावर गृहप्रकल्प व रिसॉर्ट उभारले जात आहेत. त्यासाठी येथील डोंगर पोखरण्यात येत आहेत. हे डोंगर पोखरताना कुठलेही नियम पाळले जात नसल्याने भूस्खलनासारखी दुर्घटना घडू शकते, त्यामुळे संबंधित विभागाने याकडे गांभिर्याने लक्ष देणे गरजेचे आहे.**

# रोह्यात सरकारी ट्रकला आग

**। रोहा । प्रतिनिधी ।**



दिवाळीत धान्य वाटप करण्यासाठी भुवनेश्वर येथील सरकारी गोडाऊनमध्ये धान्य घेऊन आलेल्या ट्रकला अचानक आग लागल्याची घटना रविवारी (दि.१९) मध्यरात्रीच्या सुमारास घडली आहे. या आगीत शासनाचे लाखो रुपये किंमतीचे धान्य जळून खाक झाले आहे. या घटनेमुळे सर्वत्र खळबळ उडाली असून आगीचे कारण अद्याप समजू शकले नाही.

रोह्यातील भुवनेश्वर येथील शासकीय गोदामात सामान्य जनतेला धान्य पुरवठा करण्यासाठी धान्य ठेवले जाते. त्यानंतर या गोदामातून नियोजित ठिकाणी धान्य पुरविले जाते. दरम्यान, रविवारी धान्य भरून आलेला ट्रक भुवनेश्वर येथील गोदामाच्या आवारात उभा करुन ट्रकचालक दिवाळी निमित्त आपल्या गावी गेला होता. त्याचवेळी मध्यरात्री साडेबारा वाजताच्या सुमारास धान्याने भरलेल्या ट्रकला आग लागली. या आगीत ३४५ क्विंटल वजनाच्या ६९१ तांदळाच्या गोणी जळून खाक झाल्या आहेत. या घटनेची माहिती मळिताच नायब तहसीलदार राजेश थोरे यांच्यासह संबधित खात्याच्या कर्मचारयांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर धाटाव एमआयडीसी येथील अग्निशामक दलाला पाचरण करण्यात आले आणि ही आग आटोक्यात आणली.

## पनवेलमध्ये वादातून चाकू हल्ला

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल शहरातील वडाळे तलाव परिसरात डिपॉझिट परत देण्याच्या वादातून चाकूने हल्ला केल्याची गंभीर घटना घडली आहे. या हल्ल्यात एक जण गंभीर जखमी झाला असून पनवेल शहर पोलीस अधिक तपास करत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, आनंद जाधव यांनी २ लाख रुपये हेवी डिपॉझीटवर गोविंद राठोड यांच्या भावाच्या नावावा असलेली सदनिका भाडे तत्त्वावर घेतली होती. दरम्यान, आनंद जाधव यांचे सोसायटीमधील सदस्यांशी वाद झाल्याने त्यांनी गोविंद राठोड यांच्याकडे डिपॉझीटचे पैसे परत मागीतले. हे पैसे देण्यासाठी गोविंद राठोड हे वडाळे तलाव परिसरामध्ये गेले. •➤पान २ वर

# पेणमध्ये जमिनीची चोरी; शेतकरी उपोषणाच्या पवित्र्यात

**रायगड** : शेतकऱ्याच्या आजोबाने विकत घेतलेल्या २९ गुंठे जमिनीपैकी शून्य गुंठेदेखील जमीन शिल्लक राहिली नाही. त्यामुळे ही जमीन कुठे गेली, असा सवाल पेणमधील शेतकऱ्यांनी उपस्थित केला आहे. याबाबत भूमी अभिलेख कार्यालयात तक्रार करूनही कोणतीही दखल घेण्यात आली नाही. त्यामुळे खारपाले येथील वयोवृध्द शेतकरी दामोदर ठाकूर, महिला शेतकरी अरुणा ठाकूर उपोषणाच्या पवित्र्यात आहेत. दिवाळीनंतर बुधवारी (दि.२९) अलिबागमधील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाला बसणार आहेत, असा इशारा अरुण ठाकूर यांनी दिला असून, याबाबत निवेदन देण्यात आले.

अरुण ठाकूर यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार, खार म्हैसबाड हद्दीतील स.नं. ६७ ही शेतजमीन त्यांच्या आजोबांनी ९ जून १९५३ मध्ये गोवर्धन कानकिया यांच्याकडून कायम खरेदी खताने २९ गुंठे जमीन विकत घेतली होती. १९६१मध्ये झालेली पोट हिस्सा मोजणी चुकीची असल्याचे ठाकूर यांनी पेण येथील भूमीअभिलेख व उपविभागीय अधिकारी, तहसील कार्यालयांकडे तक्रार केली. मात्र, आजपर्यंत कोणीही दखल घेतली नाही.

## पान १ वरून

## कामोठेकरांचे पाण्यासाठी ठिय्या आंदोलन

कुणाल भेंडे, सुनील शिरीषकर, मनसे शहर अध्यक्ष मनोज कोठारी, रुपाली धिवार, संतोष गोळे, गणेश खांडगे, बापू साळुंखे, अनिल पवार, नाना भगत, बबन गोगावले, विश्वास भगत, सचिन झणझणे, ज्ञानेश्वर म्हात्रे, मधुकर सुरते, प्रमोद म्हात्रे, राहुल पाखरे तसेच बहुसंख्येने विविध सोसायटीतील रहिवाशी उपस्थित होते.

## श्रीवर्धनमध्ये दिवाळीत महसूलच दिवाळं

काढले जाते. मात्र, चलनावर किती ब्रास माती उत्खनन करणार, याची नोंद नसून केवळ रक्कमच दाखवली जाते. त्यामुळे शासनाला रॉयल्टी कमी भरायची आणि हजारो ब्रास माती व मुरूम उचलायचा. आणि त्यातून बक्कळ पैसा कमवायचा, असा गोरस धंदा सध्या सुरू आहे. त्यामुळे सरकारचा महसूल बुडत असून उत्खनन करणाऱ्यांकडून काही भ्रष्ट अधिकारयांचे खिसे भरले जात आहेत, असा आरोप ग्रामस्थांमधून करण्यात येत आहे. त्याच बरोबर तालुक्यातील डोंगरांचे नैसर्गिक सौंदर्य महसूल विभागाच्या नाकर्तेपणामुळे संपुष्टात येत असल्याचे देखील ग्रामस्थांकडून बोलले जात आहे.

## दिवाळीनिमित्त आज मुहूर्त ट्रेडिंग

आहे. या कालावधीत ट्रेडर्स ट्रेडिंगची तयारी करू शकतील. हे सत्र गुंतवणूकदारांसाठी शुभ सत्र मानले जाते. गुंतवणूकदार या ट्रेडिंगकडे त्यांच्या पोर्टफोलिओमध्ये समृद्धी आणि यश मळिवण्याची संधी म्हणून पाहतात. भारतीय शेअर बाजारात गेल्या ५० वर्षांहून अधिक काळापासून मुहूर्त ट्रेडिंगचे सत्र आयोजित केले जाते. मुहूर्त ट्रेडिंगची सुरुवात बॉम्बे स्टॉक एक्सचेंजतर्फे १९५७ साली पहिल्यांदा करण्यात आली होती.

## हक्काच्या घराचे स्वप्न भंगले

६५० जणांनी विकासकाला पैसे दिले. मात्र, ती जागा नैना अंतर्गत गेली असून तो कॉमन चाळीचा प्रकल्प होता. त्यामध्ये रस्ता, गार्डन आदी सुविधा उपलब्ध करणे होते. परंतु, परवडत नाही, असे सांगून विकासकाने स्वप्नपूर्ती होम्स बांधण्याच्या कामाला ब्रेक दिला. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर अनेकांनी त्यांच्या कार्यालयावर मोर्चा काढला. त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून काहींनी ग्राहक न्यायालयात धाव घेतली. मात्र, अजूनपर्यंत अनेकांना हक्काचे घर मळिाले नाही. अखेर मोझर यांच्या नावे असलेली जमीन ताब्यात घेऊन स्वतःच विकास करायचा, असा निर्णय ६५० जणांनी घेतला आहे. त्यासाठी श्रीगणेश कृपा सामाजिक असो.ची स्थापना करण्यात आली असल्याचे विक्रांत साळुंखे यांनी सांगितले.

दरम्यान, श्री गणेश कृपा सामाजिक असो.च्या नावे जमिन करण्यात यावी, या मागणीसाठी विक्रांत साळुंखे, संजय सावंत यांच्यासह अनेकांनी जिल्हाधिकारी कार्यालयात धाव घेतली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांची भेट घेतली आणि त्यांच्याकडे समस्या मांडली. तसेच, निवेदन देताना ही जागा असो.च्या नावे करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.

## गुजरात सरकारमध्ये राजकीय भूकंप

अमित शाह आणि भाजप अध्यक्ष जेपी नड्डा यांच्या उपस्थितीत होईल. सध्याच्या गुजरात मंत्रिमंडळात मुख्यमंत्री पटेल यांच्यासह १७ मंत्र्यांचा समावेश आहे. यापैकी आठ कॅबिनेट दर्जाचे मंत्री आहेत आणि तेवढेच राज्यमंत्री (एमओएस) आहेत. भाजपच्या सर्व आमदारांना दोन दिवस गांधीनगरमध्ये राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मंत्रिमंडळात समाविष्ट होण्याची अपेक्षा असलेल्या आमदारांना फोनवरून माहिती देण्यात आली आहे.

## पनवेलमध्ये वादातून चाकू हल्ला

त्यावेळी आनंद जाधव यांनी, माझे पुर्ण पैसे मला परत कर, असे बोलुन गोविंद रोठोड यांची कॉलर पकडुन त्यांना शिवीगाळ केली. हा वाद वाढत गेला आणि आनंद जाधव यांनी आपल्याजवळील चाकु गोविंद राठोड यांच्या पोटामध्ये खुपसुन गंभीर जखमी केले. याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यात आनंद जाधव यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


### जाहीर नोटीस

आमच्या अशिलांनी सांगितल्याप्रमाणे सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, मौजे कळंब ता.कर्जत जि.रायगड येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेल्या जमिन मिळकती आहेत.

**मौजे कळंब ता.कर्जत जि.रायगड**

| सर्व्हे नं | हि.नं | क्षेत्रफळ (हे-आर-चौ-मी) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ९९ | १/अ | १-७१-८०<br>एकूण क्षेत्र १-७९-८०<br>यापैकी १-०१-८० | ११.०७<br><br>६.५६ |

वर वर्णन केलेल्या मिळकती श्री आत्माराम सुदाम भगत यांचे ताबेकब्जातील व वहिवाटीखालील जमिन मिळकती आहेत. सदरची मिळकतीचा विक्री व्यवहार करायचा आहे. वरील वर्णन केलेल्या मिळकती अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, भाडेपट्टा, लिज, तबदील, ट्रस्ट, गहाण, कुळ वारस इ.कोणत्याही हक्क असलेल्या सर्व संबंधीतांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसाच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणार यांच्याकडे त्यांच्या लेखी दिलेल्या पत्त्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार दावा न आल्यास सदर मिळकती निर्वेध, बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून सदर मिळकतीचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी, दावे बंधनकारक राहणार नाहीत असे गृहित धरून सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण
दिनांक : २०/१०/२०२५

**ॲड.सुनिल बबन मेंढरे**
ऑफिस पत्ता गाळा नं.१, गणेश अर्पा.
युको बँक शेजारी, ता.कर्जत जि.रायगड ४१०२०१
८०८७३७३७९०

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे धामोते, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत त्यामिळकतीचे मालक १) हिना एस मानसेता, २) प्रविण व्ही भिमाणी, ३) आशिष रमेश मानसेता, ४) नेहा सुकेश आडतीया यांचेकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ७९ | १६ | ३२५-११ | ३२-५० |

सबब सदरबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, लिज, लिन, बक्षीस, करार, ताबेकब्जा, वहिवाट अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पूराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतेही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दि. २१/१०/२०२५.

**ॲड. सतीश धर्मा डायरे,**
पत्ता- ००२, शिवतीर्थ, सहयोग को.
ऑ.हौ.सो. ब्राम्हण आळी, नेरळ, ता.
कर्जत, जि. रायगड. मो.९८५०४०२६५७.

### जाहीर नोटीस

**तुकडी जिल्हा रायगड, पोट तुकडी तालुका कर्जत, मौजे** वर्णे येथील वर्णे ग्रामपंचायतीच्या हद्दीतील :-

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे-आ-प्र) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| 14 | 8 | 0-55-00<br>पोटखराबा 0-13-00 | 0.73 |

अशा एकूण मिळकतीपैकी क्षेत्र 0 हेक्टर 28 आर 0 प्रती ही मिळकत महसुल अधिकार अभिलेखात **श्री. मनोहर नामदेव देशमुख** यांच्या नावे दाखल असुन क्षेत्र 0 हेक्टर 20 आर 0 प्रती हे महसुल अधिकार अभिलेखात **श्री विकास परशुराम पाटील** यांच्या नावे दाखल आहे व क्षेत्र 0 हेक्टर 20 आर 0 प्रती हे महसुल अधिकार अभिलेखात **श्री किशोर बाबू आसवले** यांच्या नावे दाखल आहे.

वरील मालकांपैकी **श्री मनोहर नामदेव देशमुख** हे त्यांच्या मालकीची कब्जेवहीवाटीत असलेली क्षेत्र 0 हेक्टर 28 आर 0 प्रती ही मिळकत सर्वऋणबोजेमुक्त व बोजेविरहीत अशी विकत देण्यासाठी माझे अषिलांबरोबर बोलणी, चर्चा करीत आहेत व अशा बोलणी व चर्चेस अनुसरुन सदर मालक मिळकतीत हक्क हितसंबंध असलेल्या सर्व व्यक्तींना सामिल करुन माझे अशिलांबरोबर करार मदार, कुलमुखत्यारपत्र, फरोक्तखत व तत्सम अनुषंगीक लेखटेक, इत्यादी दस्तऐवज लिहून व नोंदवुन देण्याचे ठरवित आहेत त्यामुळे माझे अषिलांनी सदरहू 0 हेक्टर 28 आर 0 प्रती मिळकतीचे स्वामित्व तपासण्यासाठी तसेच सर्व ऋणबोजेमुक्त व बोझेविरहीत असल्यासंबंधीची खातरजमा करण्यासाठी सदरची जाहीर नोटीस देण्याची विनंती केली आहे व त्या अनुषंगाने सदरहू मिळकती संबंधी खुलासेवार जाहीर नोटीस देत आहे.

तरी सदरहू **0 हेक्टर 28 आर 0 प्रती** मिळकतींवर वा तिच्या भागावर गहाण दान, बक्षिस, फरोक्तखत, तारण, कुळवहिवाट, भाडेकरूपणाचे हक्क, विश्वस्त, वारसा, देखभाल, लीज, वहिवाट, पोटगी, साठेकरार, बयाणा वा तत्सम हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून 15 दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे लेखी पुरावे व कागदपत्रासह स्वरुप विशद करून खालील सही करणार यांच्या पत्यावर लेखी कळवावे. वरील मुदतीत कुणाकडून काही लेखी हरकत, तक्रार व दावा न आल्यास मिळकत निर्वेध व बोजेविरहित आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागून आलेल्या तक्रारी, दावा व हरकती या रद्दबातल आहेत असे समजण्यात येतील.

पत्ता: 105, पहिला मजला, विकास हाईटस्,
संतोषीमाता रोड, कल्याण (प), जि.ठाणे,
टेलिफोन नं. (ऑफीस) 2327447, 2322526

सही/-
**शैलेंद्र द. जल्लावार**
वकील

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने कळविणेत येत की, खाली नमुद केलेली शेतजमिन मिळकत ही या खाली दिलेल्या जमिन मालक यांचे नावावर ७/१२ उतारा सदरी महसुल दप्तरी नांवे असून त्या त्यांचे खुद्द ताबा कब्जा मालकी वहिवाटीतील आहे त्या शेतजमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मौजे उसर, ता.रोहा, जि.रायगड येथील**

| मालकाचं नांव | गट नं | एकूण क्षेत्र हे.आर. | आकार रू.पै. | प्रकार |
|---|---|---|---|---|
| श्री.अनिलकुमार केशव कदम | १८८/१ | वरकस ४-७७-००<br>पो.ख.०-३१-००<br>एकूण ५-०८-०० पैकी<br>लिहून देणार यांच्या<br>हिश्याचे क्षेत्र ०-४८-० | ३.४४<br><br><br><br>०.३५ | वर्ग १ |

वरील मिळकतीसंबंधात आमचे अशिल श्री.सुनिल विष्णु पाटील यांनी जमिन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे. यास्तव वरील मिळकतीवर अन्य कोणाचा गहाण, दान, लिज, फरोक्त, साठेकरार, अखत्यार, लिज, चार्ज ॲटॅचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, ताबा, कब्जा, वहिवाट, वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, वाद तंटा, चालु असल्यास किंवा या व्यववहारास कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी आपल्या हरकती लेखी कागदापेत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (१५) पंधरा दिवसांत लेखी स्वरूपात दाखल करावी. अशा मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास उपरोक्त मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आवश्यक कागदपत्रे सादर करून खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करणेत येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

दि.२१/१०/२०२५

सही/-
**ॲड.प्रेरित पी.वलिवकर**
रा.''यशवंत'' आदर्श नगर, सहकारी गोडाऊन जवळ,
मु.भुवनेश्वर, पो.वरसे, ता.रोहा, जि.रायगड
मोबा क्र.८४१२८६९०५९

### चुकदुरूस्ती नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांची दिनांक १७ ऑक्टोबर २०२५ रोजी मौजे-कुशिवली, तालुका-कर्जत, जि.रायगड येथील सर्व्हे नं.४३ हिस्सा नं.१/ड क्षेत्र ०-१०-९० आकार रू. पै. ०-०१ या मिळकतीची जाहीर नोटीस प्रसिद्ध केलेली होती परंतु, सदर नोटीस मध्ये सर्व्हे नं.४३ हिस्सा नं. १/ड च्या ऐवजी सर्व्हे नं.४३ हिस्सा नं. १/ब असे आलेले आहे. तरी सदर जाहीर नोटीशी नुसार सर्व्हे नं.४३ हिस्सा नं.१/ड असे वाचण्यात यावे.

दि. २०/१०/२०२५

अधिवक्ता
**शैलेश दत्तात्रेय पवार**
पत्ता. घर क्र. ३, नेमीनाथ हाईट्स शेजारी,
मुद्रे बु. कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड,
मो. ९५९५२११८६७

### जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक भगवान नामदेव घोडे उर्फ भगवान नामदेव पाटील यांचेकडून कायम मालक हकाने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहकाची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र, तरी देखील कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे आशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव गाण तर्फे श्रीगांव, तालुका अलिबाग, जिल्हा - रायगड येथे स्थित खाली दिलेल्या तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे :

| अनु.क्र. | गट क्र. | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) |
|---|---|---|
| १. | १४ | ००.०१.०० |
| २. | १६/१/अ | ०४.२९.०० |
| ३. | १६/१/ब | ००.०३.०० |
| ४. | २० | ०२.०७.०० |
| ५. | २१/२ | ००.६०.७० |
| ६. | २२ | ०१.२३.०० |
| ७. | २४ | ००.१२.०० |
| ८. | २५ | ००.३३.०० |
| ९. | २६ | ००.१४.०० |

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २१/१०/२०२५
**झुंजारराव आणि कं. करीता**
**सही/-**
**विक्रांत झुंजारराव**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे धामोते, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत त्यामिळकतीचे मालक १) हिना एस मानसेता, २) प्रविण व्ही भिमाणी, ३) आशिष रमेश मानसेता, ४) नेहा सुकेश आडतीया यांचेकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ७९ | १५ | ३१२-११ | ३१-२० |

सबब सदरबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, लिज, लिन, बक्षीस, करार, ताबेकब्जा, वहिवाट अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पूराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतेही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दि. २१/१०/२०२५.

**ॲड. सतीश धर्मा डायरे,**
पत्ता- ००२, शिवतीर्थ, सहयोग को.
ऑ.हौ.सो. ब्राम्हण आळी, नेरळ, ता.
कर्जत, जि. रायगड. मो.९८५०४०२६५७.

### जाहीर नोटीस

सर्व संबंधित व्यक्ती, संस्था आणि हितधारकांस सूचित करण्यात येते की: मौजे मुशेत, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खाली नमूद केलेल्या जमिनीचे आमचे आशिलाने खरेदी करण्याचे ठरवले असून खाली नमूद करण्यात आलेल्या जमिनीबाबत जर कोणत्याही व्यक्ती, संस्था, ट्रस्ट, सहकारी संस्था, कूळधारक, खरेदीदार, मुद्रक, गहाणदार, तारणदार, भाडेकरू किंवा इतर कोणालाही काही हक्क, स्वत्व, दावा, अडचण, अडथळा किंवा कोणताही कायदेशीर संबंध असेल, तर त्यांनी या नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत योग्यत्या लेखी पुराव्यासह आपल्या हरकती खालील पत्त्यावर सादर कराव्यात.

जर दिलेल्या मुदतीत कोणतीही हरकत प्राप्त झाली नाही, तर सदर जमीन निर्विघ्न आणि निर्विवाद आहे असे मानले जाईल आणि आमचे आशिल त्यानुसार खरेदी व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या कोणत्याही हरकती आमच्या आशिलावर कायदेशीरदृष्ट्या बंधनकारक राहणार नाहीत, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन:**
**मौजे मुशेत, ता. अलिबाग, जि. रायगड**

| अ. क्र. | गट क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १. | १२८ | ०-२१-८०+०-०३-५०<br>एकूण क्षेत्र ०-२५-३० | ०.९० | मंगेश अनंत आमले |
| २. | १२९ | ०-०२-८०+०-००-५०<br>एकूण क्षेत्र ०-०३-३० | ०.६९ | सुनीता श्रीकांत आमले<br>स्वराली श्रीकांत आमले<br>आयुषी अभिजीत माईणकर |

अलिबाग
दि. २०-१०-२०२५

**ॲड. सचिन जोशी**
मो.: ९८२२६५३६५५

**ॲड. साकेत सचिन जोशी**
मो.: ८६९८८४५५६२

**कार्यालयीन पत्ता -** दुसरा मजला, फ्लॅट क्र.३, साईलिला सोसायटी, डॉ.कुमठेकर हॉस्पिटल शेजारी, श्रीबाग नं.२, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड - ४०२२०१

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे मांडला, ता.मुरुड, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. निलेश गोविंद थळे रा. १०६/ए-विंग, गौरी वैकुंठ व्हिला को. ऑप. हौसींग सोसायटी, सुभाष रोड, चिंचोली पाडा, डोंबिवली-पश्चिम, कल्याण, ठाणे, विष्णुनगर, महाराष्ट्र यांच्या मालकीहक्काची व त्यांचे कब्जातील खालील वर्णन केलेली मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशा आशयाचा साठेकरार विद्यमान मालकांबरोबर झाला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा हवाला विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्र.व उपविभाग क्र. | हि.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|
| मांडला | १९१/१/१ | | ०-३३-४० | ०.३४ |
| ता.मुरुड | | पो.ख. | ०-०७-६० | |
| | | एकूण | ०-४१-०० | |

वर नमूद मिळकतीपैकी श्री. निलेश गोविंद थळे यांचे मालकीच्या गट क्र. १९१/१/१, क्षेत्र ०-१६-८० हे. आर., पो.ख. ०-०४-२० हे.आर. एकूण क्षेत्र ०-२१-० हे.आर., आकार रु. ०.१८ पैसे ही मिळकत व या मिळकतीमधील ग्रुप ग्रामपंचायत मांडला, ता. मुरुड येथील मालमत्ता क्र.५१६, क्षेत्र ४३२.९६ चौ.फूट (४०.२३ चौ.मी.) या जोता मिळकतीबाबत

तरी सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, ताबा कब्जा, भाडेपट्टा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकतीबाबत कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे गृहीत धरुन माझे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : २०/१०/२०२५

सही /-
**ॲड. नितीन हरिश्चंद्र पाटील**
रा.उत्कर्ष बंगला, श्रीबाग नं.२, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड.
मो. ९४२२६९०८४२

अशिलांची सही.
सही/-
शेतकऱ्यांची सही

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची निवासी सदनिका मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

अलिबाग नगरपरिषद हरीतील मौजे अलिबाग, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील ठिकरूळ नाका परिसरातील सिटी सर्व्हे नं.५४३,५४१/१,५४१/२, ५४१/३,५४१/४,५४१/५ आणि ५४१/६ या बिनशेती मिळकतीवर बांधण्यात आलेल्या ''चैतन्य सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. अलिबाग'' या इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका क्र.१८ (२०७), क्षेत्रफळ ४३९.५ चौ. फुट., (कारपेट) (अलिबाग नगरपरिषद मालमत्ता क्र. ALB000000515)

सदर नोटीसीचा विषय असलेली निवासी सदनिका मिळकत ही विद्यमान मालक श्रीमती. प्रशा शशिकांत भट (लग्नानंतरचे नाव), (प्रमिला हरजीवन जानी (लग्नापुर्वीचे नाव) यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस पुर्ण कायदेशिर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या निवासी सदनिका मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची निवासी सदनिका मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे.

ठिकाण- अलिबाग
दिनांक : २०/१०/२०२५
मोबा. नं. ९८५०२६८३५०

**ॲड. अभिजीत प्र बागवे**
जिल्हा न्यायालय रायगड अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड,

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी खालील वर्णनाच्या मिळकती, त्या मिळकतींचे मालक सागर बाळू तवळे यांचेकडून विकत घेणेचे ठरविल्या आहेत.

| गावाचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे. आर. |
|---|---|---|---|
| बामणोली | ३ | १/ब | ०-२५-०० |
| वांजळे | ११०<br>(आकारफोड अंमल झालेनंतर नवीन सर्व्हे नंबर १०१/१अ) | १ | ०-६४-००<br>पैकी<br>०-१६-०० |

सबब सदर मिळकतींच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून त्या मिळकतींचे मालकांबरोबर, पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- २१/१०/२०२५

**ॲड. सी.बी.ओसवाल**
बी.कॉम.एल.एल.बी.
दिनकर - निमकर अपार्टमेन्ट
बाजारपेठ कर्जत, ता. कर्जत,
जि. रायगड - ४१०२०१.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल श्रीमती.प्रज्ञा शशिकांत भट (लग्नानंतरचे नाव), (प्रमिला हरजीवन जानी (लग्नापुर्वीचे नाव) यांचे मालकीची खालील वर्णनाचे निवासी सदनिका मिळकत असुन सदर मिळकती संदर्भात मा.दुय्यम निबंधक साो अलिबाग यांचे कार्यालयात दिनांक २५ एप्रिल १९९४ रोजीचा ॲग्रीमेंन्ट टू सेल दस्त क्र. अलब ६६३/१९९४, हा गहाळ झाला आहे.

अलिबाग नगरपरिषद हद्दीतील मौजे अलिबाग, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील ठिकरूळ नाका परिसरातील सिटी सर्व्हे नं.५४३,५४१/१,५४१/२,५४१/३,५४१/४,५४१/५ आणि ५४१/६ या बिनशेती मिळकतीवर बांधण्यात आलेल्या ''चैतन्य सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. अलिबाग'' या इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका क्र.१८(२०७), क्षेत्रफळ ४३९.५ चौ. फुट.,(कारपेट) (अलिबाग नगरपरिषद मालमत्ता क्र. ALB000000515)

तरी कोणालाही सदर दस्त आढळुन आल्यास खालील नमुद आमचे पत्त्यावर आणुन द्यावा हि विनंती.

ठिकाण- अलिबाग
दिनांक- २०/१०/२०२५
मोबा. नं. ९८५०२६८३५०

**ॲड. अभिजीत प्र. बागवे**
जिल्हा न्यायालय रायगड अलिबाग
ता.अलिबाग, जि. रायगड,

### जाहीर नोटीस

या नोटीसद्वारे जाहीर करण्यात येते की, माझे पक्षकार डॉ. नेविल्ल रोहिन्टन देवळीलीयाला हे खालील वर्णनाप्रमाणे कृषी उपयोगी जमिन मालमत्ता विकत घेऊ इच्छितात, ही मालमत्ता श्री. फिरोझ अदी वकील, श्रीमती शेरनाझ फिरोज वकील, श्री. जहांगीर फिरोज वकील आणि कु. मेहेर फिरोज वकील सर्व राहणार शामियाना वाळकेश्वर रोड, मुंबई ४००००६ यांचे नावे आहे. वरील सर्वांनी माझ्या पक्षकाराच्या अशा निदर्शनास आणून दिले आहे की, ते सर्व संबंधित मालमत्तेचे संयुक्त मालक असून सदर मालमत्तेचा ताबा त्याच्याकडे आहे याकरिता त्यांनी संबंधित मालमत्तेचा ७/१२ चा उतारा व टी.आय.एल.आर. प्लान दिला आहे. टी.आय.एल.आर.प्लान शासकीय सर्वेक्षकाकडून तयार करण्यात आला असून त्यात उत्तरेच्या भागाकडे श्रीमती अनुराधा रघुनंदन काशीकर रा.दादर (पूर्व) यांचे ०-०५-० हे अतिक्रमण दाखविण्यात आले आहे. या संदर्भात मा. न्यायालय, वरिष्ठ दिवाणी न्यायालय, अलिबाग, रायगड यांनी विशेष दिवाणी खटला क्र. ९०/२००८ मध्ये निकाल दिला असून अतिक्रमण काढण्याचा आदेश दिला आहे. संदर्भिय मालमत्तेच्या दुसऱ्या एका भागात श्री. सामी दारा लाला, श्रीमती पुल सामी लाला, श्री. रिशाद सामी लाला आणि कु. रसना सामी लाला यांचे ०-१२-५ हे. अतिक्रमण आहे. या दोन अतिक्रमणांशिवाय विक्रेत्यांनी या मालमत्तेवर कोणत्याही प्रकारचा बोजा नसल्याचे म्हटले आहे.

संदर्भिय मालमत्तेबाबत आणि/किंवा मालमत्तेच्या भागाबाबत कोणी व्यक्ती, संस्था, बँक, वित्तीय संस्था, कायदेशीर अस्तित्व लाभलेली संस्था यांना हक्क, हितसंबंध, बोजा, कायदेशीर हक्क, काही अडथळा असल्यास त्यांनी त्यांचा आक्षेप खालील सही करणार यांच्याकडे मुळ कागदपत्र, पुराव्यासह नोटीस प्रसिद्ध झाल्याचे ७ दिवसांचे आत सादर करावे, अथवा याबाबत माझे पक्षकारांच्या वतीने कोणताही हक्क, हितसंबंध, बोजा, कायदेशीर हक्क, अस्तित्वात असलेल्या अथडळयांसह हितसंबंध नसल्याचे गृहीत धरण्यात येऊन संदर्भिय मालमत्तेच्या व्यवहाराची प्रक्रिया दावा/आक्षेप गृहित न धरता पूर्ण करण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन**

पूर्ण कृषक जमिन मालमत्ता ०-८०-० हेक्टर सह विहिर आणि एक फार्म हाऊस, वासह सर्व वस्तू, मालकीच्या वस्तू यासह इतर सुविधांबाबतचे हक्क आणि सामायिक रस्ता, वहिवाट वापरण्याचे हक्क आदी महसूल सर्व गट क्र.४००, हिस्सा क्र.२ आणि ठरविल्यानुसार ०.७८ पैसे ग्राम नांदगाव, तालुका मुरुड, जि. रायगड, चतु:सिमा पूर्वेस गट क्र. ४००/३ आणि गट क्र.४०० चा काही भाग. पश्चिमेस गट क्र. ४००/१, उत्तरेस गट क्र. ४०४ आणि गट क्र. ४०३च्या जमिनीचा भाग, दक्षिणेस गट क्र. ४००/१ व गट क्र. ४००/३ चा जमिनीचा भाग.

**यतीन आर.शाह**
ॲडव्होकेट आणि सॉलिसिटर
११२, दुसरा मजला, २४बी, राजा बहादुर कम्पाऊंड,
अंबालाल जोशी मार्ग, फोर्ट, मुंबई-४००००१


### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



**मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# पुलासाठीचा करोडोंचा खर्च पाण्यात?




**| नेरळ | प्रतिनिधी |**

**माथेरान नेरळ कळंब राज्यमार्ग रस्त्यावरील दहिवली मालेगाव येथे उल्हास नदीवर नवीन पूल बांधला जात आहे. या पुलाच्या बांधकामाला सुरुवात झाली असून, काही पिलर उभे राहिले आहेत. मात्र, त्या पिलरखालील कॉंक्रिटीकरण पावसाच्या पाण्यात वाहून गेले आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग ठेकेदाराचे चोचले पुरविण्यासाठी कार्य करते काय? असा प्रश्न निर्माण झाला असून, बांधकाम विभाग जनतेसाठी काम करतो की ठेकेदारासाठी असा प्रश्न स्थानिक वाहनचालक उपस्थित करू लागले आहेत.**

माथेरान नेरळ कळंब राज्यमार्ग रस्त्यावर असलेल्या उल्हास नदीवर दहिवली मालेगाव येथे असलेला जुना पूल ४० वर्षे पूर्वी बांधण्यात आलेला आहे. त्यात त्यावेळी बांधलेला पूल हा कमी उंचीचा असल्याने दरवर्षी पावसाळ्यात या पुलावरील महापुराची पाणी वाहून जाते आणि त्यामुळे पुलावरून होणारी वाहतूक बंद होते. त्यामुळे उल्हास नदीवर नवीन पूल बांधण्यात यावा, अशी मागणी अनेक वर्षे सुरु आहे. त्यानुसार राज्य सरकारकडून नवीन पूल उभारण्याच्या कामाला मंजुरी मिळावी आहे. आ. महेंद्र थोरवे यांच्याकडून या पुलाची मागणी गेली पाच वर्षे सरकारकडे होत होती. या पुलाची गरज असताना आणि दरवर्षी पावसाळ्यात हा पूल चार ते पाच वेळा पाण्याखाली जात असल्याने पुलाचे बांधकाम तकलादू बनले आहे. यावर्षी तर पुलावरून अवजड वाहनांना बंदी घालण्याची वेळ जिल्हा प्रशासनावर आली होती.

**दहिवली मालेगाव पुलाचे काम जनतेसाठी सुरु आहे की ठेकेदासाठी असा प्रश्न आम्हला पडला आहे. या पुलाचे बांधकाम सुरु होऊन दीड वर्षे पूर्ण झाली आहेत. मात्र, पुलाचे बांधकाम पूर्ण होण्याची कोणतीही लक्षणे दिसून येत नाहीत. पुलाचे खांबदेखील उभे करून घेण्यात बांधकाम खाते निष्प्रभ ठरले आहे. २०२४मध्ये पुलाच्या कामाला झाली असून, दीड वर्षात पुलाची उभारणी दूर; पण पुलाचे खांबदेखील उभे राहिले नसल्याने ठेकेदाराला काळ्या यादीत टाका.**

**– श्रावण जाधव, रिक्षाचालक**

२०२४ पासून या पुलाच्या बांधकामाला सुरुवात झाली असून, ठेकेदार कंपनीसाठी हा पूल बांधला जात आहे की वाहने आणि जनतेसाठी? हा प्रश्न अनुत्तरित राहिला आहे.पुलाचे काम अत्यंत संथगतीने सुरु असतानादेखील बांधकाम विभाग संबंधित कामाचा ठेका घेणारे ठेकेदार कंपनीला नोटीस देण्याची तसदी घेत नाही. त्याचवेळी पुलाचे कामासाठी १८ महिन्यांचा कालावधी संपून गेला तरी पुलाचे अर्धे कामदेखील पूर्ण झालेले नाही, अशी स्थित उल्हास नदीवरील या पुलाची झाली आहे. सार्वजनिक बांधकाम खात्याचे दहिवली मालेगाव पुलाचे काम करणाऱ्या ठेकेदार कंपनीवर नियंत्रण नसल्याने दीड वर्षात केवळ आठ पिलर उभे करण्याशिवाय कोणतेही काम झाले नाही. त्यात पुलाचे सर्व पिलरदेखील बांधकाम विभाग उभे करून घेण्यात यशस्वी ठरलेला नाही. आता तर आणखी कठीण समस्या निर्माण झाली असून, पुलाच्या कामासाठी बांधण्यात आलेल्या पिलारचे पायाजवळील सिमेंट कॉंक्रिटीकरण पावसाळ्यात वाहून गेले आहे. त्यामुळे पिलरला धोका निर्माण झाला असून, पुलाची उभारणी पूर्ण झालेली नसताना दहिवली मालेगाव येथील पुलाची ही स्थिती वाहनचालक यांच्या पोटात गोळा निर्माण करणारी ठरत आहे.

## वयाळ-लोधीवली रस्ता प्रकरणात तात्पुरता तोडगा

### तहसीलदारांच्या हस्तक्षेपाने ग्रामस्थांचे आंदोलन स्थगित



**| रसायनी | प्रतिनिधी |**

खालापूर तालुक्यातील वयाळ ते लोधीवली या रस्त्याच्या दुरवस्थेवरून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यात चालू असलेला वाद अखेर तहसीलदार अभय चव्हाण यांच्या मध्यस्थीने तात्पुरता निवळण्यात आला आहे. या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी मार्ग शोधण्याच्या उद्देशाने तहसीलदारांनी त्यांच्या दालनात दोन्ही विभागांच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन नोव्हेंबर महिन्यात तात्काळ पाहणी व काम सुरू करण्याचे निर्देश दिले आहे.

गेल्या तीन-चार वर्षांपासून लोधीवली ते वयाळ रस्ता अत्यंत खराब स्थितीत असून, या मार्गावरून प्रवास करणे धोकादायक झाले आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पाईपलाईन कामामुळे रस्ता उद्ध्वस्त झाला असून, त्यामुळे स्थानिक ग्रामस्थांचा आक्रोश वाढला आहे. दोन विभागांच्या वादात ग्रामस्थ मात्र पिचले गेले आहेत.

पालकांना शाळेच्या गेटपर्यंत मुलांना सोडावे लागत होते, तर पावसाळ्यात रस्त्याची अवस्था बिकट बनते. याच कारणामुळे ग्रामस्थांनी तहसीलदारांची भेट घेऊन तातडीने तोडगा काढण्याची विनंती करण्यात आली होती. तहसीलदार अभय चव्हाण यांनी तातडीने बैठक बोलावून दोन्ही विभागांना जबाबदार धरत स्पष्ट निर्देश दिले की, नोव्हेंबरमध्ये प्रत्यक्ष पाहणी करून काम सुरू करावे. त्यांच्या मध्यस्थीमुळे वयाळ ग्रामस्थांचे प्रस्तावित तीव्र आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे.

या बैठकीस महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, पंचायत समिती खालापूर, निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड, मंडळ अधिकारी माणिक सानप, ग्राम महसूल अधिकारी मधुसूदन पापटवार, ग्रामपंचायत अधिकारी गोकुळदास राठोड यांच्यासह सरपंच रमेश गायकवाड, उपसरपंच रोशन गायकवाड, विनोद भोईर, प्रमोद पवार, अर्जुन पवार, अनिल पवार, समीर म्हात्रे, देवा पवार, अक्षय म्हात्रे, जनार्दन पवार, दिगंबर मापाडी, अमर ठाकूर, रुपेश पवार, नितीन ठाकूर, भूषण म्हात्रे, भरत म्हात्रे, मारुती पवार, अनंता पवार, अशोक पवार, दिनेश पवार, अतिष ठाकूर, अतिष म्हात्रे, अनंता म्हात्रे, सुरेश देशमुख, महेंद्र पवार, संदीप म्हात्रे, सागर म्हात्रे, पंकज पवार, दर्शन म्हात्रे, शुभम म्हात्रे, रामदास पाटील, समीर पवार, गणेश पवार, जय पवार, दत्ता पवार, अमोल पवार, कल्पश पवार यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सणासुदीला झेंडूच्या भावात घसरण

**| पनवेल | प्रतिनिधी |**

दसऱ्याला किरकोळ बाजारात झेंडूला किलोला १२० ते १६० रुपयांचा भाव होता; पण सध्याच्या दिवाळी सणामध्ये १०० ते १२० रुपये किलो आहे. फुलांच्या भावातील घसरण २० ते २५ टक्के असली तरी सणासुदीला भावात घसरण झाल्याने विक्रेते हवालदिल झाले आहेत.

दसऱ्याच्या दिवसांमध्ये पहिल्या बहरातील फुलांचे उत्पादन बाजारात येते. आता शेतातील फुलांचे उत्पादन शेवटच्या टप्प्यात असल्याने दर्जेदार फुले बाजारात येत नसल्याचे व्यापारी सुनील वायकर यांनी सांगितले. शिवाय, फुलांच्या आकारमानानुसार बाजारात कमी-जास्त प्रमाणात भाव आकारला जात आहे. त्यामुळे दसरा सणात घाऊक बाजारात १०० ते १२० रुपये किलोने विकली जाणारी झेंडूची फुले दिवाळी सणात ७० ते १०० रुपये भावाने फुले विकली जात आहेत; मात्र बाजारात दर्जेदार फुलांचा पुरवठा होत असताना अपेक्षित भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये निराशा आहे. किरकोळ बाजारात गावाकडून काही शेतकरी फुले विक्रीसाठी टेम्पोत घेऊन आल्याने झेंडूच्या फुलांना आकारमानानुसार ६० ते ८० रुपये प्रतिकिलोने होत आहे. दसऱ्याला २०० ते २२० रुपये असणारी शेवंतीची फुले १२० ते १५० रुपये किलो भावाने विकली जात आहेत.

## पेणमध्ये जमिनीची चोरी

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

शेतकऱ्याच्या आजोबाने विकत घेतलेल्या २९ गुंठे जमिनीपैकी शून्य गुंठेदेखील जमीन शिल्लक राहिली नाही. त्यामुळे ही जमीन कुठे गेली, असा सवाल पेणमधील शेतकऱ्यांनी उपस्थित केला आहे. याबाबत भूमी अभिलेख कार्यालयात तक्रार करूनही कोणतीही दखल घेण्यात आली नाही. त्यामुळे खारपाले येथील वयोवृध्द शेतकरी दामोदर ठाकूर, महिला शेतकरी अरुणा ठाकूर उपोषणाच्या पवित्र्यात आहेत. दिवाळीनंतर बुधवार, दि.२९ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाला बसणार असल्याचा इशारा अरुण ठाकूर यांनी दिला आहे.

अरुण ठाकूर यांनी दिलेल्या माहितीनुसार, खार म्हैसबाड हद्दीतील स.नं. ६७ ही २९ गुंठे शेतजमीन अरुण ठाकूर यांच्या आजोबांनी ९ जून १९५३ मध्ये गोवर्धन कानकिया यांच्याकडून कायम खरेदी खताने विकत घेतली होती. १९६१मध्ये झालेली पोट हिस्सा मोजणी चुकीची असल्याचे ठाकूर यांनी पेण येथील भूमीअभिलेख व उपविभागीय अधिकारी, तहसील कार्यालयांकडे तक्रार केली. मात्र, आजपर्यंत कोणीही दखल घेतली नाही. २०१३ मध्ये पनवेल-इंदापूर महामार्गासाठी उरलेली जमीन संपादित केली असून, २९ गुंठ्यांममधून शून्य गुंठे जमीन शिल्लक आहे. त्यामुळे शेतकरी भूमीहीन झाले आहेत. विकत घेतलेली जमीन कुठे गेली, असा सवाल उपस्थित करण्यात आला आहे. न्याय्य हक्कासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाला बसणार असल्याचा इशारा अरुण ठाकूर यांनी दिला आहे.

## निवडक



### महाळुंगे येथे मोफत आरोग्य शिबीर

**चणेरा :** मुरुड तालुक्यातील महाळुंगे (बुद्रुक) गावचे समाजसेवक कै. शशिकांत पारवे यांच्या स्मरणार्थ पारवे परिवाराने मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन केले होते. शिबिरास पंचक्रोशितील रुग्णांचा भरघोस प्रतिसाद मिळाला. २०० हून अधिक रुग्णांनी त्याचा लाभ घेतला. या शिबिरास कूपर रुग्णालय (मुंबई) येथील डॉ. शशिकांत म्हशाळ, डॉ. धनश्री बी., डॉ. वरुण मालपाणी, डॉ. राहुल शेनॉय, डॉ. रोशनी मोहंती (हे सर्व कान, नाक, घसा तज्ज्ञ) तसेच जळगाव येथून डॉ. धनंजय बेंद्रे (बालरोग तज्ज्ञ), डॉ. सुनिती बेंद्रे (स्त्रीरोग तज्ज्ञ) आणि मुंबई येथून डॉ. आदित्य बेंद्रे (अस्थीरोग तज्ज्ञ), डॉ. मनाली बेंद्रे (रेडिओलॉजिस्ट), बोर्ली येथून स्थानिक डॉ. अन्सार चोगले व डॉ. मानसी दिवेकर आदींनी रुग्णांना मोफत सेवा पुरवली. आपटे-पनवेल येथील अमित वग्रे यांनी विविध रोगांवरील औषधे उपलब्ध करुन दिली. यादव गवळी समाजातील वाघोली गावचे डॉ. रवींद्र वालेकर यांनी त्यांच्याकडील उपयुक्त साधनसामुग्री उपलब्ध करुन दिली. तसेच शिबिराबाबत मार्गदर्शन केले. सकाळी १० ते २ ह्या वेळेत पार पडलेल्या शिबिराचे उद्घाटन सुरेश म्हात्रे यांच्या हस्ते झाले. उपस्थित डॉक्टरांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. पंचक्रोशीतील उपस्थित मान्यवरांचाही गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. शिबिराचे उद्घाटन कार्यक्रमप्रसंगी प्रमुख अतिथी डॉ. शशिकांत म्हशाळ यांनी श्रद्धांजलीपर भाषण केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निवृत्त मुख्याध्यापक दांडेकर गुरुजी यांनी केले.



### जिल्हाध्यक्षपदी प्रदीप ओव्हाळ

**अलिबाग :** राजकीय, सामाजिक आदी क्षेत्रांमध्ये उत्तुंग भरारी घेणारे प्रदीप ओव्हाळ यांची रिपब्लिकन सेनेच्या रायगड जिल्हा अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. राष्ट्रीय नेते आनंदराज आंबेडकर यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन ओव्हाळ यांचा सन्मान करण्यात आला. मुंबई येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे हा कार्यक्रम पार पडला. प्रदीप ओव्हाळ हे अलिबाग तालुक्यातील कुरूळ येथील रहिवासी आहेत. त्यांनी अगदी कमी वयातच राजकीय, सामाजिक क्षेत्रात काम करण्यास सुरुवात केली. वंचित घटकाचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी त्यांनी आरोग्य, शिक्षण अशा विविध विभागांत पाठपुरावा केला. त्यांच्या कार्याची दखल घेत वंचित बहुजन आघाडीच्या जिल्हा उपाध्यक्षपदी, त्यानंतर अध्यक्षपदी त्यांची निवड करण्यात आली. भारिप बहुजन महासंघ या पक्षाचे जिल्ह्याचे नेतृत्वदेखील त्यांनी केले. ग्रामीण भागातील तरुणांना एकत्र आणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्याचा त्यांनी प्रयत्न केला. प्रदीप ओव्हाळ यांच्याकडे रिपब्लिकन सेना जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. पक्षाचे नेते आनंदराज आंबेडकर यांनी दिलेली जबाबदारी विश्वासाने पार पाडून पक्षवाढीसाठी मेहनत घेणार, असा विश्वास प्रदीप ओवाळ यांनी पत्रकारांशी संवाद साधताना व्यक्त केला.

### ‘दिवाळी पहाट’मुळे उरणकर मंत्रमुग्ध

**उरण :** महेश बालदी मित्र मंडळाच्यावतीने ‘दीपोत्सव उरणचा, जल्लोष आनंदाचा’ हा दिवाळी पहाट कार्यक्रम सोमवार, दि.२० ऑक्टोबर रोजी सकाळी ६ वाजता उरण नगरपरिषदेच्या विमला तलाव येथे मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमादरम्यान संगीत, संस्कृती आणि सणांची सुंदर सांगड अनुभवायला मिळाली. पहाटेच्या सुरेल मैफलीत समस्त उरणकर मंत्रमुग्ध झाल्याचे दिसून आले. या दीपावलीच्या शुभदिनी उरणकरांना संगीताची बहारदार मेजवानी मिळाली. या कार्यक्रमात गायक गणेशबुवा गोंधळी (वावंजे), गायिका संध्या घाडगे (पनवेल), गायिका स्नेहल पाटील (परगाव) आदी कलाकारांनी गाणी सदर केली. तर, धीरेंद्र ठाकूर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आमदार महेश बालदी, पनवेलचे उद्योजक जे.एम.म्हात्रे, उद्योजक सदानंद गायकवाड, नीता महेश बालदी, महाराष्ट्र परिषद सदस्य रवी भोईर, माजी नगरसेवक तथा उरण शहर भाजप अध्यक्ष कौशिक शाह, माजी नगराध्यक्ष सायली म्हात्रे, निलेश पाटील, राजेश ठाकूर, प्रियांका पाटील, हितेश शाह, हस्तीमल मेहता, मनन पटेल, मनोहर सहतिया, अजित भिंडे, मकरंद पोतदार, सुनील पाटील, जितेंद्र घरत, रवी कुळकर्णी, निखिल माळी, कुणाल शिसोदिया, संतोष ओटवकर आदी मान्यवर उपस्थित होते.

**भोंगळवाडीवर दिवाळी साजरी | पेण फोटोग्राफर असोसिएशनने जपली सामाजिक बांधिलकी**

## आदिवासी मुलांना फराळ, फटाके वाटप

**| खरोशी | प्रतिनिधी |**

‘एक दीपावली, आदिवासी मुलाबाळांसाठी’ या संकल्पनेतून रायगड फोटोग्राफर अँड व्हिडिओग्राफर असोसिएशनसोबत संलग्न असलेल्या पेण फोटोग्राफर असोसिएशनकडून पेण येथील भोंगळवाडी आदिवासी वस्तीवर ५५ कुटुंबांना दीपावलीचे फराळ, मुलांना छोटे फटाके व येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य आणि खाऊचे वाटप करून दिवाळीचा आनंद द्विगुणित करण्यात आला.



हे सामाजिक कार्य करत असताना त्या माता-भगिनींच्या आणि त्यांच्या कुटुंबाच्या चेहऱ्यावरील हास्य पाहून यावर्षी दिवाळीचा आनंद मिळाला तो आजपर्यंत कधीच मिळाला नव्हता, असे मनोगत रायगड फोटोग्राफर असोसिएशनचे अध्यक्ष समीर भायदे यांनी व्यक्त केले.

गेली अनेक वर्षे पेण फोटोग्राफर असोसिएशन हा उपक्रम राबवत आहे. यासोबत समाजोपयोगी कामे करत आहे. यापूर्वीही तालुक्यातील विविध आदिवासी भागात जवळपास ८००हून अधिक गरजूंना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. अशाच गरीब व गरजूंना मदत करून दिवाळी साजरी करण्याचा असोसिएशनने संकल्प पूर्ण करून आज पूर्णत्वास आला असल्याने प्रत्येक पदाधिकारी आणि सदस्यांना समाधान वाटले.

यावेळी रायगड फोटोग्राफर अँड व्हिडिओग्राफर असोसिएशन अध्यक्ष समीर भायदे, जिल्हा सेक्रेटरी आनंद निंबरे पेण फोटोग्राफर अध्यक्ष समाधान पाटील, नावेद खान, सागर, निलेश म्हात्रे,देवा राऊत प्रकाश माळी तसेच फोटोग्राफर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दीपावली उत्सव संपूर्ण भारतात साजरा होत असला तरी प्रत्येकाच्या घरी दिवाळीचा दिवा पेटतोच असे नाही, प्रत्येकाला नवीन कपडे, गोडधोड, स्वादिष्ट खाऊ मिळतोच असेही नाही. या अनुषंगाने हा संकल्प हाती घेऊन पेण फोटोग्राफर असोसिएशनने पूर्ण केल्याने समाजातील विविध स्तरातून संस्थेच्या या कार्याचे कौतुक होत आहे.



# गर्दी भरपूर, पण...

व्यापारी पेठांमध्ये भरपूर खरेदी झाली, दुकानांमध्ये तुडुंब गर्दी आणि झगमगाट दिसला की दिवाळी चांगली गेली असे सर्वांना वाटते. सध्या शहरांमध्ये तरी तसे चित्र दिसते आहे. यातही काही ठराविक वस्तूंना मोठ्या प्रमाणात उठाव मिळाला की, एकूण बाजारही तेजीत आहे असा कयास बांधला जातो. दुचाकी आणि चारचाकीच्या खरेदीच्या शितांवरून अर्थव्यवस्थेच्या भाताची परिक्षा केली जाते. यंदा या विक्रीला जीएसटीतील कपातीने मोठा हात दिला आहे. दुचाकी व चारचाकीवरील जीएसटी २८ वरून १८ टक्क्यांवर आणण्यात आला आहे. ही मोठी कपात आहे. साहजिकच गाड्यांच्या किमती थोड्या खाली आल्या आहेत. साधारण ७० हजारांपासून दुचाकी उपलब्ध झाल्या आहेत. तर साडेपाच लाखांना छोटी कार मिळू लागली आहे. गाड्या घेण्याची इच्छा व स्वप्न बाळगलेले असतेच. त्यासाठी पैशांची जमवाजमव चालू असते. त्यात एकदम दहा हजार ते पन्नास हजारांची कपात करून मिळाली तर हीच संधी साधायला हवी असे वाटते. सध्या भारतभरचे ग्राहक ती साधत आहेत. सप्टेंबरमध्ये दुचाकींचा खप सुमारे सात टक्क्यांनी वाढला असून २१ लाख ६० हजार गाड्या विकल्या गेल्या आहेत. चारचाकी मोटारींच्या खपाचाही विक्रम नोंदवला गेला. त्यांच्या विक्रीत सुमारे साडेचार टक्क्यांनी वाढ होऊन एका महिन्यात ३ लाख ७२ हजार मोटारी विक्री गेल्या. ट्रॅक्टरच्या विक्रीने तर कमाल केली आहे. त्यावरील जीएसटी १२ टक्क्यांवरून ५ टक्क्यांवर आणल्याने ट्रॅक्टर बरेच स्वस्त झाले. त्यामुळे त्यांच्या विक्रीत तब्बल ४५ टक्क्यांची वाढ झाली व १ लाख ४६ हजार ट्रॅक्टर्स विकले सप्टेंबरात विकले गेले. विशेष नोंदवण्यासारखी बाब म्हणजे हरितक्रांतीने समृध्द झालेल्या पंजाब व हरियाणात यंदा अभूतपूर्व असा पूर आला होता. शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. राजस्थान, गुजरात, उत्तर प्रदेश इथेही काही काळ पूर होता. महाराष्ट्रात मराठवड्यासह तब्बल ३१ जिल्ह्यांमध्ये पावसाने हाहाकार माजवला. तरीही ट्रॅक्टरच्या विक्रीत झालेली वाढ विलक्षण म्हणायला हवी.

## ट्रॅक्टर घेणारे कोण?

अर्थात, ट्रॅक्टर खरेदी करणारे लोक हे निव्वळ शेतकरी असतीलच असे सांगता येत नाही. कुठल्या तरी सरकारी योजनेतून कर्जप्रकरण करून ट्रॅक्टर घेऊन नंतर ते भाड्याने देण्याचा व्यवसाय करणारे लोकही यात मोठ्या प्रमाणात असू शकतील. राजकीय पक्षाचे कार्यकर्ते, मंत्री व आमदारांच्या जवळ वावरणारे लोक यांना हा बिनभांडवली भाड्याचा धंदा परवडू शकतो. दुसरीकडे गाय, बैल पाळणे इतके कठीण झाले आहे की, शेतीकामाला ट्रॅक्टरखेरीज पर्याय राहिलेला नाही. अगदीच लहान शेतकरी असेल तर तो मजूर लावून कशीबशी कामे करतो. पण इतरांना ट्रॅक्टरनेच काम करणे परवडते. त्यामुळे खरे तर याचा नीट अभ्यास व्हायला हवा. पण मोदी सरकारने आकडेवारी गोळा करण्याचे बंदच करून टाकले आहे. २०२१मध्ये व्हायला हवी होती ती जनगणनाही झालेली नाही. काही संस्थांचे आकडे गोळा होतात पण ते जाहीरच केले जात नाहीत. त्यामुळे देशातील अर्थव्यवस्थेचे वास्तव समोर येत नाही. असो. सारांश असा की, जीएसटीच्या दरांमध्ये कपात झाल्यामुळे किमान वाहनांच्या विक्रीत तरी वाढ झाली आहे. नवरात्रीच्या पहिल्या दिवशी म्हणजे २२ सप्टेंबरला ही कपात अमलात आली. तिचा उद्देशच नवरात्र व दिवाळीच्या सणांमधील खरेदीला उठाव मिळावा हा होता. तो काही अंशी सफल झाला यात शंका नाही. यामुळे मध्यमवर्गीयांना थोडा दिलासा मिळेल. आधी म्हटल्याप्रमाणे दुकानांमध्ये गर्दी उसळल्याने त्याचा दृश्य परिणाम असा होईल की आपल्या अर्थव्यवस्थेत सर्व काही उत्तम चालले आहे असा समज तयार होईल. पण व्यवस्थेच्या आरोग्याचे तेच एकमेव गमक असू शकत नाही. नोकऱ्या किती निर्माण झाल्या, बेकारी किती कमी झाली इत्यादी इतरही महत्वाचे घटक असतात. याबाबतीत ठोस अशी आकडेवारी आपल्यापाशी उपलब्ध नाही. कारण, आपल्याकडे जवळपास ९० टक्के लोक असंघटित क्षेत्रांमध्ये म्हणजे साध्या भाषेत सांगायचे तर उक्ते किंवा कंत्राटी पध्दतीने कामे करतात. त्यांना महिन्यातून किती दिवस काम मिळते व महिन्याचे उत्पन्न किती होते याची आकडेवारी महत्वाची ठरते. दुर्दैवाने ती ठोस स्वरुपात कोठेच उपलब्ध होऊ शकत नाही.

## उत्पन्न आणि बचत

अलिबागला एसटी स्टँडजवळ मजूर अड्डा आहे. तेथे रोज सकाळी पुरुष व स्त्रिया कामगार जमा होतात. गवंडीकाम, प्लंबिग, रंगकाम, दुरुस्त्या, हमाली अशी वेगवेगळ्या प्रकारची कामे ते करतात. काही जण शेती किंवा मच्छिमारीतही जातात. हे बहुतेक जण परप्रांतीय असतात. येथे आजूबाजूच्या गावांमधून भाड्याच्या खोल्या घेऊन स्वस्तात एकत्र राहतात. इथल्या कमाईतून त्यांना आपले तर भागवावे लागतेच, शिवाय गावीही माघारी राहिलेल्यांसाठी पैसे पाठवावे लागतात. या लोकांना महिन्याला सरासरी किती दिवस काम मिळते व सरासरी किती पैसे ते बचत करून माघारी पाठवू शकतात याचा अभ्यास केला तर त्यातून काही आकडेवारी मिळू शकेल. शिवाय हा अनेक महिने हा अभ्यास करावा लागेल. तरच गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा कमाई वाढली की घटली हे कळू शकेल. उदाहरणार्थ, या कामगारांना गेल्या वर्षी दिवसाचा रोज समजा ८०० रुपये पडत होता व यंदा समजा तो १००० पडत असेल तर कमाई वाढली. पण मधल्या काळात त्यांचे इथले खर्चही वाढलेले असतात. त्यामुळे माघारी गावी पाठवत असलेल्या रकमेतही तितकीच वाढ झाली आहे का हेही पाहावे लागेल. तरच त्यांची स्थिती सुधारली की नाही हे कळू शकेल. याच रीतीने देशभरच्या कामगारांचे अभ्यास व्हायला हवेत. पण दुर्दैवाने सरकारी यंत्रणेचे याकडे लक्ष नाही. महिन्याला फुकट रेशन दिले आणि निवडणुका जवळ आल्या की लाडकी बहीणसारख्या योजना राबवल्या की आपली जबाबदारी संपली असे सरकारला वाटू लागले आहे. आपली जनताही अशाच रेवड्यांवर खूष होऊन राहिली आहे. चोराच्या हातची लंगोटी अशी तिची भावना बनली आहे. त्यामुळेच गेल्या निवडणुकीपूर्वी महाराष्ट्रात दिलेला आनंदाचा शिधा मिळाला नाही. किंवा ज्येष्ठ नागरिकांसाठीची फुकट पर्यटनाची योजना बंद झाली आहे. तरीही लोक तक्रार करीत नाहीत. उद्या लाडकी बहीण योजनाही काही कारणाने स्थगित झाली तरी बहिणी तक्रार करणार नाहीत. कारण, इतके दिवस पैसे मिळाले तेच मोठे उपकार झाले असे त्यांना वाटायला लावण्याची किमया या सरकारने करून दाखवली आहे. असो. दरम्यान, बाजारात स्कूटर किंवा टीव्ही किंवा रोजच्या गरजेचे कपडे, चपला इत्यादींच्या खरेदीत वाढ झाली तरीही उद्योग वर्तुळाचा विश्वास वाढलेला नाही. नवीन उद्योगांमध्ये होणारी गुंतवणूक गेल्या दहा वर्षांमध्ये सातत्याने खाली आली आहे. व्यापारी खूष पण उद्योजक चिंतेत अशी ही स्थिती आहे. ती कधी सुधारणार असा प्रश्न आहे.

विचार

# उत्सव... प्रकाशाकडे नेणारा

***वात जळत गेल्यावर काजळी धरते. प्रकाश मंदावतो. दिवा मालवण्याची भीती असते. म्हणूनच काजळी काढून वात पुढे ओढली जाते आणि यायोगे प्रकाशाचा मार्ग निर्वेध होतो. अशाच प्रकारे आपल्या जगण्यावर आलेली काजळी दूर करण्यासाठी दीपावली येत आहे. ती तमाला अवरोध करुन प्रकाशवाटा तेजोमय करणारी आहे. पारंपरिक धारणांचा साज ल्यालेली दिवाळी प्रगत युगालाही बरेच काही शिकवणारी आहे. तिचे स्वागत असो.***



मंजिरी ढेरे

शब्दमहात्म्याचा विचार करता 'दिवाळी' या शब्दातील जादू वेगळ्या रितीने सांगण्याची गरज नाही. आबालवृद्धांचा हा अतिशय लाडका शब्द आणि तितकाच लाडका सण... सण या शब्दामध्ये सजावट, खरेदी, सजणे-धजणे, भेटीगाठी, गप्पा हे सगळे अंतर्भूत असतेच. वर्षातील महत्त्वाच्या सणांच्या निमित्ताने आपण या सगळ्याची मजा घेतो. मात्र दिवाळीशी असणारे बंध काही वेगळेच म्हणावे लागतील. ते एकाच वेळी संपत्ती, सामर्थ्य, ऐश्वर्य, सत्ता, संस्कार यांचे महत्त्व सांगतात तर दुसरीकडे माणसा-माणसातील नातेसंबंधाची वीण मजबूत करतात. हा सण दान, परोपकार, समाजभान, पर्यावरणजतन या विषयांना स्पर्श करुन जातो. म्हणूनच या सर्व अर्थाने महत्त्वपूर्ण सणाचे अर्थात दिवाळीचे सहर्ष स्वागत करण्यासाठी प्रकाशाच्या पायघड्या घालू या. दिवाळी जशी दिवे, मिठाई आणि फटाके यांची आहे, तशीच भारतीय संस्कृतीचे प्रतीकही आहे. हे आनंददायी आणि रंगीबेरंगी पर्व अंधःकारावर प्रकाशाचा, अन्यायावर न्यायाचा आणि अज्ञानावर ज्ञानाचा विजय साजरा करणारे आहे. भारतातील प्रत्येक राज्यात, प्रत्येक भागात दिवाळी वेगवेगळ्या पद्धतीने साजरी केली जात असली तरी तिचा गाभा एकच असतो; तो म्हणजे समृद्धी, स्नेह, कृतज्ञता आणि नवप्रेरणा... तेव्हा आपणही दिवाळीचा उत्सवी दिवसांमधील पुराणकथा, आरोग्य, नातेसंबंध, निसर्गप्रेम आणि सामाजिक संदेश अशा विविध पैलूंचा सुंदर मिलाफ जाणून घेऊ या.

नुकतेच वसुबारसेच्या दिवशी आपण गोधन पूजन केले. दिवाळीचा पहिला दिवस पारंपरिक धारणेनुसार साजरा झाला. 'वसु' म्हणजे धन आणि 'बारस' म्हणजे द्वादशी. या दिवशी आपण गाईचे पूजन केले. भारतीय संस्कृतीत गाईला 'गौमाता' म्हणतात, कारण ती आपल्या दैनंदिन जीवनाशी अगदी घट्ट जोडलेली आहे. दूध, दही, लोणी, शेण, मूत्र या पंचगव्यांनी ती आपले शरीर आणि मन दोन्ही शुद्ध करते. तेव्हा तिच्याप्रती आदरभाव व्यक्त करत दिवाळीची सुरूवात होते. अर्थात या दिवसाचे महत्त्व केवळ धार्मिक नाही तर हा दिवस पर्यावरणपूरक आणि शाश्वत जीवनशैलीचाही संदेश देतो. आधुनिक कृषी क्षेत्रात रासायनिक खतांपेक्षा शेणखताला आणि सेंद्रिय पद्धतींना मिळत असणारे महत्त्व आपण जाणतो. वसुबारस साजरे करताना याची वीण आपल्यापुढे स्पष्ट होते. या दिवसाच्या निमित्ताने काही गावांमध्ये तसेच शाळांमध्ये गोधन संवर्धन मोहीम राबवली जाते. ही बाब ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणारी ठरते. धनत्रयोदशी हा दिवाळीचा दुसरा दिवस. या दिवशी आपण धनाची तसेच आरोग्यरक्षक असणाऱ्या धन्वंतरीची पूजा केली तसेच यमदीपदान करुन अपमृत्यूचा धोका दूर केला.

नरक चतुर्थी हा दिवाळीतील एक महत्त्वाचा दिवस. अंधःकाराचा नाश आणि मनशुद्धीचा आरंभ या दिवसापासून होतो, असेही म्हणता येईल. पुराणकथेनुसार या दिवशी भगवान श्रीकृष्णाने नरकासुराचा वध करून सोळा हजार कन्यांची सुटका केली. त्यामुळे या दिवसाचे प्रतीक म्हणून अंधःकारावर प्रकाशाचा विजय साजरा करण्यासाठी भल्या पहाटे दीपप्रज्वलन केले जाते. या दिवशी अभ्यंगस्नानाला विशेष महत्त्व आहे. स्नानासाठी औषधी घटकांनी युक्त उटणे आणि तेलाचा वापर केला जातो. हे केवळ धार्मिक विधी नसून आरोग्यवर्धक सवयी आहेत. आयुर्वेदानुसार या स्नानामुळे रक्ताभिसरण सुधारते, त्वचेला तजेला मिळतो आणि मन प्रसन्न होते. स्नानानंतर देवदर्शनासाठी देवळा-राऊळांमध्ये गर्दी होते. दुपारी सहकुटुंब मिष्टान्न भोजन होते. पाहुण्या-रावळ्यांसह हा दिवस साजरा केला जातो. आधुनिक संदर्भात पाहता नरकचतुर्थी म्हणजे मनातील नकारात्मक विचारांचा, लोभ-राग-द्वेषरुपी नरकाचा नाश करण्याचा दिवस असाही अर्थ आपण घेऊ शकतो.

लक्ष्मीपूजन हा दिवाळीतील आणखी एक महत्त्वाचा आणि श्रद्धेची ठोस बैठक असणारा दिवस. दिवाळीतील सर्वात तेजस्वी रात्र म्हणजे लक्ष्मीपूजनाची अमावस्या. या दिवशी लोक घरे, कार्यालये आणि दुकाने सजवतात. घरामध्ये तसेच व्यावसायिक आस्थापनांमध्ये देवी लक्ष्मीची पूजा केली जाते. घरातील सोनेनाणे, मौल्यवान अलंकार, रोख रक्कम लक्ष्मीस्वरुपात पुजली जाते. तिला पंचपक्वानांचा नैवेद्य दाखवला जातो. ही अमावस्या दिव्यांनी उजळून निघते. देवी लक्ष्मी ही धन, सौभाग्य आणि समृद्धीचे प्रतीक असल्यामुळे या मुहूर्तावर व्यापारी नवीन हिशेबपुस्तकांची सुरुवात करतात. हा नवीन आर्थिक वर्षाचा शुभारंभ मानला जातो. अर्थात आजच्या युगात लक्ष्मीपूजनाचा अर्थ केवळ पैशात मर्यादित नाही तर एका अर्थी हे श्रमाचे, प्रामाणिकतेचे आणि उद्यमशीलतेचेही पूजन आहे. कष्टाशिवाय लक्ष्मी मिळत नाही, हे तत्त्व या दिवसाने अधोरेखित झाले आहे. म्हणूनच या दिवशी केरसुणीलाही सन्मानित केले जाते. भारतीय संस्कृतीचे, विचारांचे आणि प्रगल्भतेचे दर्शन अशा छोट्या-मोठ्या गोष्टीतूनही घडते.

लक्ष्मीपूजनानंतरचा दिवस म्हणजे बलिप्रतिपदा किंवा गोवर्धन पूजा. पुराणकथेनुसार, राजा बळी हा अत्यंत दानशूर आणि न्यायप्रिय होता. भगवान विष्णूने वामन रूप धारण करून त्याची परीक्षा घेतली आणि त्याला पाताळात स्थान दिले. मात्र बळीच्या भक्तीमुळे विष्णूने त्याला दर वर्षी एक दिवस पृथ्वीवर येण्याची परवानगी दिली. त्यामुळे या दिवशी लोक बळी राजा येतोय, बळीचे राज्य येणार... असे मानतात आणि आनंद साजरा करतात. एका अर्थी हा दिवस जनतेचा आणि समानतेचा सण आहे. बळी राजा लोककल्याणाचे प्रतीक असल्यामुळे या दिवशी अनेक सामाजिक संस्था रक्तदान, अन्नदान, वस्त्रदान यासारख्या उपक्रमांचे आयोजन करतात. या दिवशी पत्नी पतीला ओवाळते. प्रेमाने औक्षण करते. पती पत्नीला भेटवस्तू देतो. त्यामुळेच हा पती-पत्नीतील नातेसंबंधांचा सन्मान करणारा, त्यांच्यातील प्रेम बलवान करणारा दिवसही ठरतो.

दिवाळीचा शेवटचा आणि भावनिक दिवस म्हणजे भाऊबीज. या दिवशी बहीण भावाला ओवाळते आणि त्याच्या दीर्घायुष्याची प्रार्थना करते. भाऊ तिला भेट देतो. यमराज आणि त्याची बहीण यमी यांच्या भेटीची कथा यामागे सांगितली जाते, म्हणून हा दिवस 'यमद्वितीया' या नावानेही ओळखला जातो. या निमित्ताने भाऊ-बहिणींचे संमेलन सजते. एकत्र येत मेजवानीचा आनंद घेतला जातो. आजच्या युगातही या दिवसाची भावनिक ओळख तितकीच जिवंत आहे. शहरीकरणामुळे कुटुंब दूर गेली असली तरी तंत्रज्ञानाने नाती जपणे, जोडणे सहजशक्त झाले आहे. व्हिडिओ कॉलवर 'व्हर्च्युअल ओवाळणी', डिजिटल भेटवस्तू, सोशल मीडियावरील शुभेच्छा पोस्ट हा त्याचाच भाग म्हणता येईल. यातून हा दिवस आता नव्या रूपात साजरा होताना दिसतो आहे. भाऊबीज ही केवळ बहीण-भावाच्या प्रेमाची साक्ष नाही तर परस्परांप्रती आदर, जबाबदारी आणि सुरक्षिततेचीही आठवण आहे. म्हणूनच हा दिवस अधिक अर्थपूर्ण ठरतो. या दिवसांबरोबरच काही प्रदेशांमध्ये विशेषतः उत्तर भारतात, कार्तिक पौर्णिमेला 'देवदिवाळी' साजरी केली जाते. या दिवशी देवता पृथ्वीवर येऊन दिवाळी साजरी करत असल्याचे मानले जाते. या दिवशी वाराणसी, प्रयागराज, नाशिक, पंढरपूर आदी तीर्थक्षेत्री हजारो दिवे लावून घाट उजळवले जातात. त्यातूनच हा दिवस भक्ती, ध्यान आणि निसर्गाशी एकरूप होण्याचा क्षण ठरतो. अशा प्रकारे साजऱ्या होणाऱ्या दिवाळीला काळानुरुप नवसंस्कारही जोडले जात आहेत.

आजची दिवाळी केवळ धार्मिक राहिलेली नाही तर एक संस्कृती, अर्थव्यवस्था आणि पर्यावरणाशी जोडलेली सामाजिक चळवळ बनली आहे. सध्याच्या काळात दिवाळीचे काही नवे प्रवाह दिसून येतात आणि त्यातून पर्यावरणपूरक दिवे आणि मातीच्या कंदिलांना प्राधान्य, प्लास्टिकविरहित सजावट, स्थानिक कारागिरांच्या वस्तूंची खरेदी, घरगुती मिठाई आणि देशी उत्पादनांचा सन्मान करणे, 'ग्रीन दिवाळी' मोहिमा, वृक्षारोपण उपक्रम आदींची रुजवण केली जाते. हे आणि यासारखे अनेक बदल दिवाळी हा केवळ उत्सव नसून सामूहिक जबाबदारी आणि नैतिकतेचा उत्सव असल्याचे निर्देशित करतात. दिवाळीतील प्रत्येक दिवस आपल्याला काही तरी शिकवून जातो. जसे की, वसुबारस निसर्गाची पूजा करण्याचा संकेत देते. नरकचतुर्थी मनाचा अंधार घालवण्यास सांगते. लक्ष्मीपूजन श्रमाचे पूजन करण्यास सांगते. बलिप्रतिपदा न्याय तसेच समतेचा आदर्श जपण्याचे सूचित करते तर भाऊबीज नात्यांचे सौंदर्य जपणे हे पूजनाचेच एक रूप असल्याचे सांगते. तेव्हा दिवाळीचा खरा अर्थ म्हणजे आंतरिक प्रकाश, सकारात्मक विचार आणि एकमेकांबरोबर आनंदात जगणे हा आहे हे लक्षात घेऊ या आणि अंगणात दिव्यांची रोषणाई करत दीपावलीचे स्वागत करु या.

# जिल्ह्याला भेसळमुक्त पदार्थांची अपेक्षा



प्रमोद जाधव

दिवाळीमध्ये फराळाबरोबरच गोड पदार्थांचा आस्वाद घेण्याचा आनंद वेगळाचा असतो. त्यामुळे बाजारांमध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या मिठाईसह पॅकींग फराळाची दुकाने सजली आहे.फराळासह मिठाईचे पदार्थ भेट म्हणून देण्याचा क्रेझ वाढला आहे. या दुकानांमध्ये खरेदीला प्रचंड गर्दी होत आहे. मात्र काहीजण भेसळयुक्त व निकृष्ट दर्जाचे पदार्थ या कालावधीत विकण्याचा संशय असल्याने अन्न व औषध प्रशासनाकडून कारवाईचा बडगा सुरु केला आहे. ही कारवाई फक्त दिवाळीपुरता मर्यादीत असते. इतर वेळेला मात्र याकडे ढुंकूनही बघण्याकडे वेळ नसल्याचे दिसून येत आहे. फक्त दिवाळीमध्ये कारवाई करण्यापेक्षा इतर वेळेलादेखील कारवाईकडे लक्ष दिल्यास जिल्ह्यातील भेसळयुक्त व निकृष्ट दर्जाचे पदार्थ विक्रीवर अंकुश बसू शकतो, अशी प्रतिक्रीया व्यक्त केली जात आहे.

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर सुरक्षित अन्नपदार्थ मिळावेत, यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाने विशेष तपासणी मोहीम हाती घेतली आहे. त्यानुसार १८३ तपासण्यांमध्ये १७७ नमुने एफडीएने ताब्यात घेतले आहेत, तर चार दुकानदारांचे परवाने निलंबित केले आहेत. दिवाळीच्या काळात मिठाई, खवा, मावा, खाद्यतेल, तूप आणि सुकामेवासारख्या पदार्थांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढते. याच संधीचा गैरफायदा घेत काही व्यावसायिक भेसळयुक्त, निकृष्ट दर्जाचे पदार्थ विकतात. हे प्रकार रोखण्यासाठी रायगड एफडीएच्या पथकाने जिल्ह्यातील विविध मिठाईची दुकाने, किराणा दुकाने, गोदामांची तपासणी सुरू केली आहे. या तपासणीदरम्यान १७७ अन्नपदार्थांचे नमुने घेण्यात आले, तर दोन लाख १७ हजार ५०० रुपयांचा चक्रवाढ दंड आकारण्यात आला आहे.मे शिवसागर इन्टरप्रायझेस-पळस्पे, चेतक इन्टरप्रायझेस-खारघर, जय भवानी हॉटेल- चौक, जीएन इन्टरप्रायझेस- तळोजा येथील दुकानदारांवर परवाना निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. या कारवाया फक्त शहरी भागात पनवेल परिसरात आहेत, तर तळा, म्हसळा, श्रीवर्धन, अलिबाग, महाड परिसरात आतापर्यंत कोणावरही निलंबनाची कारवाई झालेली नाही. तयार मिठाईला चांगली मागणी असल्याने भेसळयुक्त खाद्यपदार्थ बनवले जात असल्याचे उघड होत आहे. याविरोधात सातत्याने जिल्हा प्रशासनाकडे तक्रार करीत आहेत, परंतु मनुष्यबळाचा तुटवडा असल्याचे कारण देत एफडीएकडून भेसळ खोरांवरील कारवाईला विलंब होत आहे. तक्रार केल्यानंतर एफडीए निरीक्षकास पोहोचण्यास विलंब होत असल्याने मिठाई विक्रेत्यांकडून फायदा घेतला जात होता. अखेर रायगडमधील नागरिकांची मागणी पूर्ण करत राज्य शासनाने जिल्ह्याच्या अन्न व औषध प्रशासन विभागात जादा मनुष्यबळाची नियुक्ती केली आहे.एफडीएने कारवाईवर लक्ष केंद्रित करणाऱ्यांबरोबर मिठाई, फरसाण उत्पादकांसाठी मार्गदर्शनपर कार्यशाळा घेतल्या आहेत. दिवाळीकाळात अशा प्रकारच्या चार कार्यशाळांमध्ये १८४ जणांनी सहभाग घेतला होता. यावेळी दुकानांमध्ये अन्न सुरक्षा आणि मानक कायदा परवाना क्रमांक लावण्याचे निर्देश दिले आहेत. भेसळ आढळल्यास कठोर कायदेशीर कारवाईचा इशारा प्रशासनाने दिला आहे.

सणासुदीच्या काळात अन्नपदार्थ खरेदी करताना नागरिकांनी गुणवत्ता, पॅकिंगवरील बेस्ट बिफोर तारीख आणि दुकानाचा परवाना क्रमांक तपासावा. भेसळ किंवा निकृष्ट दर्जाच्या पदार्थांबाबत संशय आल्यास त्वरित टोल फ्री क्रमांक १८००२२२३६५ यावर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. अन्न व औषध प्रशासनाची कारवाई कौतूकास्पद आहे. अपुरे मनुष्यबळ असतानादेखील दिवाळीत भेसळयुक्त व निकृष्ट दर्जाचे पदार्थ विक्रीवर लक्ष ठेवण्याचे काम या यंत्रणेकडून ठेवण्यात आले आहे. जनतेला आवाहनही केले जात आहे. परंतु जिल्ह्यात गुटखा व अन्य पदार्थ खुलेआमपणे विकले जात असताना त्याकडे मात्र इतर वेळेला दुर्लक्ष का असा जनमानसातून सवाल उपस्थित केला जात आहे. जिल्ह्यात काही ठिकाणी भेसळयुक्त पदार्थ विकले जातात. याकडे गांभीर्याने पाहिले जात नसल्यानअसे प्रकार खुलेआमपणे होत आहेत. याकडे अन्न व औषध प्रशासनाने गांभीर्याने लक्ष दिल्यास जिल्हयातील भेसळयुक्त पदार्थ विक्रीची हिम्मत होणार नाही. शासनाने मनुष्यबळ देखीलया विभागात वाढवले आहेत. त्यामुळे त्याचा वापर पुरेपूर होऊन जिल्ह्यातून भेसळमुक्त पदार्थ होण्याची अपेक्षा आहे.

लोकसंसद

## पोलिस हुतात्मा दिन

आज २१ ऑक्टोबर, आजचा दिवस संपूर्ण देशात पोलीस हुतात्मा दिन म्हणून पाळला जातो. अखंड देशासाठी त्यागाची भावना ठेवून कर्तव्यावर असलेले अनेक पोलीस जवान शहीद होतात त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस पाळण्यात येतो. २१ ऑक्टोबर १९५९ रोजी पोलीस दलातील १० पोलीस शिपाई लडाख हद्दीत भारत - तिबेट सीमेवर व दोन हजार पाचशे हॉट ग्रीन या सीमेवर निर्जन बर्फाच्छादित प्रदेशात कडाक्याच्या थंडीत गस्त घालत असताना धोकादायक पद्धतीने दबा धरून बसलेल्या चिनी सैनिकांच्या हल्ल्यात शहीद झाले. या दिवसाची आठवण रहावी तसेच देशामध्ये दहशतवादी हल्ल्यात, नक्षलवादी कारवाईत, समाज कंटक व हिंसक कृत्य करणाऱ्यांकडून कर्तव्यावर असताना शहीद झालेल्या जवानांच्या स्मृतीला या दिवशी उजाळा दिला जातो. जनतेच्या सेवेसाठी ते २४ तास तयार असतात गणेशोत्सव असो की नवरात्र, दसरा असो की दिवाळी, ईद असो की नाताळ देशातील जनतेला सुरक्षित ठेवण्यासाठी ते कायम तत्पर असतात. जेंव्हा आपण आपल्या कुटुंबासोबत हे सण साजरे करत असतो, तेंव्हा ते आपल्या सुरक्षेसाठी कुटुंबापासून दूर असतात. त्यांच्यामुळेच आपण सर्व सण, उत्सव आनंदाने साजरे करू शकतो. मोर्चे, आंदोलने, निवडणुका पोलिसांशिवाय पार पडूच शकत नाही. मोर्चे, आंदोलने, निवडणुकीसाठी कायम पोलीस बंदोबस्त तैनात असतो. कोणतीही आपत्ती येऊ मग ती निसर्ग निर्मित असो की मानव निर्मित जनतेच्या रक्षणासाठी सर्वात प्रथम पोलिसच हजर असतात. पोलिस जनतेच्या सुरक्षेसाठी काय करू शकतात हे मुंबईवर झालेल्या २६/११ च्या पाक पुरस्कृत दहशतवादी हल्ल्यात जगाने पाहिले आहे. केवळ पोलिसांच्या धाडसामुळे मुंबईवर हल्ला करण्याचा दहशतवाद्यांचा डाव त्यांच्यावरच उलटला. प्राणाची बाजी लावून पोलिसांनी मुंबई वाचवली. या हल्ल्यात अनेक पोलीस शहीद झाले. स्वतःच्या प्राणांची आहुती देऊन पोलिसांनी मुंबईकरांचा जीव वाचवला. १९९२ साली मुंबईत झालेल्या जातीय दंगलीतही पोलिसांचे कार्य अतुलनीय असेच होते. कोरोनासारख्या महामारीत तर पोलिसांचे महत्व आणखी अधोरेखित झाले. पंतप्रधानांनी त्यांना त्यांच्या या कार्यासाठी कोव्हिड योद्धा ही उपाधी दिली होती. पंतप्रधानांनी पोलिसांना दिलेली कोव्हीड योद्धा ही उपाधी सर्वार्थाने योग्य होती. दहशतवादी, नक्षलवादी यासारख्या देशविघातक शक्तींविरुद्ध लढताना काहींना वीरमरण येते. अशा शहीद जवानांचे स्मरण करून त्यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करणे हे देशातील प्रत्येक नागरिकांचे कर्तव्यच आहे. या दिवशी सरकारच्या वतीने पोलीस हुतात्मा स्मारकास पुष्पचक्र अर्पण करून शहीद पोलीस जवानांना मानवंदना दिली जाते. पोलिस हुतात्मा दिनानिमित्त शहीद पोलीस जवानांना विनम्र अभिवादन !

**- श्याम ठाणेदार, पुणे**

दिनविशेष

## लक्ष्मीपूजन



आश्विन अमावास्येला लक्ष्मीपूजन येतं. या दिवशी प्रात:काळी मंगलस्नान करून देवपूजा करावी. प्रदोषकाळी फुलांनी सुशोभित केलेल्या मंडपात लक्ष्मी, विष्णू इत्यादी देवता आणि कुबेर यांची पूजा करावी. यादिवशी घर-गोठा स्वच्छ करून घरात गोमुत्र शिपंडून घर पवित्र करतात. व्यापारी लोक त्यांच्या वह्या-चोपड्यांची पूजा करतात. या दिवसानंतरच व्यापारांचे नवीन आर्थिक वर्ष सुरु होते. बाजारात लक्ष्मीच्या मूर्ती मिळतात, त्यांना घरी आणून त्यांची पूजा करण्याची देखील पद्धत आहे. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी विष्णूने लक्ष्मीसह सर्व देवांना बळीच्या कारागृहातून मुक्त केले आणि त्यानंतर ते सर्व देव क्षीरसागरात जाऊन झोपले, अशी कथा आहे. त्या प्रित्यर्थ प्रत्येकाने त्यांच्या स्वत:च्या घरी सर्व सुखोपभोगांची उत्तम व्यवस्था करावी आणि सर्वत्र दिवे लावावे असे सांगितले जाते. याच दिवशी प्रभू रामचंद सीतामाईला घेऊन आयोध्येत आले होते. याच दिवशी भगवान श्रीकृष्णाने समाधी घेतली. याच दिवशी भगवान महावीरांना निर्वाण प्राप्त झाले आणि याच दिवशी संध्याकाळी महावीरांचे प्रमुख शिष्य गौतम गणधर यांना कैवल्य ज्ञान प्राप्त झाले. अश्विन वद्य अमावस्या म्हणजे 'लक्ष्मीपूजना'चा दिवस. दिवाळीत लक्ष्मीपूजनाच्या दिवशी सूर्य आपल्या दुसऱ्या चरणात प्रवेश करतो. अमावस्या असूनही या दिवसाला अतिशय शुभ मानले जाते हे विशेष आहे. घरामध्ये सुखशांती आणि धनाची देवी महालक्ष्मीचा आशीर्वाद कायम राहावा यासाठी लक्ष्मीपूजन केले जाते. लक्ष्मी ही फार चंचल असते असा समज आहे. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी अलक्ष्मीला बाहेरचा रस्ता दाखवला जातो. अलक्ष्मी ही अशुभाची, दुर्भाग्याची, अपयशाची देवता मानतात. पद्मपुराणात अलक्ष्मीच्या जन्माची कथा वर्णन करण्यात आली आहे. अलक्ष्मीचे वाहन गाढव तर हातात झाडू हे आयुध होते. ती अलक्ष्मी घरात येऊ नये म्हणून लक्ष्मीपूजनाच्या दिवशी झाडूची पूजा करण्याची प्रथा पडली आहे. मध्यरात्रीनंतर सुप आणि दिमडी वाजवून अलक्ष्मीला हाकलून देण्याची प्रथा आहे. असेही म्हणतात की, अश्विन अमावास्येला सूक्ष्म स्वरूपात गतिमान होणारी त्रासदायक स्पंदने जागृत होतात आणि सर्व वायूमंडला जावून बसतात. त्यांना बाहेर काढण्यासाठी घरात केर, कचरा काढला जातो, की जेणी करून वायू मंडळात गतिमान असणारे त्रासदायक घटक बाहेर फेकली जातील. घराचे पावित्र्य टिकून रहावे म्हणून आशविन अमावास्येच्या रात्री अलक्ष्मी निस्सारण म्हणजेच रात्री बारा वाजता घरात केर काढतात. अजून एक महत्वाची गोष्ट लक्ष्मी पूजनाच्या दिवशी केली जाते, ती म्हणजे नव्या झाडूची खरेदी. झाडूला साक्षात लक्ष्मी मानून, तिच्यावर पाणी शिंपडून, तिला सवाष्ण लक्ष्मी मानून तिची हळद-कुंकू वाहून मनोभावे पूजा करतात आणि नंतरच घरात वापरण्यास सुरुवात होते. लक्ष्मीपूजेच्या तिथीमागची पौराणिक कथा - राक्षस कुळात जन्माला आलेल्या बळीराजाला दानाचा कैफ होता. तो उतरवण्यासाठी व त्याच्या बंदिवासात बंदिस्त असलेल्या सज्जनांना मुक्त करण्यासाठी भगवान विष्णूंनी वामन अवतार घेतला आणि अश्विन कृष्ण अमावस्येला बळीराजाकडे तीन पावलं जमीन मागितली. वामनाच्या तीन पावलांनी त्रैलोक्य व्यापून टाकले. बळीराजाची मालमत्ता दानात त्याच्या हातून निसटून गेली. त्याचा कैफ उतरला. तो पाताळात गेला. त्यावेळेस भगवान विष्णूंनी आपली प्रिय पत्नी लक्ष्मी आणि अन्य देवतांची बळीराजाच्या बंदिवासातून सुटका केली. त्यावेळेस लक्ष्मी मातेचे सर्वांनी वाजत गाजत स्वागत केले व भगवान विष्णूंचे आभार मानले. तो सोहळा लक्ष्मी पूजन या नावे साजरा होऊ लागला.

# स्थानिक बाजार मंदावला

## • ऑनलाईन खरेदीमुळे बाजारपेठेतील ४० टक्के उलाढाल कमी

। चिपळूण । प्रतिनिधी ।

दिवाळीची खरेदी कोणाकडून करायची, या विषयावरून राज्यभरात वाद सुरू असताना चिपळूण शहरातील व्यापाऱ्यांनी स्थानिक व्यापाऱ्यांकडून खरेदी करा, असे आवाहन केले आहे.

बाजारपेठेत ऑनलाईन खरेदीचा पर्याय उपलब्ध झाल्यामुळे त्याचा फटका सर्वच व्यापाऱ्यांना बसत आहे. चिपळूणमध्ये गेलो अनेक वर्षे येथील सर्व व्यापारी गुण्यागोविंदाने राहतात. एकत्र सण साजरे करतात. अनेक व्यापारी बाहेरून आले, त्यांनी व्यवसाय उभा केला आणि आज से शहरातील मोठे प्रतिष्ठित व्यापारी म्हणून गणले जाऊ लागले आहेत; परंतु नागरिकांना घरबसल्या ऑनलाईन खरेदीचा पर्याय उपलब्ध झाल्यामुळे मोठ्या व्यापाऱ्यांसह लहान विक्रेत्यांनाही त्याचा फटका बसला आहे. व्यापारी महासंघाचे



पदाधिकारी आणि चिपळूणचे माजी नगरसेवक किशोर रेडीज याबाबत माहिती देताना म्हणाले की, ऑनलाईन खरेदीचा पर्याय उपलब्ध झाल्यामुळे ४० टक्के बाजारपेठेतील उलाढाल कमी झाली आहे. ग्राहकांना कमी पैशांमध्ये ऑनलाईन खरेदीवर वस्तू मिळते; परंतु त्या वस्तूचा दर्जा खरंच चांगला असतो का, याचा नागरिकांनी विचार

### मोठ्या व्यापाऱ्यांसह लहान विक्रेत्यांनाही फटका

करायला हवा. अनेकवेळा सोशल मीडियावर दिसणाऱ्या वस्तू खऱ्या नसतात. आपण वस्तू मागतो एक आणि आपल्याला दुसरी वस्तू येते.

कुरियर कंपनीवाले आपल्याकडून सेवा दिल्याचे पैसे घेतात. वस्तूची जबाबदारी घेत नाहीत. चिपळूण शहरामध्ये महापूर आला त्यावेळी बाजारपेठेचे मोठे नुकसान झाले. राज्यातून मदत आली; पण व्यापाऱ्यांनी एकमेकांना हात देत पुन्हा उभारी घेतली. महापूराच्या कटू आठवणीतून अजून शहर सावरलेले नाही. चिपळूणचे नागरिक आणि व्यापारी महापूरात अडकले होते, तेव्हा ऑनलाईन सेवा देणाऱ्या कोणत्याही कंपनीने मदत केली नाही. त्यामुळे नागरिकांनी ऑनलाईनपेक्षा शहरातील विक्रेत्यांकडून खरेदी करावी.

> **“आमच्या दृष्टीने सर्व व्यापारी एक आहेत. नागरिकांनी कोणाकडून खरेदी करावी, हे त्यांना वेगळे सांगायला नको. वस्तूची किंमत आणि दर्जा तपासून नागरिक खरेदी करतात. स्थानिक व्यापारी सशक्त झाला, शहर आर्थिकदृष्ट्या प्रगत होईल.**
> **– किशोर रेडीज, माजी नगरसेवक, चिपळूण”**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**२१ ऑक्टोबर**

१) श्रीम. विजया दत्ताराम म्हात्रे पिंपळभाट, २१-११-१९५४
२) श्रीम. अरूणा प्रभाकर घरत चेंढरे, अलिबाग, २१-११-१९४८
३) श्री. मोहनलाल लालजी नागडा अलिबाग, २१-११-१९५५
४) श्री. प्रकाश पांडुरंग प्रभू अलिबाग, २१-११-१९६१
५) श्री. हेमंत खंडेराव राऊत अलिबाग, २१-११-१९६१

## सुवर्णकण



विविध जाहिरातींच्या प्रभावामुळे औषधे मित्र बनण्याएवजी आपणच त्यांना शत्रु बनवितो

**श्रीज्ञानेश्वरभावहृदय आबामहाराज परांजपे साधना आश्रम, दातार आळी, पेण.**

## स्लॅब कोसळून दाम्पत्य जखमी

**ठाणे :** जुन्या धर्मा निवास या चाळीतील पहिल्या मजल्याचा स्लॅब तळ मजल्यावर कोसळला. यात तळ मजल्यावर राहणारे दांपत्य जखमी झाले. संजय उतेकर (४०) आणि योगिता उतेकर अशी जखमींची नावे आहेत. ही घटना शनिवारी रात्री कळवा-विटाव्यातील सुर्यानगर येथे घडली. जखमी दोघांवर ठाणे महापालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात उपचार करून घरी सोडण्यात आले. या घटनेनंतर तातडीने त्या चाळीतील सहा सदनिका रिकाम्या करून सील करण्यात आल्या आहेत, अशी माहिती ठाणे महापालिका आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

## भंगार गाड्यांमधून प्रवाशांची वाहतूक

। ठाणे । प्रतिनिधी ।

जव्हार आगाराच्या बहुतांश एसटी बसेसची दुरवस्था झाली आहे. अनेक गाड्यांचे छत फाटले आहेत. खिडकीच्या तुटलेल्या काचा, मोडलेल्या सीट, खिळखिळे झालेले दरवाजे यामुळे या गाड्या भंगारात निघाल्या आहेत. या भंगार गाड्यांमधूनच प्रवाशांची धोकादायक वाहतूक सुरू आहे. जव्हार आगाराच्या गलथान कारभार प्रवाशांच्या जीवावर उठला आहे. त्यामुळे सर्वत्र संताप व्यक्त होत आहे.

जव्हार एसटी आगारात ५६ बस आहेत. यातील ४० हून अधिक बसेस मोडकळीस आल्या आहेत. अनेक बसचे पत्रे तुटलेले आहेत, बसला गळती लागली आहे, खिडक्यांच्या काचा तुटलेल्या आहेत, गाडीतील सीट तुटल्याने या गाड्या भंगारात निघाल्या आहेत. त्याच अवस्थेत प्रवाशांना प्रवास करावा लागत आहे. भंगारात निघालेल्या बसमधून विद्यार्थी आणि प्रवाशांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. जव्हारहून संध्याकाळी चार वाजता मोखाडा तालुक्यातील केवनाळा या अतिदुर्गम गावाकडे जाणारी बस तर अक्षरशः खिळखिळी झालेली आहे. सीट मोडलेल्या असल्यामुळे प्रवासी उभ्यानेच प्रवास करतात. अनेकजण तर जीवाच्या भीतीने या बसमधून प्रवास करणे टाळतात. भंगार बसमुळे प्रवाशांमध्ये प्रचंड संताप आहे.

## पाली शाळेत दुर्गोत्सव उपक्रम

। पाली । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र शासनाने दिपावलीत दुर्गोत्सव आयोजित करुन गडकिल्ल्यांची प्रतिकृती साकारण्याचे आवाहन केले आहे. त्याला प्रतिसाद देऊन तालुक्यातील पाली येथील जिल्हा परिषद आदर्श विद्यामंदिर शाळा पाली क्र.१ मधील विद्यार्थ्यांनी शिवकालीन किल्ल्याची प्रतिकृती साकारली. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार शिक्षणाचा उद्देश केवळ बौद्धिक विकास नसून त्याचबरोबर चारित्र्य निर्माण आणि २१ शतकातील मुख्य कौशल्ययुक्त संपूर्ण व सर्वांगीण विकसित व्यक्ती निर्मिती असेल. शाळांमधील विद्यार्थी 'एक भारत श्रेष्ठ भारत' या उपक्रमात सहभागी व्हावेत, विद्यार्थ्यांच्या कल्पना आणि सर्जनशीलता यांना उमलण्याची संधी मिळावी या उद्देशाने विद्यार्थ्यांसाठी हा दुर्गोत्सव आयोजित केला होता. या कलाकार्यानुभव अंतर्गत कंदील, पणत्या रंगविणे, भेट कार्ड बनवण्याची कार्यशाळाही घेण्यात आली.

**महाराष्ट्र शासन**
**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**
Email :-mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167
**निविदा सूचना क्रमांक ३१ सन २०२५-२०२६**

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन-४०२३०१, दूरध्वनीक्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणी कृतकंत्राटदार यांचेकडुन खालील प्रमाणे बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या : https//mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड यांनी राखून ठेवला आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत | इसारा / बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | तळवडे येथील नविन शासकीय विश्रामगृहाच्या आवारास संरक्षण भिंत बांधणे व विश्रामगृहास पोचमाग तयार करणे. तालुका म्हासळा, जिल्हा रायगड | ८०२४४१०/- | ८१०००/- | ११८०/- | ६ महिने | वर्ग चार अ |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक २९/१०/२०२५ (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक २७/१०/२०२५ वेळ १८.०० वाजेपर्यंत |
| २ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड यांचे कार्यालयात दिनांक २९/१०/२०२५ वेळ १०.०० वाजता |

टिप:- परिपुर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेत स्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईल निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेत स्थळांवरच पहाता येतील.

जा.क्र.मवि/लेशा/निविदा/४०७०
दिनांक : १७/१०/२०२५

सही/-
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

## शॉर्ट सर्किटमुळे ऊसाची शेती जळून खाक

। छ. संभाजीनगर । प्रतिनिधी ।

जालना जिल्ह्यातील जाफराबाद तालुक्यातील निमखेडा बु.येथे महावितरणच्या गलथान कारभारामुळे ११ के.व्ही. मुख्य वाहिनीच्या तारांवर झालेल्या स्पार्किंगमूळे शेतकऱ्यांचा ३० ते ४० एकर ऊस जळून खाक झाला. ही घटना सोमवारी (दि.२०) दुपारी १२ वाजताच्यादरम्यान घडली. घटनास्थळी शेतकऱ्यांनी लागलेली आग आटोक्यात आणण्याचा अतोनात प्रयत्न केला. मात्र आगीने रौद्र रुप धारण केले असल्यामुळे आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न निष्फळ ठरला. यात लाखोंचे नुकसान झाले आहे.



### महावितरणचा गलथान कारभार

पूर्ण तालुक्यातच महावितरणचे धोरण, म्हणजेच शेतकऱ्यांचे मरण अशीच काही अवस्था बघायला मिळत आहे. अनेक वर्षापासूनच्या जीर्ण झालेल्या तारा, वाकलेले खांब, तर नव्याने होणारी कामे देखील दर्जेदार होत नाही किंवा त्यात काही आर्थिक देवाण-घेवाण होत असल्यामुळे की काय लोकप्रतिनिधी किंवा वरिष्ठ याची दखल देखील घेत नाहीत. याबाबी गांभीर्याने घेतल्या, तर असे संकट शेतकऱ्यांवर वारंवार येणार नाही.

## रमाई महिला मंडळातर्फे समाजरत्नांचा सत्कार

। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।

पेण तालुक्यातील बेणसे सिध्दार्थ नगर येथील नालंदा बुद्धविहारात नुकतेच रमाई महिला मंडळाच्या वतीने सत्कार समारोह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राज्यस्तरावरील समाजरत्न पुरस्कार मिळल्याबद्दल चंद्रकांत अडसुळे, शेखर भगत यांना तर राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार मिळाल्याबद्दल पत्रकार धम्मशील सावंत यांना शाल, पुष्पगुच्छ व लेखणी भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी गुणवंत विद्यार्थी, तसेच आंबेडकरी व धम्म चळवळीतील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्यांचा देखील सत्कार करण्यात आला. यावेळी आदित्य भगत यांनी देखील समाजरत्नांचा भेटवस्तू देऊन सत्कार केला.

यावेळी चंद्रकांत अडसुळे म्हणाले की, आम्ही करीत असलेल्या समाजकार्याची दखल तालुका, जिल्हा व राज्य पातळीवर घेतली जाते. त्यातच आपल्या सर्वांच्या आशीर्वादामुळे समाजकार्य करण्यास प्रोत्साहन मिळत आहे. यावेळी शेखर



भगत यांनीही रमाई महिला मंडळाकडून झालेल्या सत्काराबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. तसेच, मंडळाला आवश्यक ते सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. यावेळी बोलताना पत्रकार धम्मशील सावंत म्हणाले की, हा सत्कार मला आंतरराष्ट्रीय स्तरावरील सत्कार असल्याचा आनंद देत असून सर्वांचे आभार व्यक्त करीत आहे.

**जाहीर सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, आम्ही खालील अनुसूचीमध्ये विवरणीत गट क्र. ४४५/२, गाव कोळगाव, तालुका अलीबाग, जिल्हा रायगड या विवरणाच्या जमिनीचे मालक - श्री. इक्बाल नथानी यांच्या हक्कांची चौकशी करीत आहोत.

कोणाही व्यक्तीचा सदर जमिनीविरोधात वा त्यामध्ये वा त्यावर उत्तराधिकार, गहाण, ताबा, विक्री, भेट, भाडेकरार, उप-भाडेकरार, अभिहस्तांकन, वहिवाट, विनिमय, मृत्यूपश्चात वारसा, वारसा, धारणाधिकार, प्रभार, न्यास, देखभाल, विचाराधीन विवाद, जप्ती, अनुज्ञप्ती, गहाण, कोणतेही न्यायालय, न्यायाधिकरण यांचा निवाडा वा आदेश वा अन्य कोणत्याही स्वरूपात कोणताही हक्क, अधिकार, हितसंबंध, दावा वा मागणी असल्यास त्यांनी त्यासंदर्भात

अधोहस्ताक्षरितांना सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत सहाय्यक दस्तावेजांच्या प्रतींसमवेत लिखित स्वरूपात सूचित करावे अन्यथा असा हक्क, अधिकार, लाभ, हितसंबंध, दावा व/वा मागणी काही असल्यास, ते अधित्यागित व/वा परित्यागित समजण्यात येतील.

**अनुसूची**

गाव कोळगाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील अंदाजे ०.७८.२० एच. आर. क्षेत्रफळाची गट क्र. ४४५/२ धारक जमीन व त्यावर उभ्या असलेल्या संरचना.

दिनांक : ०२ ऑक्टोबर, २०२५.
सही/-
**अजय खाटलावाला**
वरिष्ठ भागीदार
लिट्ल ॲन्ड कं.
वकील व सॉलिसिटर्स

३ रा मजला, सेंट्रल बँक इमारत,
एम. जी. रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
ई-मेल : ak@littlecompany.com

**महाराष्ट्र शासन**
**(रायगड किल्ला विशेष स्थापत्य पथक)**
**मार्ग प्रकल्प विभाग, महाड**
**जिल्हा रायगड ४०२३०१**
Email : rpdmahad.ee@mahapwd.com Ph.No. 20145 222243
NOTICE INVITING e-TENDER
Notice No. 07 for 2025-26

कार्यकारी अभियंता, (रायगड किल्ला विशेष स्थापत्य पथक), मार्ग प्रकल्प विभाग, महाड जिल्हा रायगड, पिन-४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२२४३ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या कंत्राटदारांकडून बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड रायगड किल्ला सेल, मार्ग प्रकल्प विभाग, महाड, यांनी राखून ठेवला आहे.

| ई निविदा काम क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी | ई-निविदा संचाची किंमत | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | मदार मोर्चा जतन व संवर्धन करणे ता. महाड, जि. रायगड | ६२६४१०४.०० | ६३०००.०० | १२ महिने | ११८० | वर्ग ४ अ व वरील |
| २ | किल्ले रायगडावर गंगासागर तलावाजवळ पंप हाऊसचे बांधकाम करणे. ता. महाड, जि. रायगड | ६१७३३२६.०० | ६२०००.०० | १२ महिने | ११८० | वर्ग ४ अ व वरील |
| ३ | किल्ले रायगडावर सूर्यवाटीका व जोत्याचे जतन व संवर्धन करणे ता. महाड, जि. रायगड | ५७९८७६०.०० | ५८०००.०० | १२ महिने | ११८० | वर्ग ४ अ व वरील |
| ४ | नाणेदरवाजा जवळील बाजूस असलेल्या पाणी टाकीचे जतन संवर्धन करणे. ता. महाड जि. रायगड | ४३२२८७५.०० | ४४०००.०० | १२ महिने | ५९० | वर्ग ५ व वरील |
| ५ | किल्ले रायगडवर महादरवाजा येथे तिकीट कक्षाचे बांधकाम करणे. ता. महाड, जि. रायगड | ४३१२५२१.०० | ४४०००.०० | १२ महिने | ५९० | वर्ग ५ व वरील |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दि. २४.१०.२०२५ (सकाळी १०.०० पासून) ते दि. ३१.१०.२०२५ (१८.००) वाजेपर्यंत |
| २ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | मा. कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, महाड यांचे कार्यालयात दि. ०३.११.२०२५ वेळ ११.०० पासून |

टिप :- परिपूर्ण निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर शर्ती व अटी यावरील संकेत स्थळांवरच पाहता येतील.

रा.कि.सेल/माप्रवि/महाड/निविदा/५५९
दिनांक : १६.१०.२०२५

सही/-
**(सलोनी रा. निकम)**
कार्यकारी अभियंता
(रायगड किल्ला विशेष स्थापत्य पथक)
मार्ग प्रकल्प विभाग, महाड जिल्हा रायगड

## दापोली आगारात दहा ई-शिवाई बस दाखल

। दापोली । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या रत्नागिरी विभागातील दापोली आगारात दिवाळीच्या मुहूर्तावर १० अत्याधुनिक इलेक्ट्रिक ई-शिवाई गाड्यांचे शनिवारी (दि.१८) स्वागत करण्यात आले. लवकरच आणखी ३० बसेस येणार असून एकूण ४० ई-बसच्या माध्यमातून दापोली आगार प्रवाशांना आधुनिक, पर्यावरणपूरक आणि सोईस्कर प्रवासाची नवी अनुभूती देणार आहे. नागपूर येथून १५ ऑक्टोबरला दापोलीकडे रवाना झालेल्या या बस सोमवारी सकाळी दापोलीत दाखल झाल्या. विशेष म्हणजे, या दीर्घ प्रवासाची जबाबदारी दापोली आगारातीलच १० स्थानिक चालकांनी यशस्वीपणे पार पाडली. या ई-शिवाई बसेस दापोली-पनवेल, दापोली-पुणे, दापोली-बोरिवली आणि दापोली-रत्नागिरी या मार्गांवर धावणार असून, लवकरच नियमित फेऱ्या सुरू होणार आहेत. यामुळे दिवाळी सुटीत गावी कोकणात येणाऱ्या प्रवाशांची सोय होणार आहे. प्रदूषणमुक्त आणि आरामदायी अशा या बसमधून प्रवास करण्याची उत्सुकता प्रवाशांना लागून राहिली आहे.

## निवडक

### फार्मसी महाविद्यालयात ज्ञानवर्धक परिसंवाद



**कर्जत :** कोंकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यायात अंतर्गत गुणवत्ता हमी प्रकोष्ठच्या वतीने ज्ञानवर्धक परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ट्रेडिंग अकॅडमीचे संस्थापक अवधूत साठे म्हणाले की, स्वत:च्या प्रगतीवर, कौशल्य वृद्धीवर लक्ष केंद्रित करा. सातत्यपूर्ण सरावाद्वारे उत्कृष्टता साधा. तसेच, विद्यार्थ्यांनी बाजारातील अफवा किंवा टिप्सवर विश्वास ठेवू नका. निरीक्षण आणि विश्लेषण या गुणांचा शेअर बाजारात तितकाच महत्त्वाचा उपयोग होतो जितका तो औषधनिर्माण क्षेत्रात आहे. ज्ञानाधारित गुंतवणुकीद्वारे आर्थिक स्वातंत्र्य साध्य करण्यासाठी प्रयत्नशील राहावा. तर डॉ. काळे यांनी तरुण वयातच विद्यार्थ्यांनी गुंतवणूक, उत्पन्न आणि आर्थिक व्यवस्थापनाचे तत्त्व समजून घेतल्यास भविष्यात आरोग्य, संपत्ती आणि आनंद मिळविता येतो, असे स्पष्ट केले.

### गोवंशांच्या सुरक्षेसाठी रेडियम बेल्ट

**रत्नागिरी :** रत्नागिरी शहरात रस्त्यांवर मोकाट फिरणाऱ्या गोमाता व गोवंशांच्या सुरक्षेसाठी सामाजिक कार्यकर्ते योगेश हळदवणेकर यांनी स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे. रात्री अपघातग्रस्त होणाऱ्या मुक्या प्राण्यांचे प्राण वाचविण्यासाठी गोवंशांना रेडियम बेल्ट घालण्यात येत आहे. हळदवणेकर यांनी राबवलेल्या गोवंशाच्या सुरक्षेसाठीच्या उपक्रमात शशिकांत गुरव आणि अजिंक्य केसरकर यांनी त्यांना सक्रिय मदत केली असून, ग्रामीण पोलीस ठाणे, रत्नागिरी यांच्या सहकार्यामुळे हे रेडियम बेल्ट उपलब्ध झाले. शहरातील मुख्य रस्ते आणि वर्दळीच्या भागांमध्ये अनेक गोवंश मोकाट फिरत असतात. रात्रीच्या अंधारात ही जनावरे वेळेवर न दिसल्याने अनेकदा वाहनधारकांचे नियंत्रण सुटते आणि गंभीर अपघात होतात. यामध्ये गोवंशांचा मृत्यू होतो किंवा त्यांना गंभीर दुखापत होते. ही बाब लक्षात घेऊन हळदवणेकर यांनी गोवंशांच्या गळ्यात चकाकणारे रेडियम बेल्ट बांधण्याची मोहीम राबवली आहे. या बेल्टमुळे वाहनचालकांना रस्त्यावर उभे असलेले गोवंश दूरवरूनच दिसतात. त्यामुळे ते वेळीच गाडीचा वेग कमी करून संभाव्य अपघात टाळू शकतात.

### आदिवासींना दिवाळी साहित्याची भेट



**नेरळ :** माथेरान शहरात कामधंदा करणाऱ्या श्रमिकांसाठी मुंबई येथील श्री नानीलाल दलिचंद मेहता चॅरिटेबल ट्रस्ट गेली अनेक वर्षे सामाजिक क्षेत्रात कार्य करीत आहे. माथेरानचे डोंगरात असलेल्या आदिवासी वाड्यामधील लोकनासाठी ही संस्था अनेक वर्षे कार्य करीते. माथेरानमधील मैत्री ग्रुपकडून श्री नानीलाल दलिचंद मेहता चॅरिटेबल ट्रस्टसाठी कार्यक्रमाचे आयोज केले होते. माथेरानमधील आदिवासी लोकांना दिवाळी भेट देण्यासाठी आयोजित कार्यक्रमाची सुरुवात अंगणवाडी केंद्रातील लहान बालकांनी गाणे सादर करून पाहुण्यानाचे स्वागत केले. यावेळी ट्रस्टचे माध्यमातून अंगणवाडीतील बालके यांना खाऊ आणि कपड्यांचे वाटप केले. तर आदिवासी कुटुंबासाठी मिठाई, फरसाण, तेल, बेसन, साखर, गुळ, चणाडाळ, मैदा, रवा, मीठ, दोन टॉवेल, केक, चॉकलेट तसेच वही-पेन्सिल आदी साहित्याचे वाटप केले.

### देगाव आदिवासी वाडीत फराळ वाटप

**माणगाव :** दिवाळीनिमित्त सोमवारी (दि.२०) चेरीजन फाऊंडेशन आणि सामाजिक कार्यकर्त्या मा. यशोधरा गोडबोलेताई यांच्या वतीने देगाव आदिवासी वाडी येथे दिवाळी फराळ वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाद्वारे समाजातील आदिवासी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांपर्यंत आनंदाची गोडी पोहोचविण्यात आली. दिवाळी सणाचा उत्साह आणि सामाजिक एकात्मतेचा संदेश देत सर्वांनी एकत्रितपणे सण साजरा केला. कार्यक्रमादरम्यान उपस्थित आदिवासी महिलांनी समाजाने दिलेले आपल्यावर एक देणे आहे, या भावनेतून प्रेरित होऊन उपजीविकेसाठी स्वावलंबनाच्या वाटेवर पाऊल टाकण्याचा निर्धार व्यक्त केला. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी दिवाळीच्या शुभेच्छा देत सामाजिक ऐक्य, प्रेम आणि मदतीचा सुंदर संदेश दिला.

### रघूनाथ केणी यांचे निधन

**चिरनेर :** उरण तालुक्यातील चिरनेर, कातळपाडा येथील रघुनाथ बाळाराम केणी (९१) यांचे वृद्धपकाळाने निधन झाले. कोकण एज्यूकेशन सोसायटीच्या सेकंडरी स्कूल चिरनेर शाळेतून ते नाईक पदावरून निवृत्त झाले होते. शाळेत नाईक म्हणून सेवा करताना त्यांनी विद्यार्थ्यांना शिस्त लावली होती. मुख्याध्यापक व शिक्षकांमध्ये त्यांना चांगला मान होता. त्यांच्या पश्चात तीन मुलगे, सुना, एक मुलगी, जावई व नातवंडे असा परिवार आहे.





### सजावटीकरिता कृत्रिम फुलांचा पर्याय

**रत्नागिरी :** दिवाळी खरेदीसाठी बाजारपेठेत मोठी गर्दी होत आहे. सणासुदीच्या काळात फुलांच्या मागणीत मोठी वाढ झाली असली, तरी नैसर्गिक फुलांचे दर आकाशाला भिडले आहेत. यंदा फुलांचे उत्पादन कमी झाल्यामुळे बाजारात फुलांची आवक जवळपास ५० टक्क्यांनी घटली आहे. कमी आवक आणि वाढलेल्या मागणीमुळे फुलांचे दर वाढले आहेत. त्यामुळे नागरिकांनी सजावटीसाठी कृत्रिम फुलांचा पर्याय स्वीकारला आहे. घरात, कार्यालयात, दुकानात मोठ्या प्रमाणात कृत्रिम फुलांचा वापर दिसून येत आहे. रत्नागिरी शहर व तालुक्यातील बाजारपेठेत कृत्रिम फुलांपासून बनवलेल्या वस्तूंना मागणी आहे. हार, पुष्पगुच्छ, तोरण यासारख्या वस्तू बाजारात मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहेत. या वस्तूंनी नागरिकांचे लक्ष वेधले आहे. फुलांच्या वाढलेल्या दरांमुळे नागरिकांचा कृत्रिम फुलांच्या खरेदीवर भर आहे. शहरात अनेक विक्रेत्यांनी कृत्रिम फुलांच्या वस्तूंची विक्री करणारी दुकाने उघडली आहेत. या वस्तूंचे दर तुलनेने कमी असल्यामुळे सणासुदीच्या काळात त्यांना चांगली मागणी मिळत आहे.

# निवडक



## आदिवासींना गृहोपयोगी वस्तू भेट

**पाली/गोमाशी :** अहिंसा संघ संचलित भायखळा महावीर प्रसादम, सुकृत ग्रुपतर्फे पोटलज बुद्रुक येथे डुबेवाडी, आसनेवाडी येथील ६०० आदिवासी बांधवांना दिवाळीनिमित्त शनिवार, दि. १८ रोजी साहित्य भेट देण्यात आले. सुकृत ग्रुपच्यावतीने ४५० आदिवासी बांधवांना, पोटलज बुद्रुक येथील १०० बांधवांना प्रत्येकी ब्लँकेट, ताट, वाटी, चमचा, ग्लास, बुंदी तर १५० विद्यार्थ्यांना स्कूल किटचे वाटप करण्यात आले. उपस्थित बांधवांना १०० डझन केळी, तर विद्यार्थ्यांना चॉकलेट देण्यात आली. हे साहित्य दिलीप धनावडे यांच्या प्रयत्नातून उपलब्ध झाले. ते स्वीकारताना अधिवासी बांधवांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून सुकृत ग्रुपच्या मंडळींना खूप समाधान वाटले. या कार्यक्रमासाठी संजय लोढा, शमाबेन लोढा, ऋद्धि लोढा, द्रुती लोढा, उषा लोढा, कुमारपाल जैन, चिराग कोटारी, पर्व कोटारी, सुरेश जैन, कलावती जैन, स्वेता जैन, दिया जैन, क्रिशा जैन, सुधीर धनावडे, अंकुश धनावडे, चंद्रकांत धनावडे, ग्रामस्थ आदी मान्यवर उपस्थित होते.



## ‘पद्मदुर्ग’मुळे दिवाळी झाली गोड

**कोर्लई :** मुरुडच्या पद्मदुर्ग व्यावसायिक मंडळातर्फे ग्रामीण रुग्णालयातील रुग्णांना व विहूर गावातील आदिवासी बांधवांना दिवाळी फराळ वाटप करण्यात आले. यावेळी येथील विहूर येथील आदिवासी मुलांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहात असल्याचे चित्र दिसून आले. मुरुड येथील समुद्रकिनारी व्यवसाय करणाऱ्या स्टॉलधारकांनी स्थापन केलेल्या पद्मदुर्ग व्यावसायिक मंडळाच्यावतीने गेली अनेक वर्षे विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचाच भाग ग्रामीण रुग्णालयातील रुग्णांना व जवळपासच्या विहूर येथील आदिवासी बांधवांना मंडळाचे अध्यक्ष अरविंद गायकर यांच्या पुढाकारातून दिवाळी फराळ वाटप करण्यात आला. पद्मदुर्ग व्यावसायिक मंडळाच्यावतीने गेली अनेक वर्षे याठिकाणी विविध सामाजिक उपक्रम राबविले जात असल्याबद्दल व फराळ वाटप करण्यात आल्याने आदिवासी वाडीतील मुलांची दिवाळी गोड झाली असल्याची प्रतिक्रिया स्थानिक बांधवांनी यावेळी व्यक्त केली. यावेळी पद्मदुर्ग मंडळ अध्यक्ष अरविंद गायकर, उपाध्यक्ष दिव्या सतविडकर, सचिव शैलेश वारेकर, दिव्येश बोरढे, दीपक जोशी, दुर्वांकुर बोरढे, इम्तियाज शादाब, संतोष मयेकर तसेच ग्रामीण रुग्णालयातील लिपिक ओमकार कोरमकर, परिचारिका, स्टॉफ, आदिवासी बांधव उपस्थित होते.



## सफाई कामगारांना फराळाचे वाटप

**आपटा :** रोटरी क्लब ऑफ पातळगंगा यांच्यावतीने रसायनी परिसरातील मोहोपाडा, चांभारली, रिस, कांबे, वावेघर, तुराडे, गुळसुंदे येथील विविध क्षेत्रांमध्ये आपली सामाजिक बांधिलकी जपत वर्षभर भरघोस सामाजिक कामे केली जातात. शाळेसाठी लागणाऱ्या वास्तू असतील, विद्यार्थ्यांना शाळेपयोगी वस्तू असतील, अपंगांना मदत असते. तसेच या महागाईच्या काळात सर्वांनाच सण साजरे करणे अवघड होताना दिसत आहे. आणि, त्याच अनुषंगाने याही वर्षी रसायनी परिसरातील सर्वात मोठी असणारी वासंबे मोहोपाडा ग्रामपंचायत आणि तुराडे ग्रामपंचायत येथील सर्व सफाई कामगारांना दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. त्यामुळे या कामगारांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता. या सामाजिक कामामुळे रोटरी क्लब ऑफ पातळगंगा यांचे विविध स्तरावरून कौतुक केले जात आहे. या कार्यक्रमाप्रसंगी अध्यक्ष रो. विजय पाटील, सचिव रो. गणेश वर्तक, माजी अध्यक्ष रो. गणेश काळे, माजी अध्यक्ष रो. नागेश कदम, रो. देवेंद्र महिंद्रकर, रो. डॉ. लेखा उचिल, रो. सुशांत उचिल व इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- सहारा ट्रॅव्हल्स अलिबागमध्ये स्थानिक ड्रायव्हर पाहिजे. वय २५ ते ४५ संपर्क :९२७०५६०४५६
- अलिबागमध्ये कळंबादेवी मंदिर शेजारी नवीन बिल्डिंग पहिल्या मजल्या वरचे सलग दोन गाळे विकणे /भाड्याने देणे आहे. संपर्क ९१४६६८५१००
- अलिबाग, रोहा रोड येथे मालाड्गावी १०-२० गुंठ्याचे संपूर्णतः डेव्हलप केलेले प्लॉट विकणे आहेत. ९८२२२५७९२९/ ८४०८९३०८१५
- अलिबाग, किहीम येथे, रिसॉर्टमध्ये ५०% भागीदार पाहिजे. (₹. २ कोटी ७५ लाख इन्व्हेस्टमेंट) जमीन १७ गुंठे. चार कॉटेज बांधलेली, जागा समुद्रापासून ३०० मीटर आणि गावठाणा जवळ आहे, बस - रिक्षा स्टॅन्ड जवळ आहे. ९८२२२५७९२९/८४०८९३०८१५
- अलिबाग, चौल येथे ७२ गुंठे जागा (१६ गुंठे बागायत + ५६ गुंठे शेत जमीन एकत्रित) रिसॉर्टसाठी संपादित केलेली आहे. या जागेमध्ये ५०% भागीदार पाहिजे. जागा मेन रोड आणि मुखरी गणपती मंदिराजवळ आहे. जागेची किंमत रुपये ६.५ कोटी आणि पुढील डेव्हलपमेंट एकत्रित करायची आहे. ९८२२२५७९२९/८४०८९३०८१५
- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी मुलींची आवश्यकता आहे. ज्यूस मेकिंग, रेस्टॉरंट सर्व्हिस, रिसेप्शनिस्ट, १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअ‍ॅप मेसेज करावा. मोबाईल- ७५५९१८४६१२

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# सिडकोच्या फसव्या योजनेला चपराक

## • न्यायालयाच्या आदेशामुळे शेतकऱ्यांना मिळणार चारपट मोबदला

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

चिर्ले आणि बैलोंडाखार परिसरातील सिडकोच्या प्रस्तावित लॉजिस्टिक पार्कसाठी घेतलेल्या जमिनींच्या संदर्भात मुंबई उच्च न्यायालयाने शेतकऱ्यांच्या बाजूने ऐतिहासिक निर्णय दिला आहे. न्यायालयाने स्पष्ट निर्देश दिले आहेत की, शेतकऱ्यांना साडेबावीस टक्के विकसित भूखंड नको असल्यास त्यांना केंद्र सरकारच्या २०१३ च्या भूसंपादन कायद्यानुसार मोबदला आणि इतर सर्व सुविधा देण्यात याव्यात. या निर्णयानंतर उरण तालुक्यातील शेतकऱ्यांत प्रचंड आनंदाचे वातावरण असून, शेतकऱ्यांच्या संघर्षाला मिळालेला हा न्यायालयीन आधार म्हणजे सिडकोच्या मनमानीला बसलेली मोठी चपराक असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे.



यासंदर्भात रविवारी उरणच्या शासकीय विश्रामगृहात शेतकऱ्यांनी पत्रकार परिषद घेऊन सिडकोच्या या फसव्या योजनेचा समाचार घेतला. यावेळी शेतकऱ्यांच्या वतीने याचिका दाखल करणारे वकील ॲड. राजेश झालटे यांनी सांगितले की, सिडको अनेक वर्षे शेतकऱ्यांची दिशाभूल करत आहे. साडेबावीस टक्के योजना ही फसवणुकीचा डाव असून, न्यायालयाने आता या मनमानीला आळा घातला आहे. सिडकोला जमिनी संपादित करण्याचा अधिकार नसून, ही जबाबदारी मेट्रो सेंटरकडे आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी सिडकोच्या सापळ्यात न अडकता २०१३ च्या भूसंपादन कायद्यानुसार आपला हक्काचा मोबदला मिळवण्यासाठी जागृत राहावे, असे आवाहन त्यांनी केले. भूसंपादन अभ्यासक शहाजी पाटील यांनी याप्रसंगी सांगितले की, सरकारच्या भूसंपादनाच्या दुटप्पी धोरणाविरोधात शेतकऱ्यांनी एकजूट करावी आणि कायद्याने जास्तीत जास्त लाभ पदरात पाडून घ्यावा. तसेच ॲड. विजय पाटील यांनी शेतकऱ्यांना २०१३ च्या कायद्याची माहिती दिली. ॲड. सुचिता ठाकूर आणि सहकाऱ्यांचे शेतकऱ्यांनी या लढाईत दिलेल्या सहकार्याबद्दल आभार मानले.

या निर्णयानुसार आता शेतकऱ्यांना बाजारभावाच्या चारपट रोख मोबदला, वृक्ष व विहिरींचा स्वतंत्र मोबदला, २० टक्के विकसित जमीन, पुनर्वसन व पुनर्स्थापनेचा लाभ आणि बाधितांना नोकरीची संधी अशी बहुआयामी भरपाई मिळणार आहे. हा निकाल केवळ १८ याचिकाकर्त्या शेतकऱ्यांपुरता मर्यादित नसून, सिडकोच्या सर्व प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना लागू होणार असल्याचा दावा याचिकाकर्ते वसंत मोहिते यांनी केला आहे.

सध्या या परिसरातील जमिनी १२ ते १४ लाख रुपये गुंठा या दराने खाजगी खरेदीदारांकडून घेतल्या जात आहेत, मात्र खरेदीखताची नोंदणी केवळ दोन ते अडीच लाखावर केली जात असल्यामुळे शासकीय नोंदीत कृत्रिमरीत्या कमी बाजार दर दाखवला जात आहे. याचाच फटका भविष्यात शेतकऱ्यांना बसू शकतो, असा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे. त्यांनी सर्व शेतकऱ्यांना आवाहन केले की, यापुढे कुणीही साडेबावीस टक्के विकसित भूखंडाच्या सहमती योजनेत अडकू नये, अन्यथा शेतकरी पुन्हा नागवले जातील. या निर्णयाविरोधात सिडको सर्वोच्च न्यायालयात धाव घेणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. ॲड. झालटे यांनी स्पष्ट केले की, सिडको सर्वोच्च न्यायालयात गेलं तरी शेतकरी ही लढाई तिथेही लढण्यास तयार आहेत. केंद्र सरकारचा २०१३ चा भूसंपादन, पुनर्वसन आणि पुनर्स्थापन कायदा हा शेतकऱ्यांसाठी लाभदायक आहे. या कायद्यानुसार जमिनीच्या बाजार भावावर आधारित चारपटपर्यंत भरपाई, २० टक्के विकसित भूखंड, पुनर्वसन, नोकरीची संधी आणि पारदर्शकतेची हमी दिली जाते. शेतकऱ्यांनी आता साडेबावीस टक्क्यांच्या फसव्या योजनेच्या सापळ्यात न अडकता २०१३ च्या कायद्याचा लाभ घ्यावा आणि आपल्या जमिनी कवडीमोल भावाने विकू नयेत, असे आवाहन शेतकऱ्यांनी केले आहे.

# आदिवासी बांधवांसोबत दिवाळी पहाट

**। उरण । प्रतिनिधी ।**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व माजी विद्यार्थी संघ, आर्ट ऑफ लिव्हिंग, मी उरणकर संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या वतीने दरवर्षी आदिवासी बांधवांसोबत दिवाळी पहाट हा कार्यक्रम मागील पंचवीस वर्षांपासून आयोजित केला जातो.



विकासापासून वंचित असलेला समाज घटक दिवाळीसारखा महत्त्वाचा सण आनंदाने साजरा करू शकत नाहीत, त्यामुळे दिवाळीत त्यांच्या आनंदाचा भाग व्हावे या उद्देशाने हा उपक्रम राबवला जातो. यावर्षी पुनाडे आदिवासी कातकरी वाडी येथील बांधवांसोबत दिवाळी साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वाल्मीक गर्जे यांनी याप्रसंगी विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण व्हावी व समाजाप्रती आपलेही काही कर्तव्य आहे, ही जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी तसेच आदिवासी बांधवांचे जीवन विद्यार्थ्यांना समजावे या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित केला, असे प्रतिपादन केले.

महाविद्यालयाचे माजी प्राचार्य के.ए. शामा यांनी याप्रसंगी आदिवासी बांधवांसोबत दिवाळी या उपक्रमाचा इतिहास सांगितला व विद्यार्थ्यांनी सेवाभावी वृत्ती अंगीकारून मार्गक्रमण केले पाहिजे, असे प्रतिपादन केले तसेच माजी विद्यार्थी व महाविद्यालयाने ही परंपरा टिकून ठेवावी, असे सांगितले. याप्रसंगी पुनाडे आदिवासी कातकरी वाडीवरील महिलांना एकूण बारावारी साडी २२, सहावारी साडी ६०, पुरुषांना ८० टॉवेल्स व एकूण ५० विद्यार्थ्यांना कपडे व शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी आपापल्या घरी तयार केलेला दिवाळी फराळ व गोड पदार्थ आदिवासी बांधवांना दिला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अनेकांनी आर्थिक मदत केली. त्यामध्ये प्राचार्य डॉ. वाल्मीक गर्जे, माजी प्राचार्य के.ए.शामा, टी.एन. घ्यार, विशाल पाटेकर, रोहित पवार, तेजस आठवले, प्रेरणा पाटील, डॉ. दत्ता हिंगमिरे, डॉ. अरुण चव्हाण, प्रा.व्हि.एस. इंदुलकर, प्रा.डॉ. पराग कारुलकर, डॉ. एम.जी.लोणे, डॉ. एच.के. जगताप, एस.वाय.बी. कॉमचे विद्यार्थी, इतर शिक्षकांच्या सहकार्याने ८५,००० रुपये आर्थिक मदत जमा झाली.

# पनवेलमध्ये दिव्यांचा लखलखाट

**। पनवेल । प्रतिनिधी ।**



दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर सर्वत्र झगमगाट सुरु आहे. दिव्यांची आकर्षक रोषणाई ही आता पनवेलची एक वेगळी ओळख होत आहे. यामध्ये दिवाळी निमित्त पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालय, आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, प्रभाग कार्यालयांना, विविध कार्यालये, चारही प्रभागांतील चौक, रस्ते यांना आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे शहरातील टिळक रोड परिसर हा केदार बिल्डकॉनमुळे झगमगला असून, अनेकजण या ठिकाणी उभे राहून या रोषणाईचा आनंद घेत आहेत. तर तरुण वर्ग सेल्फी व व्हिडिओ काढून आपला आनंद द्विगुणित करीत आहेत.

या भागातील नागरिक तसेच इतर अनेकजण याठिकाणी आकर्षक विद्युत रोषणाई पाहण्यासाठी येथे गर्दी करीत आहेत. यावेळी केदार बिल्डकॉनचे कौतुक करत आहेत. आकर्षक बांधकाम, वाजवी दर व ग्राहकाचे समाधान या तत्त्वावर केदार बिल्डकॉनचे पनवेल शहर, नवीन पनवेल, वाशी, मुंबईत मोठं मोठे प्रोजेक्ट कार्यान्वित आहेत.




■दीपावली सणानिमित्त पनवेल मार्केटमध्ये मोठ्या प्रमाणावर झेंडू फुलांची रेलचेल असून, लक्ष्मीपूजनासाठी कमळफुले व पूजेचे साहित्य खरेदीसाठी नागरिकांनी गर्दी केली होती. भाजी मार्केटमध्ये सणासुदीचा उत्साह ओसंडून वाहात असून, फुलांच्या सुगंधात आणि भक्तीभावात पनवेल उजळून निघाला आहे. (छायाचित्र : राजेश डांगळे)



■अलिबाग तालुक्यातील वावे नाका रंगीबेरंगी आकाशकंदिलांनी उजळून निघाला असून, कंदील खरेदी करण्यासाठी ग्राहकांची गर्दी पाहायला मिळाली.



■ पालीतील स्वामी समर्थनगर येथील हरी ओम वास्तू सोसायटीतील रहिवाशांनी दिवाळीनिमित्त रायगड किल्ल्याची हुबेहूब प्रतिकृती तयार केली आहे. ही पाहण्यासाठी येथे मोठ्या प्रमाणावर लोक गर्दी करीत आहेत. (छायाचित्र : भूषण सुतार)



■ चोपडी पूजन हा लक्ष्मी पूजनाचा एक भाग आहे, ज्यामध्ये धन, वैभव, संपत्ती आणि आर्थिक स्थैर्याची देवता लक्ष्मीची पूजा केली जाते. ही परंपरा पिढ्यानपिढ्या चालत आली आहे आणि व्यापाऱ्यांमध्ये ती खूप महत्त्वाची मानली जाते. आज चोपडी खरेदीचा मुहूर्त असल्याने अलिबाग मधील जगदीश इंटरप्रायजेस मध्ये चोपडी खरेदीला गर्दी झाली होती ( छायाचित्र : समीर मालोदे)



■ चौलमळा येथील वेला आणि हता लोहार या दोघी बहिणींनी बनविलेला प्रबळगड किल्ला.



■बागमळा येथील युक्ता शैलेश म्हात्रे हिने किल्ला तयार करुन प्रत्येक बुरुजावर मराठीची बाराखडी लिहून मराठीचा जयघोष केला आहे.



■ महाजने येथील बच्चेकंपनीने तयार केलेला किल्ला.



■पनवेल येथे चिमुकल्यांनी बनविलेला सिंधुदुर्ग किल्ला.



■पनवेल येथे बच्चेकंपनीसह मोठ्यांनी हातभार लावून तयार केलेला विजयदुर्ग किल्ला.



■दिवाळीनिमित्त स्वामी समर्थ नगर येथील कृषीवल बिल्डिंगमधील मुले किल्ला बनवताना.

।।अविश्रमो लोकतंत्राधिकारा।।

# खोपोली नगरपरिषद

खोपोली, ता.खालापूर, जि.रायगड, पीनकोड नं ४१० २०३.
फोन नं. (०२१९२) २६२२२२, २६३३५६, २६४२११
E mail ID:- cokmckhopoli@gmail.com

जा.क्र.केएमसी/नगर रचना/३२५८ — दिनांक १७/१०/२०२५

## सुचना

**खोपोली शहराच्या प्रारुप विकास योजनेमधील फेरबदल/बदलांच्या सुचीचे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २८(४) अन्वये प्रसिध्दीकरण**

ज्या अर्थी खोपोली नगरपरिषदेने नियोजन प्राधिकरण म्हणून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २६(१) नुसार प्रारुप विकास योजना जा.क्र. ३४९१ दिनांक ११.०२.२०२५ चे सुचनेद्वारे नागरीकांच्या सुचना/हरकती मागविण्यासाठी प्रसिध्द केली आहे. सदरची सुचना महाराष्ट्र शासन राजपत्रात असाधारण भाग २ मध्ये दि. १२.०२.२०२५ रोजी प्रसिध्द झाली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त योजनेवर विहीत मुदतीत प्राप्त सुचना व हरकतींचा विचार करुन उक्त अधिनियमाच्या कलम २८(४) नुसार स्थापन झालेल्या नियोजन समितीने तिचा अहवाल उक्त प्राधिकरणाकडे दिनांक ०१.०९.२०२५ रोजी सादर केला आहे.

अणि ज्याअर्थी, नियोजन समितीने सादर केलेल्या अहवालावर विचारांती उक्त नियोजन प्राधिकरणाने जो मान्य करुन / अंशत: मान्य करुन / नव्याने बदल सुचवून उक्त योजनेत फेरबदल / बदल करण्यासाठी व ती उक्त अधिनियमांच्या कलम ३० नुसार शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यासाठी ठराव क्र. १५७ दिनांक १७.०९.२०२५ पारित केलेला आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमांचे कलम २८(४) खालील तरतुदीनुसार उक्त योजनेच्या मसुद्यात केलेले फेरबदल/बदल नागरीकांच्या अवलोकनार्थ प्रसिध्द करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी उक्त प्रारुप विकास योजनेच्या मसुद्यात नियोजन प्राधिकरणाने उक्त अधिनियमाचे कलम २८ (४) नुसार केलेल्या फेरबदलांची/बदलांची सुची परिशिष्ठ "अ"मध्ये नमुद केल्याप्रमाणे नागरीकांच्या माहितीसाठी प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर फेरबदल/बदल दर्शविणारा उक्त प्रारुप विकास योजनेचा नकाशा खालील नमुद केलेल्या कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत ३० दिवसांच्या कालावधीकरीता नागरीकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आला आहे.

१. मुख्याधिकारी, खोपोली नगरपरिषद, खोपोली
२. सहाय्यक संचालक, नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग, रायगड - अलिबाग

ठिकाण :- खोपोली
दिनांक :- १७/१०/२०२५

(डॉ. पंकज पाटील)
मुख्याधिकारी
खोपोली नगरपरिषद

### परिशिष्ट-अ

**अधिनियमाचे कलम २८(४) नुसार केलेल्या फेरबदल/बदलांची सुची**

| क्रमांक. | फेरबदल/बदलांचा तपशील |
|---|---|
| एम१ | नकाशामध्येदर्शविल्याप्रमाणे मौ.काटरंग येथील आरक्षण क्र.७४ 'प्राथमिक शाळा' चे क्षेत्र, जे विद्यमान बांधकामांमुळे बाधित झाले आहे ते वगळून लगतच्या वापर विभागातसमाविष्ट करण्यात आले. |
| एम२ | i.मौ. शिळ येथीलआरक्षण क्र.३७ 'बगीचा' वगळण्यात आले आणि वगळलेले क्षेत्र लगतच्या वापर विभागातसमाविष्ट करण्यात आले.<br>ii.न.भू.क्र. २१०४ आणि २०३९ पासून न.भू.क्र. २०३९ मधील खुल्या जागेपर्यंतच्याविद्यमान रस्त्यास ९ मी. रुंदीचा वि.यो. रस्ता प्रस्तावित करण्यात आला आणित्याच्या दक्षिणेकडील १२ मी. रुंदीचा वि.यो. रस्ता वगळण्यात आला आणि वगळलेलेक्षेत्र लगतच्या वापर विभागात समाविष्ट करण्यात आले. |
| एम३ | बाजारपेठमधीलप्रस्तावित १८ मी. रुंदीचा वि.यो. रस्ता मंजूर विकास योजनेप्रमाणे १२ मी.रुंदीचा करण्यात आला आणि वगळलेले क्षेत्र लगतच्या वापर विभागात समाविष्ट करण्यातआले. |
| एम४ | मा. संचालक, नगररचना यांच्याकडील कलम १२७ अन्वये पारित केलेल्या आदेशानुसार मौ.वरोसे येथीलन.भू.क्र.३५२५ मधील विद्यमान 'टेलीफोन एक्सचेंज' चे क्षेत्र वगळण्यात आले आणिवगळलेले क्षेत्र रहिवास वापर विभागात समाविष्ट करण्यात आले. |
| एम५ | मौ.मूळगाव(खु)येथील न.भू.क्र. ११११ मधील आरक्षण क्र. ४३ 'बाजार आणि दुकान केंद्र' वगळण्यातआले आणि वगळलेले क्षेत्र लगतच्या वापर विभागात समाविष्ट करण्यात आले. |
| एम६ | i. मौ.ताकई येथीलप्रस्तावित २४ मी. वि.यो.रस्त्याची रुंदी दोन्ही बाजूंनी समसमान कमी करून १२ मी.करण्यात आली आणि वगळलेले क्षेत्र लगतच्या वापर विभागात समाविष्ट करण्यात आले. (न.भू.क्र. २२२६ ते २२६२)<br>ii.मौ.ताकई येथील प्रस्तावित २४ मी.वि.यो.रस्त्याची रुंदी उत्तरेकडून १२ मी.पर्यंत कमी करण्यात आली आणि वगळलेले क्षेत्र लगतच्या वापर विभागात समाविष्टकरण्यात आले. (न.भू.क्र. २२६२ ते २२४०) |
| एम७ | नकाशामध्येदर्शविल्याप्रमाणे मौ.वासरंग, सुभाष नगर येथील प्रस्तावित १८ मी. रुंदीचा रस्ताऔद्योगिक क्षेत्राच्या लगत स्थलांतरित करण्यात आला आणि वगळलेले क्षेत्र लगतच्यावापर विभागात समाविष्ट करण्यात आले. |
| एम८ | मौ.आजोशी येथीलन.भू.क्र. १५१७, १५३० आणि १५३८ मधील क्षेत्र सार्वजनिक निमसार्वजनिक वापरविभागातून वगळून रहिवास वापर विभागात समाविष्ट करण्यात आले. |
| एम९ | नकाशामध्येदर्शविल्याप्रमाणे प्रस्तावित १८ मी. रुंदीचा वि.यो.रस्ता मौ.मुळगाव (खु) येथीलन.भू.क्र. १६३९ मधील मंजूर रेखानकनाप्रमाणे पुनरेखित करून पुढे न.भू.क्र. १६०१मधील खुल्या जागेच्या कोपऱ्यावर पूर्व-पश्चिम प्रस्तावित १८ मी. रुंदीच्यावि.यो. रस्त्याशी जोडण्यात आला आणि वगळलेले क्षेत्र लगतच्या वापर विभागातसमाविष्ट करण्यात आले. |
| एम१० | i.मौ.मुळगाव (बु ) येथील न.भू.क्र. ३०५१ मधील १:५ पेक्षा कमी उताराचे क्षेत्र, हिल/माऊंटेन वापरविभागातून वगळून रहिवास वापर विभागात समाविष्ट करण्यात आले.<br>ii.मौ.भानवाज येथील न.भू.क्र. ५३६९ मधील १:५ पेक्षा कमी उताराचे क्षेत्र, हिल/माऊंटेन वापर विभागातून वगळून रहिवास वापर विभागात समाविष्ट करण्यात आले. |
| एम११ | नकाशामध्येदर्शविल्याप्रमाणे मौ.मुळगाव (बु) येथील न.भू.क्र. १७९१, १७९२(पै), १७९७(पै) आणि१७९०,१८०७(पै) मधील सुमारे ०.४ हेक्टर क्षेत्र आरक्षण क्र.५४ 'खेळाचे मैदान' याकरिता कायम ठेवण्यात आले व उर्वरित क्षेत्र आरक्षणातून वगळून रहिवास वापरविभागात समाविष्ट करण्यात आले. |
| एम१२ | आरक्षण क्र. ४७ 'क्रीडांगण' मौ.विहारी येथील न.भू.क्र. १७२९ मध्ये उत्तरेकडे प्रस्तावित १८ मी.रुंदीच्या वि.यो. रस्त्याच्या आणि पश्चिमेकडे प्रस्तावित ९ मी. रुंदीच्या वि.यो.रस्त्याच्या जंक्शनवर नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे स्थलांतरित करण्यात आले आणिवगळलेले क्षेत्र लगतच्या वापर विभागात समाविष्ट करण्यात आले. |
| एम१३ | i. नकाशामध्येदर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्र. ५१ 'घनकचरा व्यवस्थापन सुविधा' मौ.मीळ येथे मंजूरविकास योजनेप्रमाणे एम-७ (ट्रेंचिंग ग्राऊंड) च्या जागी विद्यमान डंपिंगयार्डाच्या क्षेत्रासह स्थलांतरित करण्यात आले.<br>ii. नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे प्रारूप विकास आराखड्यात आरक्षण क्र.५१ 'घनकचरा व्यवस्थापन सुविधा' मौ.लव्हेज येथीलजागेचे नामाभिदान नवीन आरक्षण क्र. ९३ 'पिकनिक सेंटर' करण्यात आले. |
| एम१४ | i.मौ.खोपोली येथील न.भू.क्र. ४२८१ मधील प्रस्तावित १८ मी. रुंदीचावि.यो. रस्ता नकाश्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे उत्तरेकडील बाजू विद्यमानरस्त्याशी कायम ठेऊन दक्षिणेकडे स्थलांतरित करण्यात आले आणि वगळलेले क्षेत्रलगतच्या वापर विभागात समाविष्ट करण्यात आले.<br>ii.मौ.खोपोली येथील न.भू.क्र. ४२८३ मधील प्रस्तावित १८ मी. रुंदीचा वि.यो.रस्ता नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे मंजूर विकास योजनानुसार दक्षिणेलास्थलांतरित करण्यात आला आणि वगळलेले क्षेत्र लगतच्या वापर विभागात समाविष्टकरण्यात आले. |
| एम१५ | i.मौ.शेडावलीयेथील आरक्षण क्र. २७ 'खेळाचे मैदान' चे नामाभिदान 'प्राथमिक व माध्यमिक शाळा' असे करण्यात आले.<br>ii.मौ.शेडावली येथील आरक्षण क्र. २८ 'प्राथमिक व माध्यमिक शाळा' चे नामाभिदान 'खेळाचे मैदान' असे करण्यात आले. |
| एम१६ | प्रस्तावित २४मी. रुंदीचा वि.यो. रस्ता नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे मौ.चिंचवली शेकिन च्याउत्तर हद्दी पासून मौ.वासरंग च्या उत्तर हद्दी पर्यन्त पश्चिमेकडून १८ मी.रुंदीचा करण्यात आला आणि वगळलेले क्षेत्र लगतच्या वापर विभागात समाविष्ट करण्यातआले. |
| एम१७ | नकाशामध्येदर्शविल्याप्रमाणेमौ.भानवाज येथीलन.भू.क्र. ३९८६ आणि मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र. ६४ 'एक्सटेन्शन टुहॉस्पिटल' अंतर्गत असलेलेआरक्षण क्र.६९चे १० आर क्षेत्र हे वाणिज्य वापर विभागात समाविष्ट करण्यात आले. |
| एम१८ | i.आरक्षण क्र. ३८ 'वाहनतळ' चे नामाभिदान 'उद्यान/बगीचा' असे करण्यात आले.<br>ii.मौ. शिळ येथील (एम१८-iनुसार) आ.क्र.३८ 'उद्यान/बगीचा' असे नामाभिदानकेलेल्या आरक्षणामधून विद्यमान हनुमान मंदिर चे क्षेत्र वगळण्यात आले. |
| एम१९ | मौ.भानवाज येथीलन.भू.क्र. ५३४५ मधील प्रस्तावित ९ मी. रुंदीचा वि.यो. रस्ता नकाशामध्येदर्शविल्याप्रमाणे मंजूर रेखांकनाच्या रस्त्यानुसार स्थलांतरित करण्यात आला आणिदक्षिणेकडील न.भू.क्र. ५३३२ आणि ५३४६ मधील १२ मी. रुंदीच्या वि.यो. रस्त्याशीजोडण्यात आला आणि वगळलेले क्षेत्र लगतच्या वापर विभागात समाविष्ट करण्यात आले. |
| एम२० | i.मौ.भानवाज येथील स.क्र. ५७ मधील प्रस्तावित१८ मी. रुंदीचा वि.यो.रस्तानकाशामध्येदर्शविल्याप्रमाणे पश्चिमेकडे स्थलांतरित करण्यात आला. (न.भू.क्र. ४९७३ ते४७५८)<br>ii.भानवाज भुयारीमार्गाच्या पश्चिमबाजूने राष्ट्रीय महामार्ग-४८ करिता ९ मी.रुंद उड्डाणपूल जोडणी प्रस्तावित करण्यात आली. |
| एम२१ | जनता विद्यालयमार्गे जैन मंदिर ते भानवाज भुयारीमार्ग पर्यंतचा विद्यमान रस्ता, ९ मी.रुंदवि.यो. रस्ता प्रस्तावित करण्यात आला. |
| एम२२ | नकाशामध्येदर्शविल्याप्रमाणे मौ. मीळ आणि मुळगाव (बु) येथील आरक्षण क्र.३३ 'अग्निशमनकेंद्र' च्या पश्चिम बाजूस सुमारे ०.४ हेक्टर क्षेत्रफळाचे नवीन आरक्षण क्र.९४ 'दफनभूमी' प्रस्तावित करण्यात आले. |
| एम२३ | मौ.खोपोली येथीलन.भू.क्र. ४३८५ आणि इतर मधून प्रस्तावित २४ मी. वि.यो.रस्त्याची रुंदी मंजूरविकास योजनेनुसार कमी करून १५ मी. रुंद करण्यात आली आणि वगळलेले क्षेत्र लगतच्यावापर विभागात समाविष्ट करण्यात आले. |
| एम२४ | नकाशामध्येदर्शविल्याप्रमाणे मौ.देवलाड येथील न.भू.क्र. ४१४७ आणि इतर मधील प्रस्तावित १८मी. रुंदीचा वि.यो. रस्ता हा विद्यमान रस्त्याच्या मध्यरेषेपासून समानरुंदीकरणासह पुनरेखित करण्यात आला आणि वगळलेले क्षेत्र लगतच्या वापर विभागातसमाविष्ट करण्यात आले आहे. |
| एम२५ | नकाशामध्येदर्शविल्याप्रमाणे मौ.ताकई येथील प्रस्तावित ४५ मी. वि.यो. रस्त्याची रुंदी कमीकरून २४ मी. दर्शविण्यात आली आणि वगळलेले क्षेत्र लगतच्या वापर विभागात समाविष्टकरण्यात आले. |
| एम२६ | नकाशामध्येदर्शविल्याप्रमाणे मौ.ताकई येथील आरक्षण क्र.१३ 'बगीचा' चे जे क्षेत्र, विद्यमानबांधकामांमुळे बाधित झाले आहे ते वगळून लगतच्या वापर विभागात समाविष्ट करण्यातआले. |
| एम२७ | नकाशामध्येदर्शविल्याप्रमाणे मौ.भानवाज येथीलन.भू.क्र. ५३५० मधील प्रस्तावित १२ मी.रुंदीचा रस्ता हा ९ मी.रुंद करूनन.भू.क्र. ५३४१, ५३४२, ५३३९ मधून स्थलांतरित करण्यात आला व प्रस्तावित १२मी.रुंदीच्या रस्त्याला जोडण्यात आला आणि वगळलेले क्षेत्र लगतच्या वापर विभागातसमाविष्ट करण्यात आले. |
| एम२८ | मौ. भानवाज येथीलन.भू.क्र. ५२८३ मधील नाविकास वापर विभागातील संपूर्ण क्षेत्र नाविकास वापरविभागातून वगळून रहिवास वापर विभागात समाविष्ट करण्यात आले. |
| एम२९ | नकाशामध्येदर्शविल्याप्रमाणे जनता विद्यालय ते मौ.देवलाड येथील न.भू.क्र. ५१४१ पै पर्यन्तचा प्रस्तावित १८ मी.रुंदीचा रस्ता उत्तरेकडील विद्यमान रस्त्याच्या उत्तरसीमेपर्यन्त स्थलांतरित करून मौ.भानवाज येथील न.भू.क्र. ५१४१ पै पासून NH-४८च्या पूर्व बाजू पर्यन्त घेण्यात येऊन पुढे न.भू.क्र. ५२५२ मधील HT Line खालीनवीन १८ मी.रुंद वि.यो. रस्ता प्रस्तावित करण्यात आला आणि मौ.वरोसे येथीलन.भू.क्र. ३५१८ पै मध्ये न.भू.क्र. ४८१० च्या उत्तर हद्दीवरून जोडण्यात आला.न.भू.क्र. ४७४२ ते ३५१८ पै चे प्रस्तावित १८ मी. रुंदीचा वि.यो. रस्ता वगळण्यातआला आणि वगळलेले क्षेत्र लगतच्या वापर विभागात समाविष्ट करण्यात आले. |
| एम३० | नकाशामध्येदर्शविल्याप्रमाणे मौ.मुळगाव (बु) येथील न.भू.क्र. ३०५३ मध्ये आरक्षण क्र.५७ ESR/GLR ची फेरसंरचना करण्यात आली आणि वगळलेले क्षेत्र लगतच्या वापर विभागातसमाविष्ट करण्यात आले. |
| एम३१ | i.मौ.खोपोलीयेथील न.भू.क्र. ४३०१, ४३०२ मधील क्षेत्र सार्वजनिक-निमसार्वजनिक वापरविभागामधून वगळून रहिवास वापर विभागात समाविष्ट करण्यात आले.<br>ii.मंजूर विकास योजनेनुसार मौ.खोपोली येथील न.भू.क्र. ४३५१, ४३३८, ४३३५, ४३३४ (पै) मधील क्षेत्र सार्वजनिक-निमसार्वजनिक वापर विभागामधून वगळून रहिवास वापरविभागात समाविष्ट करण्यात आले. |
| एम३२ | मौ.वरोसे आणिकाटरंग येथील प्रस्तावित १८ मी. रुंदीच्यावि.यो.रस्त्याची आखणी मा. सहसंचालक, नगररचना, कोकण विभाग यांचे आदेश क्र. - सहसांकोवि/मौ. वरोसे व काटरांग/ता.खोपोली/सि.स.नं ३५१८(पै) व इतर/२०२५/१५२०दिनांक १८/०८/२०२५ नुसार दर्शविण्यात आली आणि वगळलेले क्षेत्र लगतच्या वापरविभागात समाविष्ट करण्यात आले. (न.भू.क्र.३५१८ ते ३५१४) |
| एम३३ | i. मौ.देवलाडयेथील 'खोपोली रेल्वे स्थानक' वि.यो. रस्त्याची रुंदी नकाशामध्ये १२ मी.दर्शविण्यात आली.<br>ii. मौ.देवलाड आणि खोपोली येथील 'लक्ष्मी नगर' वि.यो. रस्त्याची रुंदीनकाशामध्ये १२ मी. दर्शविण्यात आली. |
| एम३४ | नकाशामध्येदर्शविल्याप्रमाणे प्रस्तावित २४ मी.वि.यो. रस्त्याची (राष्ट्रीय महामार्ग-४८)आखणी मौ.शीळ येथील न.भू.क्र. १९४५-१९५१ च्या उत्तरेकडे १.५ मी.ने स्थलांतरितकरण्यात आली आणि वगळलेले क्षेत्र लगतच्या वापर विभागात समाविष्ट करण्यात आले. |
| एम३५ | नकाशामध्येदर्शविल्याप्रमाणे प्रस्तावित १८ मी. रस्त्याची आखणी ही गगनगिरी आश्रमजवळपश्चिमेकडे आणि मौ.खोपोली येथील न.भू.क्र. ४२९३, ४२९४ जवळ उत्तरीकडे स्थलांतरितकरण्यात आली आहे आणि वगळलेले क्षेत्र लगतच्या वापर विभागात समाविष्ट करण्यातआले. |
| एम३६ | i.मौ.खोपोलीयेथील न.भू.क्र. ५२९०, ५२९२ ते ५२९३ समोरील विद्यमान ६ मी. रुंदीच्यारस्त्याच्या दोन्ही बाजूने समान रुंदीकरण प्रस्तावित करून ९ मी. वि.यो.रस्ताम्हणून दर्शविण्यात आला.<br>ii.नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे मौ.खोपोली येथील गावठणामधील प्रस्तावित १८मी. वि.यो. रस्त्याची रुंदी कमी करून ९ मी. वि.यो. रस्ता प्रस्तावित करण्यात आलाआणि वगळलेले क्षेत्र लगतच्या वापर विभागात समाविष्ट करण्यात आले. |
| एम३७ | i.मौ.भानवाजयेथील न.भू.क्र. ४७८५ मुस्लिम कम्युनिटी हॉल चे क्षेत्र सार्वजनिक-निमसार्वजनिकवापर विभागातून वगळून रहिवास वापर विभागात दर्शविण्यात आले.<br>ii.मौ.भानवाज येथील न.भू.क्र. ४९७९ चे क्षेत्र रहिवासवापर विभागातून वगळून सार्वजनिक-निमसार्वजनिकवापर विभागात दर्शविण्यात आले. |
| एम३८ | नकाशामध्येदर्शविल्याप्रमाणे मौ.भानवाज येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर हॉस्पिटल ते प्राथमिकशाळा क्रमांक १ पर्यंतच्या विद्यमान रस्तास आवश्यक रुंदीकरणसह ९ मी. वि.यो.रस्ता म्हणून प्रस्तावित करण्यात आला. |
| एम३९ | मौ.चिंचवली शेकिनयेथील न.भू.क्र. ९४० चे सार्वजनिक-निमसार्वजनिक वापर विभागाचे क्षेत्र वगळूनरहिवास वापर विभागात समाविष्ट करण्यात आले. |
| एम४० | मौ.भानवाजव काटरंगयेथील आरक्षण क्र. ७५ 'लहानमुलांचे क्रीडांगण' चेविद्यमानबांधकामांमुळे बाधित झालेले क्षेत्र वगळून रहिवास वापर विभागात समाविष्ट करण्यातआले. |
| एम४१ | मौ.काटरंग येथीलन.भू.क्र. ४८२८ - भूखंड क्र १४ आणि १५ चे क्षेत्र वाहतूक वापर विभागातून वगळूनरहिवास वापर विभागात समाविष्ट करण्यात आले. |
| एम४२ | नकाशामध्येदर्शविल्याप्रमाणे मौ.आजोशी आरक्षण क्रमांक १६ 'प्राथमिक व माध्यमिक शाळा' चेपश्चिमेकडील ५०% क्षेत्र वगळून रहिवास वापर विभागात समाविष्ट करण्यात आले. |
| एम४३ | मौ.खोपोली येथीलन.भू.क्र. ४४०० आणि ४४०१ चे आरक्षण क्र.८३ 'तलाव शुशोभीकरण' ने बाधित होणारेक्षेत्र वगळून रहिवास वापर विभागामध्ये समाविष्ट करण्यात आले. |
| एम४४ | मौ. शिळ, स.न.२०मधील विद्यमान मंदिर सार्वजनिक-निमसार्वजनिक वापर विभागात कायम ठेऊन उर्वरितक्षेत्र रहिवास वापर विभागात समाविष्ट करण्यात आले. |
| एम४५ | नकाशामध्येदर्शविल्याप्रमाणे मौ.ताकई येथील न.भू.क्र. ३१९५ मधील प्रस्तावित १८ मी. रुंदीचावि.यो. रस्ता मंजूर विकास योजनेनुसार पुनरेखित करण्यात आला आणि वगळलेले क्षेत्रलगतच्या वापर विभागात समाविष्ट करण्यात आले. |
| एम४६ | खालापूर तालुकामौ.देवलाड येथील शिक्षण प्रसारक मंडळ क्रीडांगणातील प्रस्तावित १८ मी. रुंदीचावि.यो. रस्ता वगळण्यात आला आणि वगळलेले क्षेत्र लगतच्या वापर विभागात समाविष्टकरण्यात आले. नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे बी.एल.पाटील पॉलिटेक्निकमहाविद्यालयाच्या दक्षिण बाजूने राष्ट्रीय महामार्ग-४८ ला जोडणारा नवीन ९मी.रुंदीचा वि.यो.रस्ता प्रस्तावित करण्यात आला. |
| एम४७ | मंजूर विकास योजनेनुसार मौ.लव्हेज आणि वासरंग येथील न.भू.क्र. १६८७, २५५१ व १४७५ मधील प्रस्तावित १८मी. आणि १२मी रस्त्यांचे रुंदीकरण वगळण्यात आले आणि वगळलेले क्षेत्र लगतच्या वापर विभागात समाविष्ट करण्यात आले. नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे नवीन १८मी. रुंद वि.यो. रस्ता औद्योगिक वापर विभागाच्या लगत अर्जदारने सुचावल्यानुसरप्रस्तावित करण्यात आला. |
| एम४८ | आरक्षण क्र.८३ 'तलाव शुशोभीकरण' च्या उत्तरेकडील चौकापासून १८ मी.रुंद वि.यो.रस्ता पर्यन्तच्याविद्यमान ४.५ मी. रुंद रस्त्यास ९मी. रुंदीकरणसह तसेच मौ.खोपोली येथीलन.भू.क्र.४५०१ मधील राष्ट्रीय महामार्ग-४८पर्यन्त नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे प्रस्तावित करण्यात आला. |
| एम४९ | मौ.खोपोली येथीलन.भू.क्र. ५२८७ आणि ५२८८ मधील पत्र्या मारुती मंदिरनकाशामध्ये दर्शविण्यात आले. |
| एम५० | i.आरक्षण क्र.२४ 'ॲनिमल क्रेमटोरिउम' चे नामाभिदान 'ॲनिमल क्रेमटोरिउम ॲंड वेटेरिणरी हॉस्पिटल' असे करण्यात आले आणि<br>ii. मौ.शेडवली येथील आरक्षण क्र.२५ 'वेटेरिणरी हॉस्पिटल' चे नामाभिदान 'हॉस्पिटल' असे करण्यात आले. |
| एम५१ | नकाशामध्येदर्शविल्याप्रमाणे मंजूर विकास योजनेतील मौ.विहारी येथील आ.क्र.७९ प्रमाणे हरितपट्ट्यास नवीन आरक्षण क्र.९५ 'लहान मुलांचे क्रीडांगण' प्रस्तावित करण्यात आले. |
| एम५२ | मंजूर विकासयोजनेनुसार मौ.भानवाज येथील आरक्षण क्र.७१ 'मार्केट' आणि पोलीस स्टेशन जवळीलविद्यमान रस्ता नकाशामध्ये दर्शविण्यात आले. |
| एम५३ | नकाशामध्येदर्शविल्याप्रमाणे खोपोली नगरपरिषद रोड पासून मौ.रहातवडे येथील न.भू.क्र. २६६८मधील १८ मी. रुंदीच्या वि.यो. रस्त्यापर्यंत नवीन १८ मी. रुंदीचा रस्ताप्रस्तावित करण्यात आला. |
| एम५४ | नकाशामध्येदर्शविल्याप्रमाणे मौ.रहातवडे आणि देवलाड येथील न.भू.क्र. ३५९०, ३६२७, ३६६३, ३७४० आणि ३७४१ मधील विद्यमान रस्त्यास ९ मी. रुंदीकरणप्रस्तावित करण्यात आले. |
| एम५५ | नकाशामध्येदर्शविल्याप्रमाणे मौ.भानवाज येथीलन.भू.क्र. ५२७२, ५२७६, ५३४८ मध्ये प्रस्तावित १८ मी. रुंदीचा वि.यो.रस्त्याचे पुनरेखन करण्यात आला आणि वगळलेले क्षेत्र लगतच्या वापर विभागातसमाविष्ट करण्यात आले. |
| एम५६ | i. नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे मौ.मुळगाव (बु)येथील न.भू.क्र. ३०५१ मध्ये ६२५ चौ.मी. क्षेत्रफळाचे नवीन आरक्षण क्र. ९६ 'Elevated Service Reservoir/Sump Tank' प्रस्तावित करण्यात आले.<br>ii. नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे मौ.काटरंग येथील न.भू.क्र. ३४७९ मध्ये ६२५चौ.मी. क्षेत्रफळाचे नवीन आरक्षण क्र. ९७ 'Elevated Service Reservoir/Sump Tank' प्रस्तावित करण्यात आले. |
| एम५७ | i.मौ.भानवाजयेथील न.भू.क्र. ४९९० मधील विद्यमान मस्जिद नकाशामध्ये दर्शविण्यात आले.<br>ii. मौ.मुळगाव(बु) येथील न.भू.क्र. २४७४ पै मधील विद्यमान दर्गा नकाशामध्येदर्शविण्यात आले. |
| एम५८ | i.मौ.मीळ येथीलन.भू.क्र.३३०७ मधील विद्यमान मिल्काई मंदिरनकाशामध्ये दर्शविण्यात आले.<br>ii. नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे मिल्काई मंदिरापर्यन्त ९ मी. रुंदीचा वि.यो.पोहोच रस्ता प्रस्तावित करण्यात आला. |
| एम५९ | नकाशामध्येदर्शविल्याप्रमाणे मौ.चिंचवली शेकिन येथील १२ मी. रुंदीच्या वि.यो. रस्त्याचेनामाभिदान ९ मीटर रुंद अशी सुधारित करण्यात आली. |
| एम६० | मंजूर विकासयोजनेनुसार मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गाजवळील विद्यमान वसाहत 'Dasturi' म्हणूननकाशामध्ये दर्शविण्यात आली. |
| एम६१ | नकाशामध्येदर्शविल्याप्रमाणे मौ.भानवाज येथील न.भू.क्र. ५१२६,५११८ आणि ५१२७ मधील मनोरंजनवापर विभाग (बगीचा) वगळून रहिवास वापर विभागात समाविष्ट करण्यात आले. |
| एम६२ | नकाशामध्येदर्शविल्याप्रमाणे मौ.भानवाज येथील न.भू.क्र. ५०००, ५०१४ ते ५०२२ मध्ये नवीनआरक्षण क्र.९८ 'वाहनतळ' प्रस्तावित करण्यात आले. |
| एम६३ | मौ.विहारी येथीलस.क्र.२१ ते स.क्र.१९ मधील दत्त मंदिर पर्यंतचा विद्यमान रस्ता नकाशामध्येदर्शविण्यात आला. |
| एम६४ | i.नकाशामध्येदर्शविल्याप्रमाणे मौ.शीळ येथील आरक्षण क्र.३२ 'वाहनतळ व वाणिज्य संकुल' तेमौ.मीळ येथील मीळ डम्पिंग यार्ड पर्यन्त १२ मी. रुंदीचा वि.यो. रस्ता प्रस्तावितकेला आहे.<br>ii.नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे प्रस्तावित १२ मी. रुंद वि.यो. रस्त्यापासून (एम६४-iनुसार) राष्ट्रीय महामार्ग-४८ पर्यंतच्या विद्यमान रस्त्यास १२ मी.रुंदीकरण प्रस्तावित करण्यात आले. |

पान ८ वर

पान ७ वरुन

| | |
|---|---|
| एम६५ | नकाशामध्येदर्शविल्याप्रमाणे मौ.आजोशी येथील न.भू.क्र. १४३९ मध्ये सुमारे ३ हेक्टरक्षेत्रफळाचे नवीन आरक्षण क्र.९९ 'म्यूनिसिपल पर्पस/टाऊन हॉल' प्रस्तावित करण्यात आले. |
| एम६६ | मौ.शीळ येथीलविद्यमान सुविधा 'इतर उद्योग' हे मंजूर विकास योजनेनुसार 'एमपीएल मार्केट' म्हणून नकाशामध्येदर्शविण्यात आले. |
| एम६७ | नकाशामध्येदर्शविल्याप्रमाणे रेल्वे लाईनच्या लगत ९ मी. रुंदीचा वि.यो. रस्ता प्रस्तावितकरण्यात आला. (मौ. चिंचवली शेकिन येथील न.भू.क्र. ५८६ ते मौ.लव्हेज येथीलन.भू.क्र. १६८७ पर्यन्त) |
| एम६८ | नकाशामध्येदर्शविल्याप्रमाणे मौ.विहारी येथील स.क्र.२१ मध्ये प्रस्तावित १२ मी.वि.यो.रस्त्याची रुंदी कमी करुन ९ मी. दर्शविण्यात आली आणि वगळलेले क्षेत्र लगतच्यावापर विभागात समाविष्ट करण्यात आले. |
| एम६९ | नकाशामध्येदर्शविल्याप्रमाणे मौ.काटरंग येथील न.भू.क्र.३४८८ ते न.भू.क्र.५४७७ मधीलप्रस्तावित १८ मी. रुंदीच्या वि.यो. रस्त्याचे स्थलांतरण करण्यात आले आणिवगळलेले क्षेत्र लगतच्या वापर विभागात समाविष्ट करण्यात आले. |
| एम७० | नकाशामध्येदर्शविल्याप्रमाणे मौ. रहातवडे आणि वरोसे येथील न.भू.क्र. ३०१२ चे औद्योगिकविभागतील क्षेत्र वगळून नवीन आरक्षण क्र.१०० 'क्रीडा संकुल' प्रस्तावित करण्यातआले. |
| एम७१ | नकाशामध्येदर्शविल्याप्रमाणे मौ.रहातवडे येथील न.भू.क्र. ३६५० मध्ये सुमारे १५००चौ.मी.क्षेत्रफळाचे नवीन आरक्षण क्र.१०१ 'वाहनतळ' प्रस्तावित करण्यात आले. |
| एम७२ | नकाशामध्येदर्शविल्याप्रमाणे मौ.विहारी, देवलाड आणि खोपोली येथे पाताळगंगा नदीलगत नवीनआरक्षण क्र. १०२ 'रिवर फ्रंट डेवलपमेंट' प्रस्तावित करण्यात आले. |
| एम७३ | मंजूर विकासयोजनेनुसार मौ.भानवाज येथील आरक्षण क्र.६८ 'म्यूनिसिपल स्टाफ क्वार्टर' चेक्षेत्रफळ कायम करण्यात आले. |
| एम७४ | i. नकाशामध्येदर्शविल्याप्रमाणे मौ.खोपोली येथील न.भू.क्र. ४४१५ ते आरक्षण क्र.८७ 'नागरीआरोग्य केंद्र व ग्रंथालय' पर्यंत प्रस्तावित ९ मी.वि.यो. रस्ता १२ मी. रुंदप्रस्तावित करण्यात आला. ii.नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्र.८७ 'नागरी आरोग्य केंद्र वग्रंथालय' ते राष्ट्रीय महामार्ग-४८ पर्यन्त नवीन १२ मी.रुंद वि.यो. रस्ताप्रस्तावित करण्यात आला. |
| एम७५ | मौ.खोपोली येथीलन.भू.क्र. ४५६६ पासूनटाटा कंपनीकडेजाणाऱ्या चौकापर्यंत विद्यमान रस्त्याची उत्तर बाजू कायम ठेऊन प्रस्तावित २४मी.रस्त्याचे (राष्ट्रीय महामार्ग-४८) रुंदीकरण दक्षिणेला स्थलांतरित करण्यातआले आणि वगळलेले क्षेत्र लगतच्या वापर विभागात समाविष्ट करण्यात आले. |
| एम७६ | नकाशामध्येदर्शविल्याप्रमाणे मौ.वरोसे येथील आरक्षण क्र. ५८ 'प्राथमिक शाळा' च्याक्षेत्रापैकी सुमारे ०.४ हेक्टर क्षेत्र कायम ठेऊन उर्वरित क्षेत्रावर नवीनआरक्षण क्रमांक १०३ 'पार्किंग' प्रस्तावित करण्यात आले. |
| एम७७ | मौ.विहारी येथीलन.भू.क्र.२७१७अ आणि २७१७क मध्ये केएमसी कडील पत्र क्रमांक १५५ दि १७/०४/२०२३अन्वये पारित केलेल्या मंजूर नकाशामुळे प्रस्तावित १८ मी. रुंद वि.यो. रस्त्याचीभागश: आखणी ही पूर्वेकडे स्थलांतरित करण्यात आली आणि वगळलेले क्षेत्र लगतच्यावापर विभागात समाविष्ट करण्यात आले. |

मुख्याधिकारी,
खोपोली नगरपरिषद, खोपोली

# 'यू मुंबा' पोहोचली टॉप ८ मध्ये

। मुंबई । प्रतिनिधी ।



प्रो कबड्डी लीग २०२५ स्पर्धेत रविवारी झालेल्या दुसऱ्या सामन्यात यू मुंबा आणि हरियाणा स्टीलर्स हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते. ४० मिनिटांचा खेळ झाल्यानंतर दोन्ही संघ ३७-३७ ने बरोबरीत हो-ते. दरम्यान टाय ब्रेकरमध्ये यू मुंबाने ७- ५ ने बाजी मारली. दिवसाच्या पहिल्या सामन्यात पटना पायरेट्सने हा सामना ३८- २७ च्या फरकाने जिंकला आहे. या सामन्यात पटना पायरेट्सकडून अयानने सर्वाधिक १७ गुणांची कमाई केली.

या सामन्यात हरियाणा स्टीलर्स संघाकडून पहिली चढाई करण्यासाठी आलेल्या विनयने बोनस गुण घेऊन संघाचं खातं उघडलं. तर यू मुंबाकडून अजित चौहानने १ गुण घेत संघाला सुरुवात करून दिली. तिसऱ्या मिनिटाला यू मुंबाने सुपर टॅकल केला होता. पण यू मुंबाच्या बचावपटूच्या चुकीमुळे हरियाणा स्टीलर्सला गुण मिळाला. चौथ्या मिनिटाला यू मुंबाचा संघ पहिल्यांदा ऑलआऊट झाला. यासह हरियाणा स्टीलर्सने १०-४ गुणांसह ६ गुणांची आघाडी घेतली. सुरुवातीच्या १० मिनिटांचा खेळ झाल्यानंतर हरियाणा स्टीलर्सला संघ १३- ८ गुणांसह आघाडीवर होता.

सुरुवातीच्या १० मिनिटात पिछाडीवर राहिलेल्या यू मुंबाने पुढील काही मिनिटांमध्ये पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला. शेवटची ५ मिनिटे शिल्लक असताना यू मुंबाचा संघ अवघ्या ३ गुणांनी पिछाडीवर होता. शेवटची २ मिनिटे शिल्लक असताना यू मुंबाकडून अजित चौहानने सुपर रेड मारत हरियाणा स्टीलर्सला ऑलआऊट केलं. यासह यू मुंबाची पिछाडी कमी केली. पूर्वार्धातील २० मिनिटांचा खेळ पूर्ण झाल्यानंतर दोन्ही संघ २०-२० गुणांनी बरोबरीत होते.उत्तरार्धातील सुरुवातीच्या ५ मिनिटात दोन्ही संघांमध्ये अटीतटीची लढत रंगली. दोन्ही संघ २४-२४ ने बरोबरीत हो-ते. पूर्वार्धातील १० मिनिटांचा खेळ झाल्यानंतर हरियाणा स्टीलर्सला संघ २८-२५ ने आघाडीवर होता. यू मुंबाने हरियाणाला ऑलआऊट करून ३४- ३१ गुणांसह ३ गुणांची आघाडी घेतली. शेवटी हा सामना ३७- ३७ गुणांनी बरोबरीत राहिला. शेवटी टाय ब्रेकरमध्ये सामन्याचा निकाल लागला. टाय ब्रेकरमध्ये यू मुंबाने ७- ५ ने बाजी मारली. दुसऱ्या सामन्यात पटना पायरेट्सने हा सामना ३८- २७ च्या फरकाने जिंकला आहे. या सामन्यात पटना पायरेट्सकडून अयानने सर्वाधिक १७ गुणांची कमाई केली. या सामन्यात सचिनने पुणेरी पलटनकडून पहिली चढाई केली. पहिल्याच चढाईत त्याने १ गुण घेत संघाचं खातं उघडलं. पूर्वार्धातील सुरुवातीच्या ५ मिनिटांचा खेळ झाल्यानंतर दोन्ही संघ ४-४ ने बरोबरीत होते. सुरुवातीच्या १० मिनिटांमध्ये पटना पायरेट्सचा संघ आघाडीवर होता. पटना पायरेट्सने ८-५ गुणांसह ३ गुणांनी आघाडी घेतली.पूर्वार्धातील १४ व्या मिनिटाला पुणेरी पलटनने ९-९ संघ गुणसंख्या बरोबरीत आणली. ही आघाडी शेवटपर्यंत कायम ठेवली. पूर्वार्धातील २० मिनिटांचा खेळ झाल्यानंतर पुणे-री पलटनचा संघ १५- १३ ने आघाडीवर होता.

उत्तरार्धातील चौथ्या मिनिटाला पटना पायरेट्सने गुणसंख्या ५-५ ने बरोबरीत आणली. पाचव्या मिनिटाला पुणेरी पलटनचा संघ ऑलआऊट झाला. यासह पटना पायरेट्सने १८-१६ गुणांसह २ गुणांनी आघाडी घेतली. पूर्वार्धातील ८ व्या मिनिटाला पटना पायरेट्सकडून अयानने आपलं सुपर १० पूर्ण केलं. उत्तरार्धातील सुरुवातीच्या १० मिनिटांचा खेळ झाल्यानंतर पटना पायरेट्सचा संघ २५- १९ गुणांसह ६ गुणांनी आघाडीवर होता.उत्तरार्धातील दुसऱ्या टप्प्याच्या सुरूवातीलाच पुणेरी पलटनचा संघ पुन्हा एकदा ऑलआऊट झाला. यासह पटना पायरेट्सने २९-१९ गुणांसह १० गुणांची आघाडी घेतली. शेवटची ४ मिनिटे शिल्लक असताना पटना पायरेट्सचा संघ ३३-२२ गुणांसह ११ गुणांनी आघाडीवर होता.

## भारताच्या जबड्यातून इंग्लंडने हिसकावला विजय

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।



भारतीय महिला संघाला वनडे वर्ल्डकप २०२५ मध्ये सलग तिसऱ्या पराभवाला सामोरं जावं लागलं आहे. इंग्लंड महिला संघाने भारताच्या जबड्यातून विजय हिसकावून घेत अवघ्या ४ धावांनी पराभव केला.

भारतानेही इंग्लंड संघाप्रमाणेच अखेरच्या षटकांमध्ये विकेट्स गमावले. त्यामुळे अखेरच्या षटकात भारताला विजयासाठी १४ धावांची गरज होती. पहिल्या तीन चेंडूत भारताने फक्त ३ धावा केल्या. तर चौथ्या चेंडूवर एकही धाव घेता आली नाही. अखेरच्या चेंडू चौकारासाठी गेला खरा पण तोपर्यंत सामना हातातून निसटला होता आणि परिणामी भारतीय संघावर इंग्लंडने ४ धावांनी विजय मिळवला.

इंग्लंडने दिलेल्या २८८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना प्रतिका रावल सुरूवातीलाच बाद झाली. यानंतर हरलीन देओलने काही कमालीचे फटके खेळले. पण हरलीनदेखील लवकर बाद झाली.

भारताकडून स्मृती मानधनाने ९४ चेंडूत ८ चौकारांसह ८८ धावांची शानदार खेळी केली. तर कर्णधार हरमनप्रीत कौरने ७० चेंडूत १० चौकारांसह ७० धावांची खेळी केली.

इंग्लंडने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला आणि ५० षटकांत ८ बाद २८८ धावा केल्या. इंग्लंडकडू टॅमी ब्यूमॉंट आणि एमी जॉन्स यांनी चांगली सुरूवात केली. जॉन्सने ५६ धावा अर्धशतकी खेळी केली. तर हिथर नाईट हिने ९१ चेंडूत १५ चौकार आणि एका षटकारासह १०९ धावा केल्या. तर नॅट स्किव्हर ब्रंटसह तिने शतकी भागीदारी रचली. ही मोठी भागीदारी तोडल्यानंतर भारताने सामन्यात पुनरागमन केलं. भारताकडून दीप्ती शर्माने सर्वाधिक ४ विकेट्स घेतल्या.

## गावठाणमध्ये आज कबड्डी स्पर्धा

**चित्रलेखा पाटील यांची प्रमुख उपस्थिती असणार**

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

कुर्डूस परिसरातील गावठाण येथील जय म्हसोबा नवतरुण क्रिडा मंडळ व ग्रामस्थ मंडळ यांच्या वतीने मंगळवारी(दि.२१) आदिवासी, ठाकूर, आदिवासी कातकरी समाजाच्या भव्य कबड्डी स्पर्धा आयोजित केल्या आहेत. दुपारी बारा वाजता या स्पर्धेला सुरुवात होणार आहे. शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत स्पर्धेचा शुभारंभ होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

आदिवासी ठाकूर, आदिवासी कातकरी समाजात खेळाची आवड निर्माण व्हावी, खेळाचे महत्व वाढावे, यासाठी गेल्या अनेक वर्षापासून गावठाणमध्ये कबड्डी स्पर्धा भरविल्या जात आहे. ही परंपरा या वर्षीही कायम ठेवण्यात आली आहे.

या स्पर्धेत ६० हून अधिक संघ सहभागी होणार आहेत. स्पर्धेतील प्रथम क्रमांकाला रोख १५ हजार रुपये व चषक, द्वितीय क्रमांकाला दहा हजार रुपये व चषक, तृतीय व चतुर्थ क्रमांकाला प्रत्येकी पाच हजार रुपये व चषक देऊन गौरविण्यात येणार आहे.

## निवडक



### रणजीत मोहम्मद शमीचा धमाका

**बंगाल :** भारतीय संघातील वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी भारतीय संघात पुनरागमन करण्याच्या प्रयत्नात आहे. आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ स्पर्धा झाल्यानंतर शमीला एकही सामना खेळण्याची संधी मिळालेली नाही. सध्या तो रणजी ट्रॉफी स्पर्धेत बंगाल संघाचं प्रतिनिधित्व करत आहे. या स्पर्धेतील पहिल्याच सामन्यात दमदार कामगिरी करून त्याने निवडकर्त्यांना जोरदार प्रत्युत्तर दिलं आहे. रणजी ट्रॉफी २०२५-२६ स्पर्धेला सुरुवात झाली आहे. या स्पर्धेत बंगालचा पहिला सामना उत्तराखंड संघासोबत सुरू आहे. या सामन्यातील दोन्ही डावात शमीने दमदार कामगिरी केली आहे. या सामन्यातील पहिल्या डावात गोलंदाजी करताना त्याने १४.५ षटकात अवघ्या ३७ धावा खर्च करत ३ गडी बाद केले. तर दुसऱ्या डावात गोलंदाजी करताना त्याने २४.४ षटकात ३८ धावा खर्च करत ४ गडी बाद केले. दोन्ही डावात त्याने ७ गडी बाद करून आपण फिट आहोत, हे निवडकर्त्यांना दाखवून दिलं आहे. गोलंदाजीत ७ गडी बाद करणाऱ्या शमीने फलंदाजी १० धावा देखील केल्या.

### दुर्ग बांधणी स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**रायगड :** पनवेल येथील महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या वासुदेव बळवंत फडके इंग्लिश मीडियम स्कूलतर्फे अमृत दुर्गोत्सव साजरा करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या दुर्गनिर्मिती परंपरेला अभिवादन म्हणून शाळेत दुर्ग बांधणी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात विद्यार्थ्यांना १२ गटांमध्ये विभागून विविध ऐतिहासिक दुर्गांची प्रतिकृती साकारण्यास प्रवृत्त करण्यात आले. विद्यार्थ्यांनी रायगड, प्रतापगड, शिवनेरी, सिंहगड यांसारख्या किल्ल्यांचे हुबेहूब वास्तू साकारून शिवकालीन वास्तुकलेचा आणि इतिहासाचा भव्यतेने आविष्कार केला. या स्पर्धेचे परीक्षण नामवंत इतिहास अभ्यासक आणि मोडी लिपी संशोधक पंकज भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. भोसले हे माद्रीफ मासिकाच्या माध्यमातून मोडी लिपीचे संवर्धन करत असून, ऐतिहासिक खेळांच्या कार्यशाळांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाची रुची निर्माण करण्याचे कार्य ते सातत्याने करत आहेत. स्पर्धेनंतर बोलताना त्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचे कौतुक करत सांगितले की, ही स्पर्धा केवळ एक स्पर्धा न राहता इतिहासाशी जोडणारा सेतू ठरली आहे.

## पार्थची फायर आर्म रायफल शूटिंग स्पर्धेसाठी निवड

। म्हसळा । प्रतिनिधी ।

शहरातील नेत्र तज्ज्ञ डॉ प्रियांका व डॉ. परेश तोडकर यांचा मुलगा पार्थ तोडकर याची फायर आर्म रायफल शूटिंगसाठी



राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. मध्य प्रदेश भोपाळ येथे १० ऑक्टोबर २०२५ रोजी संपन्न झालेल्या ३४ व्या ऑल इंडिया जी. व्ही. मावळणकर शूटिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत पार्थ याची निवड करण्यात आली.

पार्थ इयत्ता ७ वी मध्ये शिकत असुन त्याला लहानपणापासून याची आवड आहे, परंतु तालुक्यात तसेच जवळपास कुठेही ट्रेनिंग घेण्याची सुविधा नाही किंवा मार्गदर्शक देखील मिळाला नाही. मुलाची आवड व तीव्र इच्छा पाहता डॉक्टर दाम्पत्यांनी त्याला त्याची इच्छा पूर्ण करण्यावर लक्ष केंद्रित केले. त्याला पुढील व योग्य मार्गदर्शन कुठे मिळेल याची माहिती घेत रत्नागिरी येथील शूटर कोच पुष्कराज इंगवले व राजेश्वरी इंगवले यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेला सुट्टी असेल त्या दरम्यान ठेवले. सुरूवातीला एकदम सध्या बेसिक एअरगनवर सराव करत आईवडिलांचा विश्वास सार्थ ठरवत पार्थ याने मन लावून सराव चालू केला. सहा महिन्यात सुट्टीच्या कालावधीत कमी वयात त्याला यश प्राप्त झाले आहे.

## टी २० सामन्यात झाल्या ४०७ धावा!

**मुंबई :** इंग्लंडचा संघ न्यूझीलंड सामन्यात चौकार आणि षटकारांची आतषबाजी पाहायला मिळाली. इंग्लंडने या सामन्यात न्यूझीलंडला डोकंच वर काढू दिलं नाही. इंग्लंडने हा सामना ६५ धावांनी जिंकला. न्यूझीलंडने नाणेफेकीचा कौल जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पण हा निर्णय फसला असंच म्हणावं लागेल. कारण इंग्लंडच्या फलंदाजांनी न्यूझीलंडच्या गोलंदाजांना सळो की पळो करून सोडलं. इंग्लंडने २० षटकात ४ गडी गमवून २३६ धावा केल्या. या धावांचा पाठलाग करताना न्यूझीलंडचा संघ १८ षटकात सर्व गडी गमवन १७१ धावांवर बाद झाला. या सामन्यात इंग्लंडने ६५ धावांनी विजय मिळवत मालिकेत आघाडी घेतली आहे.

## डीवाय पाटील स्टेडियम वर्ल्डकपच्या नकाशावर

। नवी मुंबई । प्रतिनिधी ।

दिवाळीच्या निमित्ताने नवी मुंबईतल्या नेरुळ इथलं डी वाय पाटील स्टेडियम एका नव्या पर्वासाठी सज्ज झालं आहे. वूमन्स वर्ल्डकपचा श्रीलंका-बांगलादेश सामना या मैदानावर होत आहे. या लढतीच्या निमित्ताने क्रिकेट वर्ल्डकपच्या नकाशावर हे स्टेडियम येणार आहे. मुंबई म्हटलं की वानखेडे किंवा सीसीआय ही मैदानं डोळ्यासमोर उभी राहतात. मात्र आता या मांदियाळीत नवी मुंबईतल्या या मैदानाची भर पडते आहे.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने यंदा आयपीएलच्या जेतेपदावर नाव कोरलं. १८ वर्षानंतर आरसीबीचं आयपीएल जेतेपदाचं स्वप्न साकार झालं. विराट कोहली हा आरसीबाचा चेहरा. सगळे हंगाम आरसीबीसाठी खेळणारा विराट हे निष्ठेचं अतुलनीय उदाहरण ठरावं. कारकिर्दीच्या अंतिम टप्प्यात असणाऱ्या कोहलीचं आयपीएल जेतेपदाचं स्वप्न पूर्ण होणार का असं चित्र होतं. मात्र दमदार सांघिक कामगिरीच्या बळावर आरसीबीने जेतेपदाचं स्वप्न प्रत्यक्षात साकारलं. आरसीबीच्या या ऐतिहासिक यशानंतर बंगळुरूत मिरवणूक काढण्यात आली. मात्र ढिसाळ नियोजनामुळे या मिरवणुकीत चेंगराचेंगरी होऊन ११ चाहत्यांचा जीव गेला. या बातमीने सगळेच हळहळले. या घटनेची सविस्तर चौकशी करण्यात आली. संबंधितांवर कारवाईही होईल पण गेलेली माणसं परत येणार नाहीत. बंगळुरूवासीयांसाठी आनंदाचा आणि अभिमानाचा क्षण असलेल्या घटनेचं कटू वास्तवात रुपांतर झालं.चिन्नास्वामी स्टेडियम परिसरात पुरेशी मोकळी जागा नसल्याचंही कारण समोर आलं. याचा परिणाम होऊन वूमन्स वर्ल्डकप साठी यादीत असूनही चिन्नास्वामी स्टेडियम च्या मॅचेस अन्यत्र खेळवण्याचा निर्णय घेण्यात आला.

बंगळुरूऐवजी केरळमधल्या तिरुवनंतपुरम इथल्या ग्रीनफिल्ड स्टेडियमचा पर्याय विचारात घेण्यात आला. मैदान, खेळपट्टी आणि बाकी गोष्टी वेळेत तयार असतील अशी ग्वाही केरळ क्रिकेट असोसिएशनने बीसीसीआयला दिली होती. मात्र आयसीसीने वूमन्स वर्ल्डकप व्हेन्यू म्हणून नवी मुंबईतल्या नेरुळ इथल्या डीवाय पाटील स्टेडियची निवड केली. वर्ल्डकपचे सामने गुवाहाटी, विशाखापट्टणम, इंदूर, नवी मुंबई आणि कोलंबो इथे खेळवण्यात येणार आहेत. पाकिस्तानचा संघ सेमीफायनलमध्ये नसेल तर सेमी फायनल आणि फायनलचा मुकाबला डीवाय पाटील स्टेडियम वरच खेळवण्यात येणार आहे.

**कनिष्ठ जागतिक बॅडमिंटन स्पर्धा** | **थायलंडच्या खेळाडूकडून पराभव**

## जागतिक स्पर्धेत भारताच्या तन्वीला रौप्यपदक

। गुवाहाटी । वृत्तसंस्था ।

भारताच्या अग्रमानांकित तन्वी शर्माला कनिष्ठ गटाच्या जागतिक अजिंक्यपद बॅडमिंटन स्पर्धेत अखेर रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. रविवारी झालेल्या अंतिम सामन्यात तन्वीला थायलंडच्या अन्यपत फिचितप्रीचासक हिच्याकडून ७-१५, १२-१५ असा पराभव पत्करावा लागला.

अंतिम फेरीत दोघींनी झुंजार खेळ केला. पहिल्या गेममध्ये २-२, ४-४ अशी बरोबरीनेच सुरुवातीला झाली. पण, एकवेळ अन्यपत हिचे फटके परतविण्याच्या वेगळ्या शैलीमुळे तन्वी एकाग्रता हरवून बसली. अन्यपतने तन्वीला नेटसमोर कोंडीत पकडले. अन्यपतने १०-५ अशी आघाडी मिळवली आणि ती कायम राहील याची काळजी घेतली. लागोपाठ दोन जोरकस स्मॅश आणि तन्वीचा एक फटका स्वैर गेल्यामुळे अन्यपतने पहिला गेम जिंकला.



दुसऱ्या गेममध्ये तन्वीने निर्धाराने सुरुवात करताना ६-१ अशी आघाडी मिळवली, परंतु पुन्हा तन्वीचे फटक्यांवरील नियंत्रण सुटले. तरी गेमच्या मध्याला तन्वीने ८-५ अशी आघाडी राखली. त्यानंतर अन्यपत हिने आपले नियोजन बदलले. तिने तन्वीला सातत्याने पुढे खेचण्याचा प्रयत्न केला आणि यात तन्वीचे फटक्यावरील नियंत्रण सुटले. याचा अन्यपतला फायदा झाला. अन्यपत कडक स्मॅशेसच्या जोरावर ९-८ अशी आघाडी घेतली आणि पुढे ११-८ अशी वाढवली. यानंतर दीर्घ रॅलीत तन्वीला वादग्रस्त गुण मिळाला. मात्र, नंतर पुन्हा एकदा तन्वीच्या स्वैर फटक्याने अन्यपतला विजेतेपदाच्या उंबरठ्यावर नेऊन ठेवले. अन्यपतने पुन्हा एकदा स्मॅशचा सुरेख वापर करून विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले.सतरा वर्षांनी पदकविजेती तन्वीच्या रूपात भारताला १७ वर्षांनी कनिष्ठ जागतिक अजिंक्यपद बॅडमिंटन स्पर्धेत महिला गटात पदकविजेती मिळाली. यापूर्वी सायना नेहवालने २००८ मध्ये सुवर्णपदक जिंकले होते. जागतिक स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचणारी तन्वी ही भारताची तिसरी बॅडमिंटनपटू ठरली. यापूर्वी सायना आणि अपर्णा पोपट यांनी अशी कामगिरी केली होती. सायनाने २००६ मध्ये रौप्य, तर २००८ मध्ये सुवर्णपदक मिळविले होते. अपर्णा १९९६ मध्ये रौप्यपदकाची मानकरी ठरली होती.

## स्टार्कने टाकला वेगवान चेंडू

**पर्थ :** ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्कने टाकलेल्या एका चेंडूची जोरदार चर्चा रंगली आहे. मिचेल स्टार्क पहिले षटक टाकण्यासाठी गोलंदाजीला आला. या षटकातील पहिला चेंडू स्टार्कने वेगाने टाकला. हा चेंडू रोहितने ढकलला आणि धावून १ धाव पूर्ण केली. यासह रोहितने आपलं खातं उघडलं. पण सोशल मीडियावर असा दावा केला जात आहे की, या चेंडूची गती १७६.५ किमी प्रति तास इतकी होती. पण हा दावा खोटा आहे. तांत्रिक बिघाडामुळे चूकून चेंडूची गती जास्त दिसली. स्टार्कने टाकलेल्या या चेंडूची गती १४०.८ किमी प्रति तास इतकी होती.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)